रविवार, 17 जुलै 2022
किमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - 01 अंक - 311
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

MARATHI • DAINIK • AURANGABAD (MAHARASHTRA) • SUNDAY 17 JULY 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-01 • ISSUE-311 • TITLE CODE : MAHMAR51117 • PAGE-14 • PRICE-5


# मंत्रिमंडळ विस्ताराचा मुहूर्त ठरला

## पहिल्या टप्प्यात बारा जणांचा शपथविधी

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : शिंदे फडणवीस सरकारच्या मंत्रिमंडळ विस्ताराला अखेर मुहूर्त मिळाल्याची चर्चा आहे. येत्या बुधवारी म्हणजेच २० जुलै रोजी नव्या सरकारचा बहुप्रतीक्षित कॅबिनेट विस्तार होणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. पहिल्या टप्प्यात दहा ते बारा जणांना मंत्रिपदाची शपथ दिली जाणार आहे. आतापर्यंत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अशा दोघांचेच मंत्रिमंडळ असल्यावरुन विरोधकांनी टीकेचा सूर लावला होता. मात्र पुढच्या चारच दिवसात शिंदे-फडणवीसांच्या साथीला जवळपास बारा मंत्री येणार असल्याचे बोलले जाते.**

### दोन टप्प्यात मंत्रिमंडळ विस्तार

पावसाळी अधिवेशनापूर्वी शपथविधीचा पहिला टप्पा होईल. यावेळी कमीत कमी मंत्र्यांचा शपथविधी करण्याचा भाजपचा प्रयत्न असल्याचे बोलले जात होते. पहिल्या टप्प्यात म्हणजेच येत्या २० तारखेला भाजपकडून पाच ते सहा जण मंत्रिपदाची शपथ घेण्याची चिन्हे आहेत. तर शिंदे गटातूनही पाच ते सहा जण कॅबिनेट मंत्रिपदाची शपथ घेण्याचे संकेत मिळत आहेत. भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील आणि दिग्गज नेते राधाकृष्ण विखे पाटील पहिल्या टप्प्यात कॅबिनेट मंत्रिपदाची शपथ घेण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तर शिंदे गटातून पहिल्या टप्प्यात कोणाची वर्णी लागणार, याची उत्सुकता आहे.

### ना १७ ना १९, वेगळीच तारीख ठरली

खरं तर मंत्रिमंडळ विस्तार १७ किंवा १९ जुलैला ठेवला जाण्याची शक्यता सुरुवातीला वर्तवली जात होती.



१८ जुलै रोजी राष्ट्रपतीपदासाठी मतदान होणार आहे. त्यावेळी सर्वच आमदारांना मुंबईत यावे लागणार आहे. त्यामुळे मतदारसंघातून त्यांना पुन्हा-पुन्हा मुंबईत यावे लागू नये, यासाठी आसपासची तारीख ठरली होती.

### शिंदे गटातील माजी मंत्री कोण?

१. एकनाथ शिंदे, २. गुलाबराव पाटील, ३. दादा भुसे, ४. उदय सामंत, ५. संदिपान भुमरे **राज्यमंत्री** १. बच्चू कडू, २. शंभुराज देसाई, ३. अब्दुल सत्तार.

### मंत्रिपदाचा फॉर्म्युला काय?

एकनाथ शिंदे यांच्यासोबत ४० शिवसेना आणि १० अपक्ष अशा ५० आमदारांचे पाठबळ आहे. चौघांच्या मागे एक, या सूत्रानुसार शिंदे गटाला एकूण १३ मंत्रिपदे मिळण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. यामध्ये कॅबिनेट आणि राज्यमंत्रिपद अशी एकूण संख्या आहे. शिंदे गटात असणाऱ्या पाच जणांकडे ठाकरे सरकारमध्ये कॅबिनेट मंत्रिपदं होती. एकनाथ शिंदे वगळता चार जणांसोबत आणखी एकाला सुरुवातीलाच मंत्रिपदाची शपथ मिळण्याची शक्यता आहे.

## चर्चेतली बातमी

### राज्यपाल हे काय सुरू आहे? राऊतांनी घेतला आक्षेप



आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** गेल्या काही दिवसांपासून राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ठाकरे सरकारचे निर्णय बदलण्याचे काम सुरु केले आहे. आरे मेट्रो कारशेड, इंधन कर कपात ते आज घेतलेला औरंगाबाद, उस्मानाबाद नामांतराचा निर्णय घेण्यात आले आहेत. यावर शिवसेना नेते संजय राऊत यांनी राज्यघटनेचाच हवाला देत थेट राज्यपालांनाच प्रश्न केला आहे. भारतीय राज्यघटनेच्या कलम 164 1A नुसार राज्याचे मंत्रीमंडळ किमान 12 मंत्र्यांचे असणे बंधनकारक आहे. त्यापेक्षा कमी संख्येचा मंत्रिमंडळाला घटनेची मान्यता नाही. गेले 2 आठवडे महाराष्ट्रात 2 मंत्र्यांचे मंत्रीमंडळ जे निर्णय घेतेय त्याला घटनात्मक वैधता नाही. राज्यपाल हे काय सुरु आहे, असा सवाल राऊत यांनी उपस्थित केला आहे. राऊत यांनी भारतीय राज्यघटनेच्या ६६ व्या पानावरील कलम 164 1A चा फोटो पोस्ट केला आहे. यामध्ये मंत्रिमंडळामध्ये राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री धरून विधानसभेच्या एकूण सदस्य संख्येच्या जास्तीतजास्त १५ टक्केच मंत्री असू शकतात असे म्हटले आहे.

## महत्त्वाची बातमी

### पंजाबमध्ये महात्मा गांधींच्या पुतळ्याची विटंबना



आधुनिक केसरी न्यूज

**भटिंडा :** रामा मंडी भागात असणाऱ्या गांधी पार्कमधील महात्मा गांधींच्या पुतळ्याची विटंबना करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. शुक्रवारी (१५ जुलै) मध्यरात्रीच्या सुमारास ही घटना घडली. रामा मंडी भागात असणारे गांधी पार्क उद्यान स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यालयाला शेजारी आहे. उद्यान नागरिक रोज फिरण्यासाठी येतात. आज पहाटे फिरण्यासाठी आलेल्या नागरिकांना हा पुतळा तुटलेल्या अवस्थेत दिसला. त्यानंतर त्यांनी या घटनेची माहिती पोलिसांना दिली. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थितीचा आढावा घेतला. दरम्यान, पोलिसांनी याप्रकरणी अज्ञातांविरोधात गुन्हा दाखल केला असून परिसरातील सीसीटीव्ही तपासण्यात येत असल्याची माहिती एसएचओ हरजोत सिंग मान यांनी दिली. तसेच आरोपांना कठोर शिक्षा करण्यात येईल, असेही ते म्हणाले. नागरिकांनी शांतता राखण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

# बंडखोरीच्या भीतीने काँग्रेसने पाच आमदारांना चेन्नईला हलवले

आधुनिक केसरी न्यूज



**पणजी :** आमदार फुटण्याच्या भीतीने गोवा काँग्रेसने आपले पाच आमदार चेन्नईला पाठवले असल्याची माहिती पुढे आली आहे. त्यामुळे राजकीय वातावरण पुन्हा तापू लागले आहे. तसेच गोव्या पुन्हा ऑपरेशन लोटस सुरू झाले आहे का? अशी चर्चा सुरू झाली आहे.

सुत्रांनी दिलेल्या माहिती नुसार, काँग्रेसने चेन्नईच पाठवलेल्या आमदारांमध्ये आमदार संकल्प अमोनकर, अल्टॉन डस्कोटा, कार्लोस अल्वेरा, रुडॉल्फ फर्नांडीस आणि युरी अलिमो यांचा समावेश आहे. गेल्या काहा दिवसांपासून गोव्यात काँग्रेचे आमदार भाजपात प्रवेश करणार असल्याची चर्चा होती. गोव्याचे काँग्रेस आमदार मायकेल लोबो हे काही आमदारांसह बंडखोरी करत भाजपा प्रवेश करणार असल्याचेदेखील बोलले जात होते. तसेच गोवा काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष दिनेश गुंडू राव यांनी काँग्रेस आमदारांना भाजपात प्रवेशासाठी २५ कोटी रुपयांची ऑफर दिल्या जात असल्याचादेखील आरोप केला होता. दरम्यान, गोवा काँग्रेसचे विरोधीपक्ष नेते मायकेल लोबो यांना विरोधा पक्षनेते पदावरूनही हटवण्यात आले होते. दरम्यान, काँग्रेस आमदार मायकल लोबो यांनीही आमदार बंडखोरी करणार असल्याच्या वृत्ताचे खंडण केले आहे. विधानसभा अधिवेशनापूर्वी जाणूनबुजून भाजपाकडून अफवा पसरवण्यात येत असल्याचा आरोप लोबो यांनी केला होता.

# दुसरे लग्न करण्यासाठी आता घ्यावी लागणार परवानगी; नीतीश सरकारचा आदेश

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** सरकारी कर्मचाऱ्यांच्या दुसऱ्या लग्नासंदर्भात राज्य सरकारने काही नियम बनवले आहेत. बिहार सरकारमध्ये कार्यरत असलेल्या सर्व कर्मचाऱ्यांना आता दुसरे लग्न करण्यासाठी परवानगी घ्यावी लागणार आहे. दुसऱ्या लग्नाससाठी पर्सनल लॉकडून परवानगी मिळाली असेल पण सरकारने नाकारली असेल तरी हे लग्न वैध मानण्यात येणार नाही.

नितीश सरकारने जारी केलेल्या आदेशांनुसार, पती किंवा पत्नी जिवंत असताना कोणी दुसरा विवाह केला तर तो ग्राह्य धरला जाणार नाही. तसेच, या संबंधातून जन्माला येणाऱ्या मुलाला अनुकंपा आधारित नोकरीसाठी दावेदाही मानण्यात येणार नाही. सरकारी कर्मचाऱ्यांचे सेवाकाळात निधन झाल्यास त्यांच्या जागेवर दुसऱ्या विवाहातून जन्माला येणाऱ्या अपत्याला नोकरी मिळणार नाही, असे सरकारने स्पष्ट केले आहे.



सरकारी अधिकाऱ्यांनी वा कर्मचाऱ्यांनी दुसरा विवाह करण्यासाठी परवानगी घेतली तरच पत्नी किंवा मुले अनुकंपा योजनेवर आधारित नोकरीसाठी हकदार बनू शकतील. सरकारने जारी केलेल्या नियमांनुसार, पहिल्या पत्नीचे स्थान प्रथम मानले जाईल. सामान्य प्रशासन विभागाच्यावतीने हे आदेश सर्व विभागांचे प्रमुख, डीजीपी, मंडळ आयुक्त आणि सर्व जिल्ह्यातील अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

### नियमांचे पालन करणे गरजेचे

सरकारी स्तरावरुन काढण्यात आलेल्या या आदेशांचे पालन करणे बंधनकारक आहे. पहिली पत्नी जिवंत असताना जर दुसऱ्या पत्नीच्या नियुक्तीची वेळ आल्यास पहिल्या पत्नीकडून शपथपत्र द्यावे लागेल. नितीश सरकारच्या या निर्णयामुळे कौटुंबीक स्तरावरील अनेक समस्या दूर होतील असा अंदाज बांधला जात आहे.

# वीरजवान रंगनाथ पवार यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

## महाजनपूर येथे शोकाकुल वातावरणात मुलगा सूरजने दिला अग्निडाग

आधुनिक केसरी न्यूज


शिरवाडे वाकद : महाजनपूर ता.निफाड जि.नाशिक येथील सीमा सुरक्षा दलाचे जवान रंगनाथ वामनराव पवार यांचे बाडमेर (राजस्थान) येथे कर्तव्य बजावत असताना दोन दिवसांपूर्वी निधन झाले. आज त्यांच्यावर महाजनपूर या त्यांच्या मूळ गावी शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले.

अनेक दिवसानंतर दोन दिवसांनी मुलगा घरी येणार असल्याचा आनंद कुटूंबातील आई, वडील पत्नी, भाऊ, मुले, मित्र परिवार व्यक्त करत होते. मात्र अचानक आपल्या मुलाला सीमेवर वीरमरण आल्याची बातमी वाऱ्यासारखी पंचक्रोशीत येऊन धडकली आणि सर्वांचे डोळे पाणवले. निफाड तालुक्यातील महाजनपुर येथील जवान रंगनाथ वामन पवार हे राजस्थानमधील बाडमेर सीमेवर सेवा बजावत असताना त्यांच्या छातीत अचानक कळ येऊन दोन दिवसांपूर्वी त्यांचे निधन झाले होते.



घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्याने त्यांनी देशसेवेसाठी जाण्याचे ठरवले. त्यांचे पहिली ते सातवी शिक्षण महाजनपूर येथेच झाले. सन १९९७ ला दहावी पास झाल्यानंतर २८ जुलै १९९८ ला भोपाळ (मध्यप्रदेश) येथील भरतीत त्यांना संधी मिळाली. त्यांनी हजारीबाग झारखंड येथे सहा महिन्यांचे प्रशिक्षण घेतले. त्यानंतर त्यांची सीमा सुरक्षा दलात नियुक्ती झाली. कुटुंबात अठरा विश्व दारिद्र्य, अशिक्षित आई, वडील, लहान भाऊ, बहीण यांना सांभाळण्याची जबाबदारी लहानपणी रंगनाथ यांच्यावर पडली. मात्र शरीराने धिप्पाड, प्रचंड मेहनती व हुशार असल्यामुळे बारावी शिक्षण झाल्यानंतर लगेच संरक्षण दलात नोकरीला सुरवात केली. सीमा सुरक्षा दलात सेवा करत हवालदार पदाला गवसणी घातली. त्रिपुरा, जम्मू काश्मीर, पश्चिम बंगाल, नागालँड, आसाम, राजस्थान या राज्यातील सीमेवर त्यांनी जवळपास तेवीस वर्ष सेवा केली. ते अजून एक वर्षांनी सेवानिवृत्त होणार होते. त्यानंतर घरी येऊन कुटुंबासोबत राहणार असल्याचे स्वप्न उराशी बाळगून असतांना अचानक सीमेवर ड्युटी करत असताना छातीत दुखायला लागले आणि उपचार करण्याअगोदर त्यांना वीरमरण आले. त्यांचे पार्थिव राजस्थानवरून पुणेपर्यंत विमानाने तर पुण्यापासून घरापर्यंत शासकीय वाहनाने आणण्यात आले. आज त्यांच्या मूळ गावी शोकाकुल वातावरणात त्यांचा मुलगा सूरज याने अग्निडाग दिला.

प्रसंगी माजी आमदार अनिल कदम, तहसीलदार शरद घोरपडे, सायखेडा येथील पोलीस निरीक्षक पी.वाय.कादी, जि.प.सदस्य सुरेश कमानकर, कमांडो धनंजय वीर, डॉ. सारिका डेर्ले, जगन कुटे, दिगंबर गीते, भाऊ विलास, आई, वडील, पत्नी, दोन मुले, बहीण यांनी पुष्पचक्र अर्पण करून श्रद्धांजली वाहिली. यावेळी निफाड तालुक्यातील अधिकारी वर्ग व नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पश्चात आई, वडील, भाऊ, पत्नी, दोन मुले असा परिवार आहे.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# एक सोहळा : आगळावेगळा...

आधुनिक केसरी

२० मे २०२२ रोजी पुण्यात एका छोटेखानी हॉलमध्ये एक आगळावेगळा सोहळा पार पडला. हा सोहळा होता व्रतबंध किंवा मुंजीचा. हा व्रतबंध सोहळा होता माझा अतिशय गोड नातू चि. स्वराज याचा. पण मुंजीबद्दल बोलण्याआधी माझी मुलगी चि सौ सारिका हिच्या सासरच्या मंडळींची पार्श्वभूमी सांगणे मला आवश्यक वाटते. सारिकाने आंतरजातीय विवाह केला. तिच्या आनंदाखातर आम्हीही तो आनंदाने करून दिला. तिच्या सासरकडील मंडळी माळी समाजाची. पण तिच्या लग्नापासूनच तिच्या सासरकडची माणसे आणि आमच्यामध्ये एवढे प्रेमाचे ऋणानुबंध निर्माण झाले की जातपात हा विचार कुठल्याकुठे पळून गेला. ते आमचे झाले आणि आम्ही त्यांचे झालो.

सारिकाच्या सासरकडील मंडळी मूळ विदर्भातील खामगावची. खामगाव, शेगाव याठिकाणी त्यांचा समाज, नातेवाईक. तिच्या लग्नानंतर काही निमित्ताने या नातेवाईकांना भेटण्याचा योग आला, त्यांच्या घरी जाणे झाले. या सगळ्या मंडळींच्या मनाच्या मोठेपणाचा प्रत्यय वेळोवेळी येत गेला. त्यातील काहींची आर्थिक परिस्थिती उत्तम तर काहींची अगदी साधारण. काहींची घरे लहान तर काहींची मोठी. पण त्या सगळ्यांमध्ये एक गोष्ट समान होती. ती म्हणजे मनाचा मोठेपणा. आपल्याकडे आलेल्याचे भरभरून अगत्याने स्वागत करणे, त्यांचा प्रेमाने पाहुणचार करणे या त्यांच्या गोष्टी मनाला स्पर्शून गेल्या. त्या सगळ्यात एक प्रकारचा अकृत्रिमपणा होता. उत्स्फूर्तपणे प्रेमपूर्वक केलेले स्वागत आणि औपचारिक स्वागत आपल्याला सहज लक्षात येते. चि सौ सारिकाच्या घरची सगळीच माणसे अतिशय प्रेमळ आणि धार्मिक. आल्यागेल्याचे मनापासून स्वागत करणारी. सारिकाचे यजमानही तिच्यासारखेच सी ए. सासरे कृषी अधिकारी म्हणून निवृत्त झालेले. दीर उच्चशिक्षित आणि अत्यंत बुद्धिमान. नणंद डॉक्टर. नणंदेचे दीर, यजमान यांनी स्वतःचा उद्योग सुरु करून आजमितीला एक यशस्वी उद्योजक म्हणून नावलौकिक कमावला आहे. अशा या परिवारात माझी मुलगी सून म्हणून गेली. यथावकाश चि स्वराजचा जन्म झाला. पण लवकरच तिच्यावर एक गंभीर प्रसंग ओढवला. पोटदुखीच्या आजारातून तिला कॅन्सर असल्याचे निष्पन्न झाले. सगळ्यांनाच मोठा धक्का बसला. अशा वेळी तिचे यजमान आणि सासरकडील सगळीच मंडळी तिच्या पाठीशी उभी राहिली. त्यांच्या खंबीर पाठिंब्याने आणि प्रयत्नांनी ती सगळ्या दिव्यातून बाहेर पडली आणि आज ती तिचे सगळे काम नियमितपणे करते आहे.

**(क्रमशः)**



## आनंदी पहाट

# एकमेकांवर विश्वास ठेवणे आवश्यक

आधुनिक केसरी

काहीवेळा प्रसारणाद्वारे नुकसान होण्याची शक्यता असते. प्रसारणाद्वारे होणारा तोटा म्हणजे जेव्हा जेव्हा माहितीची देवाणघेवाण होते, तेव्हा त्याची विश्वसनीयता कमी होते. हे बहुतेक वेळा तोंडी संप्रेषणाच्या बाबतीत दिसून येते. जेव्हा व्यक्ती निष्काळजीपणाने माहिती हाताळतात आणि काही सत्य गमावलेली माहिती प्रसारित करतात. अशाप्रकारे, इतरांकडे



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

पाठविल्या जाणाऱ्या अयोग्य आणि माहितीचा अभाव संप्रेषण प्रक्रियेत अडथळा म्हणून कार्य करते. हे तर अनेकदा गैरसमज पसरला जाण्यासाठी कारणीभूत ठरत असते. अविश्वास हे देखील अत्यंत महत्वाचे कारण असते. प्रभावी संवाद साधण्यासाठी, प्रेषक आणि प्राप्तकर्ता एकमेकांवर विश्वास ठेवणे आवश्यक असते.

जेव्हा दोन्ही व्यक्तींवरील विश्वासाचा आभाव असतो, तेव्हा त्या व्यक्ती संदेशामधून नकारात्मक अर्थ काढू शकतात आणि बहुतेक वेळेस जे सांगितले गेले त्याकडे दुर्लक्ष करतात. जर प्राप्तकर्त्यावर विश्वास नसेल तर तो प्रेषकाद्वारे जे काही सांगितले जात आहे त्याकडे तो लक्ष देणार नाही आणि याचा अर्थ असा नाही की निरर्थक संप्रेषण होईल.

अनेकदा भावनेच्या भरात काहीवेळा विचार, वर्तन आणि व्यवहार केले जातात. काहीवेळा संवादाचा एखाद्या व्यक्तीच्या भावनांवर खूप प्रभाव पडतो. जेव्हा एखादी व्यक्ती सकारात्मक वातावरणात नसेल तर जे काही बोलले गेले आहे त्यास ती व्यक्ती योग्यरित्या ऐकत नाही आणि प्रेषकास अपमानास्पद गोष्टी सांगत आहे असेच वाटत राहते. राग, चिंता, गोंधळ, अस्वस्थता इत्यादीसारख्या इतर भावना संवाद प्रक्रियेवर परिणाम करत असतात, हे समजून घेतले पाहिजे. अशाप्रकारे, प्रत्येक व्यक्तीचे मन वेगवेगळ्या मनोवैचारिकतेमध्ये कार्यरत असते, जे वेगवेगळ्या भावना, श्रद्धा, समज, मत आणि विचारांनी बनलेले असते.

## संस्कार धन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515

भाग-30

# बोलू द्या...

आधुनिक केसरी

मूलं लहान असो की मोठी त्यांना मोकळेपणाने बोलू द्या. व्यक्त होऊ द्या. त्यांचे मन मोकळं झालं पाहिजे .मग ती फ्रेश होतात. नसता चेहऱ्यावर कसलेतरी त्रासिक भाव दिसतात. चिडचिड करतात. कोणतेही काम करायला घेतले की ते चुकते .काही धड होत नाही असं त्यांना वाटतं. ती बेचैन होतात .कशातच लक्ष लागत नाही. त्यापेक्षा ते बोललेलेच अधिक बरे. त्यांच्या मनातील जळमटे, गढूळपणा निघून जातो. ती स्वच्छ होतात व मनही ताजे टवटवीत राहते. बोलणे मवाळ असावे. रूक्ष नसावे. त्यात भावना असावी. ओलावा असावा. आपल्या बोलण्यात हे सारं असेल तर मुलांच्या बोलण्यातही आपोआप येईल .बोलत राहिल्याने हृदयाचा रक्तपुरवठा सुद्धा सुरळीत राहतो. डोक्यात ,मनात सतत नकारात्मक विचार येत राहिले तर कामावर, शरीरावर, परिवार या सगळ्यांना त्रास होतो. "मौनम् सर्वार्थ साधनम् "असे आपण म्हणतो. पण कुठे मौन व कुठे बोलावे याचं तारतम्य आपल्याला असलं की सर्व सहज साध्य होते. नाहीतर सतत एखाद्याला नाव ठेवायचे आणि मग गरज पडली की, प्लिज प्लिज, करायचे. कामापुरता मामा नकोच. स्वार्थी लोकांपासून चार हात दूरच राहावे. कारण त्याचा त्रास त्यांना नाही होत. आपल्याला होतो. चांगुलपणा असणाऱ्या लोकांना होतो. त्यासाठी श्रवण भाषण वाचन लेखन या क्रिया योग्य वेळीच व्हाव्यात. मुक्तपणे व्यक्त सुद्धा होता आले पाहिजे. लेकरांना देखील मुक्त व्यक्त होण्याची सवय लावू या. बऱ्याच गोष्टी वेळीच बोलून दाखवल्या नाही तर कधीकधी परिणाम वाईटही होतात. न बोलल्यामुळे एकदाच जर स्फोट झाला तर तो महाभयंकर ही असू शकतो.

# प्रबोधन पंढरीचे वारकरी

आधुनिक केसरी

महाराष्ट्राला वैचारिक साहित्याचा समृद्ध वारसा आहे. इतिहासाची पाने चाळली तर राष्ट्रीय पातळीवरील विवेकवादी विचारांच्या रथाचे सारथ्य करण्याचे काम बहुतांश प्रमाणात मराठी भाषिकांनीच केले आहे. छत्रपती शिवराय, राजर्षी शाहू यांसारखे दृष्टे राजे याच मुलुखात झाले. वारकरी संतांनी दिलेले समतेचे तत्त्व, गाडगेबाबांचा स्वच्छतामंत्र, विनोबांचे भूदान, कर्मवीरांचे श्रमदान, बाबासाहेबांचे संविधान, महात्मा फुले दांपत्य व महर्षी कर्वेंची स्त्रीमुक्तीची आस, लोकहितवादी-आगरकरांचा विज्ञाननिष्ठेचा ध्यास हे सारे प्रथमतः मराठी मनातच घडत होते. स्वातंत्र्यानंतरही ही विचारांची पालखी मोठ्या श्रद्धेने वाहून अनेक मराठी सारस्वतांनी महाराष्ट्राच्या प्रबोधनपरंपरेच्या वारीत खंड पडू दिला नाही. आचार्य जावडेकर, नरहर कुरुंदकर, निर्मलकुमार फडकुले, प्रा.शिवाजीराव भोसले, नरेद्र दाभोळकर यांसारख्या विचारकांनी वैचारिकदृष्ट्या जागल्याची भूमिका स्वीकारून महाराष्ट्राला सतत जागे ठेवले. अलीकडील काळातील डॉ.पुरुषोत्तम जुन्ने हे या प्रबोधन पंढरीचे वारकरीच आहेत, हे त्यांचे लेखन वाचल्यावर प्रकर्षाने जाणवते.



डॉ. संदीप भुयेकर

'बोंबाबोंब' या सदरातून समकालीन सामाजिक परिस्थिती व घटनाक्रमांवर ते पूर्वग्रह विरहित भूमिका घेऊन सडेतोड भाष्य करतात. त्यांचे आकलन हे बहुआयामी असते. शैक्षणिक विश्वाने घातलेल्या विषयांच्या मर्यादा उल्लंघून ते वाचकाला विचारांच्या एका वेगळ्याच भावविश्वात घेऊन जातात; जिथे त्याला विचार करणे भाग पडते. प्रसंगपरत्वे ते संस्कृत, इंग्रजी, हिंदी या भाषांतले शब्दही शीर्षकासाठी चपखलपणे वापरतात. हळूहळू विषयाची ओळख करून देता देता ते त्या विषयाची अनेक अंगाने तपासणी करतात. आपले निवेदन सहजसाध्य होत नसेल तर प्रसंगी व्यंगात्मकतेचा आधार घेतात. विषयांची तार्किक मांडणी करतानाही शब्दांचे लालित्य ते अबाधित ठेवतात. विचारांचे दमन होत असलेल्या सांप्रतकाळी जुन्नेंसारख्या नवप्रबोधकांची एक फळी तयार व्हावे असे मनोमन वाटते. पत्रकारितेची आजची खरी अवस्था पाहता जुन्नेंचे विधायक नवलेखन या वठलेल्या झाडाची वसंतपालवी व्हावे, हीच सदिच्छा!

**(लेखक काशी हिंदू विश्वविद्यालय, वाराणसी (उत्तर प्रदेश) येथे मराठी विभागात सहायक प्राध्यापकम्हणून कार्यरत आहेत.)**

# सद्गुरूंचा अनुग्रह हेच भाग्य



आधुनिक केसरी

सत्पुरुषाचा अनुग्रह झाला म्हणजे त्या व्यक्तीच्या प्रापंचिक आणि पारमार्थिक बाबतीत त्या सत्पुरुषाचीच सत्ता असते. सरकारच्या हातात सर्व सत्ता असते, आणि राज्ययंत्र सुरळीत चालण्याकरिता एकेका खात्याकडे एकेक कामगिरी सोपविलेली असते. कायद्याला धरून जोपर्यंत ते खाते आपले काम करीत असते, तोपर्यंत सरकार त्यात ढवळाढवळ करीत नाही. फक्त क्वचित् प्रसंगी आणि विशेष कारणामुळेच, हस्तक्षेप करून सरकार आपल्या सत्तेचा उपयोग करते, आणि इच्छेप्रमाणे गोष्टी घडवून आणते. तोच नियम इथेही लागू आहे. प्रापंचिक बाबतीत 'प्रारब्ध' हे एक खाते आहे, त्याचा संबंध देहापुरताच असतो. प्रत्येकाच्या प्रारब्धानुसार त्याला बऱ्यावाईट गोष्टी भोगाव्या लागतात. सत्पुरुष होता होईल त्यांत ढवळाढवळ करीत नाही. फक्त व्यक्तीच्या कल्याणाकरिताच जर जरूर असेल, तर सत्पुरुष त्यात ढवळाढवळ करील. पण परमार्थाच्या बाबतीत त्याची सर्व सत्ता असते. आपण मात्र त्याने सांगितलेल्या साधनात राहून, त्याला त्याची कामगिरी करण्यात अडथळा न येईल असे वागणे जरूर असते. हा अडथळा अनेक प्रकारचा असतो. एक म्हणजे, त्याने सांगितलेल्या साधनाबद्दल शंका घेणे; दुसरे, दुसऱ्याला अमुक एक दिवसात साधले, मला अजून का साधत नाही, असा विचार मनात येणे; आणि तिसरे, सांगितलेल्या साधनापेक्षा काही अधिक किंवा कमी करण्याचा प्रयत्न करणे. थोडक्यात म्हणजे, एकदा संताच्या पायावर डोके ठेवल्यावर, आपला प्रपंच आणि परमार्थ ही दोन्ही त्याच्याकडे सोपवून, प्रपंचात घडणाऱ्या गोष्टी त्याच्याच इच्छेने घडताहेत अशी भावना ठेवून, आपले कर्तव्य करीत, त्याने सांगितलेल्या साधनात एकनिष्ठेने राहणे, हाच खरा मार्ग आहे. संताच्या देहाकडे पाहण्याचे कारण नाही; त्याचा देह आमचे काम करीतच नाही. तो परमात्मस्वरूप आहे ही जी आपली भावना, ती आपले काम करते. संत अत्यंत दयाळू असतात. सत्पुरुषाला भगवंत भेटलेला असतो. म्हणून, सत्पुरुष हा देहाने या जगात राहतो असे दिसले, तरी अंतर्यामी तो भगवंतापाशीच असतो. म्हणून आपण सत्पुरुषाकडे जात असताना या जगातल्या वस्तूविषयी वासना धरून गेलो, तर ते योग्य नव्हे. सत्पुरुषाला त्याच्या लक्षणांवरून ओळखता येणार नाही. पुस्तकामध्ये दिलेली जी लक्षणे असतात, त्यांच्या पलीकडे संत असतो. त्याला ओळखायला आपल्या अंगी थोडे तरी भगवंताचे प्रेम आवश्यकआहे. भगवंताचे प्रेम हे एक मोठे वेड आहे. जे ज्याला लागेल तो भाग्याचा खरा.

**-श्रीब्रह्मचैतन्य महाराज गोंदवलेकर**



# सद्गुरूंची मानसपूजा कशी करावी

आधुनिक केसरी

सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत "सदगुरू" सोडून आपल्याला दुसरा ध्यास नसावा, लहान मूल जसे आपली प्रत्येक गोष्ट आपल्या आईला सांगून करतो तसे आपली प्रत्येक गोष्ट सदगुरुंना सांगून करायाची सवय असावी. सदगुरुंची सचेतन मूर्ति मनश्चक्षूपुढे आणून मनातच तिची पंचोपचार किंवा षोडशोपचार पूजा करावी.

मानसपूजेमध्ये बाह्य पूजेतील सर्व उपचार म्हणजेच उत्तम वस्तू, फुले व नैवैद्य आपल्या कल्पनेने उत्तमोत्तम निर्माण करून मनांतल्या मनांत आणि अत्यंत शुद्ध व पवित्र भावनेने ते सदगुरुंना अर्पण करावेत.

पूजा आटोपल्यावर सदगुरुंच्या सचेतन मूर्तिचे विसर्जन न करता तिला आपल्या हृदयात विश्रांती द्यावी. 'तुमच्याशिवाय मला दुसरे कोणी नाही' अशा भावनेने अनन्य शरणागत होऊन मानसपूजा करावी.

मानसपूजेच्या शेवटी आपल्या हृदयात सदगुरुंची सचेतन मूर्ती स्थापन केल्यावर महाराज दिवसभर सतत आपल्या सन्निध आहेत आपल्याशी बोलत आहे, आपली प्रत्येक कृती ते पाहत आहेत ,आपल्याला मार्गदर्शन करीत आहेत, आपली कृती बरोबर असली तर ते अनुमोदन देत आहेत,आपली कृती चुकीची असेल तर तसे सांगत आहेत असा पक्का भाव म्हणजे मानसपूजा, ही भावना दिवसभर मनात धरून दिवसाचे सर्व व्यवहार सदगुरुंना सांगून करावयाचे अशी सवय लावून घेणे आवश्यक आहे.

दिवसभरात काही मनाविरुध्द झालं तरी यात माझं काहीतरी कल्याणच सदगुरू करीत आहेत असं वाटून घ्यावे त्याने आपल्यातील दोषदर्शन होतं ,मीपणा जातो आपल्या देहाला काही त्रास होत असला तरी सद्गुरूनाम घेणं चालू असावं ,त्याने दुखण्याकडे लक्ष राहत नाही, हे सद्गुरूनाम सदगुरुंच्या कृपेने आपल्या तोंडी येतं, किंबहुना सद्गुरूच त्याचं नाम घेतो हे सदगुरुंचं सांगणं संपूर्ण खरं आहे हे आपण अनुभवतो.

मानसपूजेच्या शेवटी सद्गुरूंना आपण आपल्या हृदयात विश्रांती ग्रहण करण्यास आपण सांगतो इतर पूजे सारखे मानसपूजेच्या शेवटी विसर्जन नाही तर विश्रांती आहे. म्हणजेच आपल्या इष्ट देवतेला आपण हृदयात स्थान ग्रहण करावे अशी विनंती करतो.

यातच मानसपूजेची खरी मेख आहे -ज्या सद्गुरूला आपण हृदयात विश्रांती घेण्यास सांगतो, त्यांना राहण्यास आपले हृदय पात्र आहे का याचा विचार आपण सर्वांनी केला पाहिजे व तसेच वर्तन ठेवले पाहिजे कारण आपल्या हृदयात प्रत्यक्ष आपले सद्गुरू विश्रांती घेत आहेत म्हणजे त्यांना विश्रांतीतून जागे करेल किंवा त्यांना त्रास होईल असे वाईट विचार व आणि असे गैर वर्तन दिवसभर आपल्या हातून होता कामा नये, नाही का?

थोडक्यात आपल्या हातून सदगुरुंना वाईट वाटेल असे काही घडता कामा नये, अशी एक वेगळीच जागरुकता आपल्या अंगी आली पाहिजे आपल्या हातून तरी जर काही चुकीचं घडलं आणि ते लक्षात आलं तर त्यांची क्षमा मागून पुन्हा असं न घडण्याचा प्रयत्न केला पाहिजे , मात्र तुमची सत्ता कायम माझ्यावर असू देत, असा भाव असला पाहिजे .मी तुम्हाला शरण आहे, जे तुम्ही कराल ते मान्य आहे.जितके हृदय पवित्र, शांत आणि नामाने भरलेले तितके सद्गुरूंना तेथे राहण्यास आवडेल ते आपल्या हृदयात विश्रांती घेत असताना आपण जर चुकीचे वागलो, दुसऱ्याचे अंतःकरण दुखावणारे बोललो, नीती सोडून आचरण केले, परनिंदा केली, थोडक्यात षडरिपुच्या स्वाधीन झालो तर त्यांच्या विश्रांतीला निश्चित धक्का लागेल याचे सतत भान असणे याचे नाव खरी मानसपूजा! हे भान जर सतत ठेवले तर आपला देहच मंदिर बनेल, आणि असे वागू लागलो कि आपला मीपणा आपोआप कमी होवून सद्गुरूविषयीचे प्रेम वाढीस लागेल.

अशी मानसपूजा हि दिवसाचे चोवीसही तास चालली पाहिजे त्यामुळे दिवसभरात आपल्या हातून कोणतेही वाईट कृत्य होणार नाही.व हळूहळू आपल्या वागणुकीत सुधारणा होईल.

# 1072 प्राथमिक पदवीधरांची वेतनश्रेणी रद्द करण्याचा निर्णय म्हणजे "चोर सोडून संन्याशाला फाशी.....!" असल्याचा शिक्षकांचा दावा

आधुनिक केसरी न्यूज

**सुनिल सिरसाट**

**बीड :** सीईओ अजित पवार साहेब आपण १००७२ प्राथमिक पदवीधरांची वेतनश्रेणी काढून घेण्याचा जो आदेश आपण काढलात, जो धाडसी निर्णय आपण घेतला त्याबद्दल आपलं करावं तेवढं कौतुक-अभिनंदन कमीच....! परंतु साहेब हा निर्णय घेताना कुठेतरी आपला अभ्यास कमी पडला असावा अन्यथा बीड जिल्हा परिषदेमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून पालीसारख्या चिकटून बसलेल्या काही बदमाश बाडगुळांनी आपली दिशाभूल केली असावी आणि मग आपण केवळ त्यांच ऐकून घेऊन हा असा आधा हकीम जान खतरे में...! म्हणतात तसं, त्याप्रमाणे अर्धवट माहितीनुसार हा निर्णय दिला आसावा अशीच काहीशी चर्चा सध्या जिल्हाभरातून ऐकावयास मिळत आहे. आपण सरळ सरळ 1072 शिक्षकांची वेतनश्रेणी काढून घेतल्यामुळे यात काही पात्र शिक्षकांच्या हक्कांवर गदा आणून हा प्रकार चोर सोडून संन्याशाला फाशी.....! असाच काहीसा दिसून येत आहे. तेंव्हा आताही आपण जरा खोलवर जाऊन पाहिलात तर नेमका काय प्रकार आहे. हे लक्षात येईल आणि यातूनही काहीतरी मार्ग निघेल व काढता येईल अशी आशा-अपेक्षा काही अन्यायग्रस्त शिक्षकांची आढळून आली.

सीईओ साहेब आपण काढलेल्या आदेशात असे म्हटले आहे की, सेवा जेष्ठता नसलेल्या शिक्षकांना, अंतर जिल्हा बदलीने आलेल्या शिक्षकांना, सदर प्राथमिक पदवीधरची वेतनश्रेणी चुकीच्या पद्धतीने देण्यात आलेली आहे.

तेंव्हा ही चुकीची पद्धत वापरली कुणी....? यास जबाबदार कोण....?? मुळात हा वेतनश्रेणीचा निर्णय कुणी-कसा आणि का घेतला.....??? याचीही चौकशी होणे अभिप्रेत असताना केवळ वेतनश्रेणी रद्द करून ती काढून घेतल्याने हा प्रश्न संपतो का अजित पवार साहेब.....???? याच्या मुळाशी जाऊन सखोल चौकशी करून संबंधीत दोषींवर अगोदर कठोरात कठोर कारवाई करून मग हा निर्णय घेतला असतात ना....., तर केवळ बीड जिल्ह्यानेच नाही तर आख्ख्या महाराष्ट्र राज्याने आणि शासनाने आपणास डोक्यावर घेतले असते. परंतु आपण तसे न करता अर्धवट उपचार करुन रुग्णांना डिस्चार्ज दिलाय. आपणास चांगलेच ठाऊक असेल की, आधाः हकीम जान खतरे में.....! असे किती घातक असते.

**हा अनागोंदी-मनमानी कारभार देवगुडे यांच्या काळातील**

सीईओ साहेब तत्कालीन शिक्षणाधिकारी देवगुडे यांच्या सहीने हे सर्व 1072 आदेश काढले असून त्यावेळी त्यांनी का डोळे बंद करून निर्णय घेतला का....?? साहेब शिक्षणाधिकारी तर शिक्षकांची सेवा जेष्ठता पाहिल्याशिवाय असे निर्णय घेत नाहीत. हे सत्य असताना केवळ 369 पदवीधरांनाच सदर वेतनश्रेणी देणे योग्य असताना मग हे 1072 शिक्षकांना शासनाच्या अशा कोणत्या निर्णया आधारे आदेश देण्यात आले......?? आमचे प्रतिनिधीच्या आधी लागलेल्या माहितीनुसार 2017 मध्ये प्रत्यक्ष समुपदेशन पद्धतीने बीड जि.प. सभागृहात सेवाजेष्ठतेनुसार 607 शिक्षकांना प्रत्यक्ष समुपदेशनास बोलावून त्यांचे समुपदेशन घेतले केले असता व त्यामधून किंवा 369 शिक्षकांची निवड केली असता ती यादी प्रसिद्ध करणे ऐवजी त्यांचे आदेश काढणे-निघणे गरजेचे असताना किंवा मोठी बॉर्डर होण्यासाठी हा आदेश बाजूला ठेवून मागेल त्या शिक्षकाला आर्थिक देवाण-घेवणीतून सदरील आदेशाचे वाटप करण्यात आले आणि त्यांना ही वाढीव वेतनश्रेणी लागू करण्यात आली असल्याची खात्रीलायक माहिती समोर आली.

**देवगुडे-सोनवणे-राजपुत आणि क्लार्क यांच्यावर का गुन्हा दाखल होत नाही ?**

हा सर्व प्रकार तत्कालीन शिक्षणाधिकारी प्रभाकर देवगुडे व कमी काम करणारे तत्कालीन शिक्षण विस्तार अधिकारी जे आजचे उपशिक्षण अधिकारी आहेत भगवान सोनवणे कक्षा अधिकारी जय लाल राजपूत संबंधित विभागाचे क्लर्क हे सर्वजण या जबाबदार जोशी असून त्या सर्वांनी शासन निर्णयानुसार काम करणे गरजेचे असताना पात्र नसणाऱ्या अपात्र शिक्षकांना जसे की सेवा जेष्ठ नसणे वस्ती शाळा शिक्षक अंतर जिल्हा बदली मिळालेल्या शिक्षक यांना वाढदिवसाच्या अटक केली मग खरे दोषी गुन्हेगार हे लोक असताना जे पात्र आहेत त्यांच्यावर कारवाई का.......?? सी ओ साहेब जर कारवाई करायचीच होती तर अगोदर पहिली कारवाई देवडे सोनवणे राजपूत व संबंधित विभागाचे क्लर्क यांच्यावर होणे गरजेचे तथा अभिप्राप असताना त्यांना पद्धतशीर बाजूला काढून ठेव शिक्षक कसे दोषी आहेत अशा भावनेतून सूडबुद्धीने दर्जा वाढ रद्दचे आदेश काढून प्रशासनाने चोर सोडून संन्याशाला फाशी दिल्याचा प्रकार या निमित्ताने दिसून येतोय. सीईओ अजित पवार साहेब आपण दिलेला आदेश कदाचित चूक नसेलही, परंतु मग आपण ज्या धाडसाने हा रद्दबातल निर्णय घेतला ते धाडस आपण वरील नामक दोषींच्या बाबतीत दाखवाल का......???? असा प्रश्न आपणास अन्याय झालेले सर्व पदवीधर विचारत आहेत.

**चूक कार्यालयाची-कर्मचाऱ्यांची आणि शिक्षेस पात्र शिक्षक हा प्रकार निंदनीय**

चूक करायची कार्यालयाने व कार्यालय प्रमुखाने, सोबतच्या कर्मचाऱ्यांनी. म्हणजेच शिक्षण विभागाने आणि मग शिक्षण विभागाने केलेल्या घोडचुकीची शिक्षा पात्र शिक्षकांना का शिक्षण विभागाच्या वेळोवेळीच्या गलतन कारभारामुळे शिव साहेब आपल्यासारख्या कर्तव्यदक्ष शिस्तबद्ध आयएएस अधिकाऱ्याची बदनामी होणे हे बीड जिल्हा वाशियास प्रशासनास आणि आपणास ही कितपत योग्य वाटते याबाबत आपण काही जाब विचारणार नाहीत का? काहीच ठोस पावला उचलणार नाहीत का........????? तेंव्हा याबाबत आपली भूमिका कळणे गरजेचे आहे......!

(क्रमशः उद्याच्या अंकात)

# ओबीसींना आरक्षण देण्यास शिंदे-फडणवीस सरकार कटिबद्ध : बावनकुळे

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** सर्वोच्च न्यायालयाने सांगूनही महाविकास आघाडी सरकारने ओबीसींना न्याय देण्यासाठी काहीच केले नाही. शिंदे-फडणवीस सरकार ओबीसींना राजकीय आरक्षण देण्यास कटीबद्ध आहे. आतापर्यंत ओबीसींना केवळ फडणवीस सरकारच्या काळात न्याय मिळाला होता. सर्वोच्च न्यायालयात १९ जुलैला सुनावणी असून सरकार योग्य बाजू मांडणार आहे. पुढील निवडणुकीत ओबीसींना राजकीय आरक्षण मिळेलच, असा विश्वास माजी उर्जामंत्री आमदार चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला. त्याचवेळी त्यांनी माजीमंत्री छगन भुजबळ व विजय वडेट्टीवार यांना गप्प बसण्याचा सल्ला दिला.

बांठिया आयोगाच्या डाटावर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारे माजीमंत्री छगन भुजबळ व विजय वडेट्टीवार यांचा समाचार घेत आमदार बावनकुळे म्हणाले, ओबीसी आरक्षणाबद्दल अडीच वर्षे माजी मंत्री झोपले होते. डिसेंबर २०१९ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने इम्पेरिकल डाटा व ट्रिपल टेस्ट तयार करून अहवाल सादर करण्यास सांगितले, परंतु यांनी अडीच वर्षे काहीच केले नाही. मार्च २०२१ मध्ये पुन्हा सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिले. त्यानंतर पहिला आयोग तयार केला. त्याला डाटा गोळा करण्यासाठी ४३५ कोटी दिले नाही. आयोगाच्या बैठक सचिवांनी घेतल्या नाही. काहीच करायचे नाही, असे अलिखित आदेश दिले होते, ओबीसींच्या जागांवर धनधांडग्यांना लढवायचे होते, असा आरोप आमदार बावनकुळे यांनी केला. काहीच केले नसल्याने सर्वोच्च न्यायालयाने महाविकास आघाडी सरकारला अक्षरशः लाथाडले. त्यानंतर बांठीया आयोग तयार केला. बांठीया आयोगाची संपूर्ण कार्यवाही महाविकास आघाडी सरकारच्या काळात झाली. शिंदे-फडणवीस सरकार आल्यानंतर दुसऱ्याच दिवशी हा अहवाल सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आला. ओबीसींना आवश्यक २७ टक्के आरक्षण त्यात दर्शविले आहे. आता भुजबळ, वडेट्टीवार कुठल्या तोंडाने शिंदे-फडणवीस सरकारला आता जबाबदार धरत आहे, असा संतप्त सवालही आमदार बावनकुळे यांनी उपस्थित केला. मविआ काळातील सर्व निवडणुका ओबीसी आरक्षणाशिवाय झाल्या. या सरकारमधील या मंत्र्यांनी ओबीसींचा घात केला. उलट शिंदे-फडणवीस सरकारच्या काळात ९२ नगर परिषदांच्या निवडणुका पुढे ढकलल्या.

शिंदे-फडणवीस सरकारवर टिका करण्याचा यांना काहीएक अधिकार नाही. हा डाटा शैक्षणिक किंवा नोकरीसाठी नाही. हा डाटा केवळ राजकीय आरक्षणासाठी आहे. मात्र भुजबळ, वडेट्टीवार अचानक सरकार गेल्याने काहीही बरळत असून बावचळले असल्याची टिकाही आमदार बावनकुळे यांनी केली. यांनी आता गप्प बसावे, त्यांनी ओबीसी समाजाचे मोठे नुकसान केले. अडीच वर्षात ओबीसींसाठी एकही वसतिगृह बांधले नाही. ओबीसींसाठी पैसा आणायच्या खोट्या घोषणा केल्या, त्यामुळे ओबीसी समाज यांना सोडणार नाही. यांच्याच काळात हा अहवाल तयार झाला. आता अहवाल बरोबर नाही हे कुठल्या तोंडाने सांगत आहे, असा खरपूस समाचार त्यांनी घेतला.

**खासदार राऊतांना टोला**

सेनेचे खासदार संजय राऊत यांनी शिंदे-फडणवीस सरकारवर केलेल्या टीकेचा समाचारही आमदार बावनकुळे यांनी घेतला. खासदार राऊत एवढे बावचळले आहेत की त्यांना नागपुरात दौरा करावा लागला. राजकीय फायद्यासाठी महाविकास आघाडी सरकारने महाराष्ट्र उद्धवस्त केला. पुढील अडीच वर्षात खासदार राऊत यांना तोंड दाखवण्यासाठी जागा राहणार नाही, एवढे काम शिंदे-फडणवीस सरकार करेल, असेही बावनकुळे म्हणाले.

**ओबीसी आरक्षणात मराठा आरक्षण नाही**

मराठा आरक्षणाचा प्रश्नच वेगळा आहे. संविधानात एससी, एसटी आणि ओबीसी मिळून ५० टक्के आरक्षण आहे. मराठा आरक्षण द्यायचे असल्यास ते ५० टक्क्यांवरच जाणार आहे. ओबीसीच्या आरक्षणात मराठा आरक्षण येऊ शकत नाही. ओबीसींना काही ठिकाणी ४० टक्के, ३५ टक्के, २७ टक्के असे आरक्षण जाईल, असे आमदार बावनकुळे यांनी सांगितले.



# कन्नड शहराचे विरोधकांनी वाटोळे केले : सुरेश डोळस

## केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांच्या वाढदिवसानिमित्त रुग्णांना फळे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांच्या वाढदिवसानिमित्त ग्रामीण रूग्णालय येथील रुग्नांना फळे व बिस्कीट वाटप करून साजरा करण्यात आला. यावेळी कन्नड शहर अध्यक्ष सुरेश डोळस, ज्येष्ठ नेते रमेश नागरे, प्रशांत अग्रवाल, राजेंद्र गव्हाणे, सुधाकर देवकर, प्रदीप बोडखे, अजय देशमुख, प्रकाश शिरसे, संतोष पुसे इत्यादी पदाधिकारी यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी भाजप शहर अध्यक्ष सुरेश डोळस बोलतांना म्हणाले, कन्नड शहरात सुमारे वीस वर्षापासुन राष्ट्रवादी कॉंग्रेसची सत्ता होती. त्यांनी कन्नड शहराचे वाटोळे केले. शहरात ठिकठिकाणी कचरा, घाणीचे साम्राज्य, स्वच्छतागृहाचा अभाव, विकतचे पिण्याचे पाणी म्हणुनच यावेळी भाजपाच्या हातात एक हाती सत्ता द्यावी. आम्ही नक्की शहराचा काया पालट करू, असे ते बोलताना म्हणाले.

# भीमराव परघरमोल यांचे निवासस्थानी ग्रंथपठणास सुरुवात

आधुनिक केसरी न्यूज

**तेल्हारा :** भिमराव परघरमोल (लेखक व्याख्याता अभ्यासक फुले शाहू आंबेडकरी विचारधारा तेल्हारा जिल्हा अकोला) यांच्या निवासस्थानी वर्षावासास प्रारंभ होऊन 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' या ग्रंथच्या पठणास सुरुवात झाली.

सविस्तर वृत्त असे की, मागील दोन वर्षांपासून कोरोना महामारीमुळे बंद असलेली ग्रंथ पठनाची परंपरा दिनांक १३ जुलै २०२२ म्हणजे आषाढ गुरुपौर्णिमेपासून पुन्हा सुरुवात करण्यात आली. बौद्ध परंपरेमध्ये आषाढ पौर्णिमा ते अश्विन पौर्णिमा असा तीन महिन्यांचा कालावधी हा वर्षावासाचा कालावधी ठरवलेला असून, त्यामध्ये धार्मिक नीती तत्त्वांचे चिंतन व मनन करून त्याप्रमाणे समाज व्यवस्था निर्माण व्हावी असे अपेक्षित असते. त्यासाठी धर्मग्रंथांचे पठण करून त्यातील आचारधर्म समजून घेतला जातो. त्यासाठी भिमराव परघरमोल यांच्याकडे 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' या ग्रंथाचे पठण होत असून ते स्वतःच वाचन करतात. वाचन करताना प्रत्येक ओळींचे चिकित्सक विश्लेषण केले जाते, चर्चा घडवून आणली जाते. त्यामध्ये प्रत्येकजण आपला सहभाग नोंदवतो.

श्रवण व चर्चा करण्यासाठी शहरातील विविध जाती धर्माचे समविचारी बहुजन समाजातील अनेक लोकांची उपस्थिती असते त्यामध्ये राजेश नृपनारायण, गोपाल खोपाले, श्रीधर भगेवार, महादेव धुरंदर, विनोद आढाव गौतम वानखडे मिलिंद बोदडे, योगेश पोहरकर, संतोष पाटील देऊळकर, सिद्धार्थ बोदडे यांची नियमित उपस्थिती असते.





# टोकदार व्याज संवेदनशीलता



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**भविष्याच्या पोटात काय दडले आहे सांगू शकत नाही आणि आपल्या मानगुटीवरून भूतकाळाचा वेताळ उतरवू शकत नाही. या दोन्हीच्या झगड्यातून प्रचंड ताण निर्माण होतो, जो आपला वर्तमान बिघडून टाकण्यास कारण ठरतो. या द्विध्रुवात्मक ताणातून वर्तमानाची गळचेपी होते. आणि जेव्हा गळचेपी होते तेव्हा वस्तू टोकदार बनतात. आजची आपली संवेदनशीलता अशी टोकदार बनण्यामागे याशिवाय दुसरे काय कारण असू शकते? सभ्यता, संस्कृती, प्रेम, सौहार्द, सहानुभूती, अनुकंपा, अनुराग, दिल, दोस्ती दुनियादारीच्या गदारोळात कस्पटासमान कुठल्या कुठे उडून जातात हे कळतही नाही.**

माणूस संवेदनशील असणे चांगले, पण अट एकच. आपली संवेदना सकारात्मक, परस्पर सहकार्याची आणि मानवतेला ऊर्ध्वगामी नेणारी असावी. मनुष्यता उत्क्रांत झाली पाहिजे. अलीकडे मात्र आपण याच संवेदनशीलतेमुळे पश्चादगामी ठरतो आहोत, याचे भान कोणाला नाही. धर्म नामक वस्तूने माणसाचे जेवढे चांगले केले तेवढेच अहितही केले आहे. आजकालची व्याज संवेदनशीलता ही धर्माचीच देण आहे. आपापसात वैर करण्यास धर्म शिकवत नाही, ही कवी कल्पना म्हणून ठीक. परंतु जिथे चौकटी लादल्या जातात, सीमा आखून दिली जाते, तेथे पलीकडच्याबद्दल चौकटीतल्यांच्या मनात द्वेष असणार नाही तर दुसरे काय असणार? कारण माझा तो बाब्या आणि दुसऱ्याचं कार्ट ही भावना आपणांस उद्युक्त करते. आपण धर्म कविकल्पनांतून समजून घेऊ लागलो की बोंबाबोंब होणारच. धर्म आस्थेचा विषय असला तरी त्याचा आशय मात्र शुद्ध तत्त्वज्ञानानेच समजून घेणे इष्ट ठरेल. परंतु त्यात अडचण अशी की जगात नेहमी विचारापेक्षा सामान्य माणसास भावना प्रिय असल्याचे दिसते. म्हणूनच धर्मग्रंथातील कवणे भावनेला आवाहन करतात. अध्यात्म म्हणून जे काही तत्त्वज्ञान आलेले असते ते अत्यंत तुटपुंजे, धर्मभावनांचा परिपोष करणारे आणि निषेधात्मक स्वरूपाचे असते. हा निषेध सांस्कृतिक विविधतेचा असतो, व्यक्तीच्या स्वातंत्र्याचा असतो तसेच सर्व प्रकारच्या विविधतेचा हा निषेध असतो. जगात कोणताही धर्म अस्तित्वात येण्याच्यापूर्वी संस्कृती होत्या. याच काळात विविध देवतांची निर्मिती झाली. सामूहिक देवता वेगळी आणि प्रत्येकाचे आराध्य वेगळे असू शकत होते. अगदी माया, सिंधू, सुमेरियन, ईजिप्शियन, चीनी या कोणत्याही संस्कृतीत ह्या काही सामायिक गोष्टी पहावयास मिळतात; परंतु जेव्हा धर्म म्हणून विशिष्ट चौकट अस्तित्वात आली तेव्हा व्यक्तीच्या व्यक्तिगत दैवत कल्पनेचे अपहरण करून समूहाची देवता हीच सर्वांची देवता, जिला भजणे, पुजने आणि गोंजारणे अनिवार्य झाले. यात वावगे काही आहे का? वरकरणी यात वावगे काहीच वाटणार नाही, पण आपण जन्माला येतो ते व्यक्ती म्हणून, समाजरूपाने आपला जन्म हे समाज-सांस्कृतिक घटित होय. स्टाईल इज मॅन हिमसेल्फ किंवा व्यक्ती तेवढ्या प्रवृत्ती म्हणत असताना




त्या व्यक्तीच्या व्यक्तित्वावर समूह दैवत कल्पनेने एक प्रकारे घाला घातला जात नाही का? हा मूळ प्रश्न आहे. आजची संवेदनशीलता धर्माधारीत असल्यामुळे धर्म वगळून चर्चा करणे वांझपणाचे ठरेल.

धर्म प्रामुख्याने धारणेवर विसंबून असल्यामुळे नवनवीन वैज्ञानिक शोधामुळे, तुलनात्मक अध्ययनामुळे आपल्या धारणा तुटतात. आपणांस त्रास होतो तो धारणा तुटण्यामुळे नव्हे तर ती धारणा आपली असते म्हणून. मन द्विधास्थितीत अडकते. मान्य अमान्यांच्या ताणातून, द्वंद्वात्मकतेतून संवेदनशीलता टोकदार बनते. तुलनात्मक विचार, वैज्ञानिक विचार नवीन असल्याने त्यावर पारंपरिक मन स्वार होते आहे, हे आपणास कळते. तरीही आपण परंपरेच्या हातातील खेळणे बनून राहतो, ही व्याज संवेदनशीलता होय. तार्किक, वैज्ञानिक अशा स्वरूपाचे कुठलेच अधिष्ठान आपल्या धारणेस नसणे आणि तरीही हेतूतः त्याचा पुरस्कार करून इतरांच्या संवेदनांचे दमन करणे, मारून टाकणे हे व्याज संवेदनशीलतेचे लक्षण होय. प्राणी जगतात सहजप्रवृत्ती विषयक संवेदना टोकदार असतात. माणसाने त्या आपल्यात तशाच शाबूत ठेवून त्यात आणखी भर घातली. पण माणसाने व्यापक व्यवस्था निर्माण करताना इतरांच्या स्वातंत्र्याचा अधिक्षेप करू नये, आपल्या संवेदनांचे टोक इतरांच्यात घुसू नये आणि संवेदनांतून स्वातंत्र्य अबाधित रहावे हा विचार त्यात अनुस्यूत असतो. जे.एस. मिल यांचा ऑन लिबर्टी, रसेलचे स्वातंत्र्य विषयक विचार, ओशो, नरहर कुरुंदकर यांचे तीन लेख याविषयीचे विचार हेच सांगतात की, स्वातंत्र्यात नैसर्गिक संवेदनांचा संकोच होऊन ते इतरांच्या स्वातंत्र्यास बाधा पोहचवणार नाहीत याची तजवीज केली जाते. दुसरे म्हणजे कोणापासून तरी स्वातंत्र्य आणि कशासाठी तरी स्वातंत्र्य या दोन गोष्टींचा विचार महत्त्वाचा ठरतो. कुरुंदकरांनी याचे फार छान विश्लेषण केले आहे. जिज्ञासूंनी ते अवश्य वाचावे. निव्वळ स्वातंत्र्य या शब्दास काही अर्थ प्राप्त होत नाही. तो शब्दयोगी अव्ययाचे काम करतो. संवेदनांचे स्वातंत्र्य हे धार्मिक, राजकीय, आर्थिक किंवा अन्य कोणत्याही स्वरूपाचे असू शकते. त्यामुळे एकाच काळातील, एकाच परिस्थितीतील आणि एकाच भावनेशी संबंधित संवेदना कोणाच्याही उन्नीस बीस स्वरूपात सारख्याच असणार, यात शंकाच नाही. तेव्हा पारस्परिक संवेदना जाचक ठरणार नाहीत याची काळजी केवळ समाजाने घेऊन भागणार नाही, तर प्रत्येक व्यक्तीने आणि प्रवृत्तीने घेतली पाहिजे. कारण व्याज संवेदनशीलता ही भस्मासुरासारखी असते. सुरुवातीला ती आपणास इतरांचे चिताभस्म पुरवते तेव्हा बरे वाटते पण आपल्या डोक्यावर कधी हात ठेवेल याचा काही नियम नसतो. तेव्हा अशा संवेदनशीलता जोपासताना आपल्यातील तार्किकता जागृत ठेवता आली तर उत्तम. आपण म्हणतो हा काळ संक्रमणकाळ आहे, पण तसे नसते. प्रत्येक काळ कमी अधिक प्रमाणात संक्रमणकाळच असतो. म्हणून काल आपण दक्ष होतो, आज दक्षता बाळगण्याची आवश्यकता नाही, असे म्हणता येणार नाही. एकूण मानव्याच्या कल्याणासाठी आपणास सातत्याने दक्ष असलेच पाहिजे.

**(लेखक गोदावरी कला महाविद्यालय अंबड येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**

## बोंबाबोंब कशासाठी?

**कोणत्या भावनांचा परिपोष करावा आणि कोणत्या भावना त्याज्य मानाव्या ह्याचे प्रशिक्षण स्वतःच्या मनालाच स्वतः दिले पाहिजे. धार्मिक पुस्तके वाचून व्याज संवेदनशीलता वाढत असेल तर त्यातून आपण काय घेतले पाहिजे, याचा सारासार विचार विवेकाने करून घेतला पाहिजे. भय, भूक, निद्रा, मैथून हे सर्व प्राण्यांत सारखेच. परंतु यापेक्षा माणूस म्हणून आपल्यात विवेक वाढला तर काही वेगळेपण शिल्लक राहील. अन्यतः प्राणीपातळीवर आपण सारखेच. ज्या संवेदनेमुळे इतरांचे अहित होईल, इतरांच्या स्वातंत्र्यावर घाला घातला जाईल, त्या व्याज संवेदना समजून त्याज्य ठरवाव्या.**

तुकारामनीती
भाग 17

# तोची साधू ओळखावा । देव तेथे चि जाणावा ।।



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

प्रत्येक कलाकृती ही त्या त्या काळाचे अपत्य असते. एखादे शिल्प असो की एखादी वाङ्मयीन कलाकृती, ती त्या काळाचे प्रतिनिधित्व करत असते. त्यापैकीच जगद्गुरू संत तुकोबांचे अभंग सुद्धा त्यांच्या काळाचे सर्वश्रुत अपत्यच! तुकोबांची ही अपत्ये मात्र मोठी विचित्रच होती. ही जन्मली आणि भल्याभल्या प्रस्थापित, ढोंगी लोकांवर जणू आपत्तीच कोसळली! तुकारामांनी समाजाच्या अवडंबर, बेगडी, वरपांग आणि दाखवेगिरी करणाऱ्या लोकांच्या श्रीमुखात सणसणीत चपराक ठेऊन दिली! त्यामुळे भलेही त्यांना तथाकथित प्रस्थापितांचा मार खावा लागला, शिव्यांची लाखोली झेलावी लागली, तरी ते कुठेही शरण गेले नाहीत. तुकोबांच्या अभंगांनी कधीच कुणाचे लांगुलचालन अथवा दुर्जनांचा उदोउदो केला नाही. त्यांच्या अभंगांनी कधीच दुष्टांची तळी उचलली नाही. अगदी त्यांच्याच अभंगात सांगायचे झाले तर,

**तीक्ष्ण उत्तरे | हाती घेऊनि बाण फिरे |**
**नाही भीड भार | तुका म्हणे साना थोर ||**

लहान असो की मोठा, कुणाचाही भीड-भार न ठेवता सातत्याने समाजाची भलावण-कानउघडणी करणारं, कालजयी वाङमय निर्मितीचं महत्कार्य तूकोबांनी केलं. त्याचा परिपाक म्हणजे आज एकविसाव्या शतकांत सुद्धा तुकोबाराय तुम्हा-आम्हाला समकालीन वाटतात. तेराव्या शतकातील महाराष्ट्राचे अवलोकन केले असता, वर्णव्यवस्था, जातीभेद, उच्चनीचता, कर्मकांड आणि धर्माच्या नावाखाली धर्ममार्तंडांनी प्रचंड उच्छाद मांडला होता. लोकांना भयंकर कर्मकांडात अडकवले जात होते. अनेक बुवा-बाबांनी आपले व्यभिचारी व्यवसाय सुरु केले होते. खेड्यापाड्यातील बाया-बापड्या, भोळी-भाबडी माणसं म्हणजे या भोंदू बाबांचे कुरणच! हे लुटारू साधू म्हणजे "अवडंबर दावी मोठें, अंगीं सामर्थ्य खोटें." सर्वत्र धर्माचे स्तोम माजले होते. सर्वकाही धर्माधीष्टीत आहे असा भास करण्यात आला, परंतु खरा धर्म म्हणजे काय (?) हे मात्र कुणीच सांगितले नाही. सामान्य माणसाची स्थिती म्हणजे फासेपारध्याच्या जाळ्यात अडकलेल्या हरणासारखी झाली होती. शेंदराच्या दैवतांनी जन्म घेतला होता. त्यातच तुकोबा आणि कुटुंबियांना दुष्काळ आणि इतर संकटांचा सामना करावा लागला. तुकोबा, हे सगळे बदल जवळून पाहत तर होतेच आणि त्यावर त्यांनी आपल्या अभंग कीर्तनातून कोरडे ओढायला सुद्धा प्रारंभ केला होता. त्या परिस्थितीतूनच

**सेंदरीं हेंदरी दैवतें । कोण तीं पुजी भुतेंकेतें । आपुल्या पोटा जीं रडतें । मागती शितें अवदान ॥१॥**

असे परखड अभंग लिहून तुकोबा समाजमनाची स्वच्छता करत होते. संतांची लक्षणं काय आहेत आणि ईश्वराचे अस्तित्व कुठे आहे (?) हे तूकोबांनी वाचलं-अनुभवलं होतं. बाह्य वेषधारी संतपणाचा देखावा करणाऱ्या, भोंदू लोकांच्या पाठीमागे पळणाऱ्या भोळ्या-भाबड्या लोकांना तुकोबा खरा साधू किंवा संत कोण ? हे आपल्या अभंगातून आणि कीर्तन विवेचनातून सांगू लागले.

**जे का रंजले गांजले । त्यासि म्हणे जो आपले ।। 1।।**
**तोची साधू ओळखावा ।। देव तेथे चि जाणावा ।।धृ।।**
**मृदू सबाह नवनीत । तैसे सज्जनाचे चित्त ।। 2।।**
**ज्यासि अंपगिता नाही । त्यासि घरी जो हृदयी ।। 3।।**
**दया करणे जे पुत्रासी । ते चि दासा आणि दासी ।। 4।।**
**तुका म्हणे सांगू किती । तो चि भगवंताची मूर्ती ।। 5।।**
**(शा.अ.गाथा अ.क्र. 347)**

असे परखड आणि समाजाला योग्य दिशा दाखवणारे अभंग तुकोबा लिहून आपले उत्तरदायित्व निभावू लागले. घरी वडिलोपार्जित वारकरी परंपरा असल्याकारणाने त्यांनी संत जनाबाई, संत नामदेव, संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत कबीर, संत चोखामेळा, संत सावता महाराज आदि संतांच्या ग्रंथांचे सखोल अवलोकन केल्या कारणाने त्यांना संतांची लक्षणं बऱ्यापैकी माहित होती. श्रीमद् भगवतगीतेच्या बाराव्या अध्यायात श्रीकृष्ण भगवान

**अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रः करुण एव च । निर्ममो निरहङ्कारः समदुःखसुखः क्षमी ॥13॥**
**संतुष्टः सततं योगी यतात्मा दृढनिश्चयः । मय्यर्पितमनोबुद्धिर्यो मद्भक्तः स मे प्रियः ॥14॥**

ही संतांची लक्षणे सांगून गेले आहेत. त्यावर संत ज्ञानेश्वरांनी आपल्या ज्ञानेश्वरीमध्ये खालील अत्यंत महत्वपूर्ण ओव्या लिहिल्या आहेत.

**जो सर्व भूतांच्या ठायीं । द्वेषांतें नेणेंचि कहीं । आपपरु नाहीं । चैतन्या जैसा ॥ १४४ ॥**
**उत्तमातें धरिजे । अधमातें अव्हेरिजे । हें काहींचि नेणिजे । वसुधा जेवीं ॥ १४५ ॥**

या आणि अन्य ओव्या म्हणजे संतांची लक्षणे प्रतिपादन करून माऊलींनी भगवद्गीतेला श्रुंगारीत केलं आहे. माउलींनी ज्याप्रमाणे चैतन्य कोणत्याच जिवामध्ये भेद करत नाही, अथवा जो नेहमी संतुष्ट असतो तोच खरा संत होय. पाऊस असो अथवा नसो, ज्याप्रमाणे समुद्राचे पाणी कमी अथवा वाढत नाही त्याप्रमाणे संत हे कोणत्याही उपचाराविना संतुष्ट असतात. संत तुकारामांनी सांगितलेली संतांची लक्षणं म्हणजे त्याहीपेक्षा सहज सोपी सांगितली आहेत. संतांची लक्षणे विषद करतांना तुकोबांनी आणखी सहज, सरळ आणि सोपी लक्षणे सांगितली आहेत. रंजल्या-गांजल्या लोकांना मदत करणारा खरा संत, जो सज्जन अंतर्बाह्य अगदी लोण्यासारखा मऊ असतो तोच खरा संत आणि ज्या लोकांना बहिष्कृत केले आहे अथवा ज्यांना कोणीच वाली नाही अशा लोकांना हृदयाशी धरून अगदी आई सारखा जीव लावतो तोच खरा संत.

संतांची लक्षणे सांगतांना तुकोबाराय स्वतः ती लक्षणे जगले आहेत याचे अनेक दाखले त्यांच्याच अभंगात सापडतात. त्यांच्या घरी सावकारी होती, परंतु दुष्काळ पडल्यामुळे लोकांना कर्जाची परतफेड करणे शक्य नसल्यामुळे त्यांनी कर्जाच्या वह्या इंद्रायणीत बुडवून लोकांना कर्ज मुक्त केले. आपल्या मुलांना खाण्यासाठी आणलेली उसाची मोळी वाटेतच लेकरांना वाटून टाकली, आपली पत्नी अंघोळीला बसली असतांना न्हाणीघराच्या भिंतीवरील पातळ (लुगडे) भिकारणीला दान करून तुकाराम मोकळे झाले. असे एक ना अनंत उदाहरणे आहेत, जिथे तुकारामांनी रंजल्या-गांजल्या-शोषित-उपेक्षित लोकांमध्ये देव पहिला आणि त्यांना मदत केली. तुकोबा हे कृतीशील समाजसुधारक संत होते.

**उपकारिषु यः साधुः साधुत्वे तस्य को गुणः | अपकारिषु यः साधुः स साधुः सद्भिरुच्यते ||**

महासुभषितसंग्रहातील ही सर्वच लक्षणे तुकोबांना तंतोतंत लागू होतात. तुकोबा म्हणजे अपकार करणाऱ्यावरसुद्धा उपकार करणारे महामानव होते. त्यांना मारायला आलेल्या माणसांचा मार खावून त्यांचे दर्शन घेतले. असा महान परमार्थ त्यांच्या रोमरोमात संचरला होता. महाकवी कालिदासांनी आपल्या मालविकाग्निमित्रम् मध्ये

**पुराणमित्येव न साधु सर्वं न चापि काव्यं नवमित्यवद्यम्। सन्तः परीक्ष्यान्यतरद्भजन्ते मूढः परप्रत्ययनेयबुद्धिः॥**

ही सांगितलेली संतांची लक्षणे आणि तुकोबांनी सांगितलेली लक्षणे तंतोतंत जुळतात. त्यापुढे जाऊन सांगायचे झाले तर, ही सर्वच लक्षणे तुकोबांच्या जीवनात ठाईठाई उतरलेली दिसून येतात. प्रचंड बुद्धीमता, विवेक, काव्य आणि सर्वांभूती ईश्वर पाहण्याची क्षमता त्यांच्यामध्ये असल्यामुळेच तुकोबा संत झाले आणि त्यांनी स्वतःचा ईश्वरच करून घेतला असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही.

वर्तमानात तुकाराम नीती लिहितांना भोवताल पहिले तर अनंत प्रश्न आ वासून उभे आहेत. आजकाल सर्वत्र भरपूर पोपट फिरतांना दिसताहेत. ज्या संतांनी आपले जीवन खर्ची घालून आपल्या जीवनातील अनमोल अनुभव अभंगांच्या रूपाने लिहून ठेवले, तोच फुकटचा अनमोल ठेवा घेऊन शेकडो लोक त्यावर लाखो रुपये लाटत आहेत. कोणत्याही संताच्या लेखनाचे पेटेंट किंवा कॉपीराईट नाहीत. सर्वांसाठी खुले असलेल्या या भांडारातून अनेकांनी लाखो-करोडो रुपयांची माया जमवली असून आणखीही ती जमवत आहेत. सगळीकडे संतांच्या लक्षणाचा बाजार सुरु आहे.

**टिळा टोपी घालुनी माळा । म्हणती आम्ही साधू ।**
**दयाधर्म चित्ती नाही । ते जाणावे भोंदू ।**
**कलियुगी घरोघरी । संत झाले फार ।**
**वितीभरी पोटासाठी । हिंडती दारोदार ।।**

हा तुकोबांचा अभंग विद्यमान परिस्थितीत सुद्धा बऱ्याच अंशी लागू होतांना दिसत आहे. आज आपण सर्वांनी संत तुकाराम व्यवस्थित समजून घ्यायची वेळ आली आहे. आपण तुकोबांचे विचार जीवनात उतरवणे अत्यंत गरजेचे वाटते. आता तुकोबांच्या विचारांचा प्रचार-प्रसार करणे आपल्या हाती असून त्याचा योग्य अन्वयार्थ लावून लोकांपर्यंत पोहचवणे आपल्या सर्वांचे कार्य आहे. तेंव्हा, चला तर मग, खऱ्या अर्थाने ज्ञानोबा-तूकोबांनी सांगितलेली संतांची लक्षणे आपल्या जीवनात उतरवण्याचा प्रयत्न करू आणि तुकोबांचा लोकजागर सातत्याने चालू ठेवण्याचे महत्कार्य करूयात! जय तुकोबाराय!

**(टीपः लेखक हे व्याख्याता, कवी, लेखक, प्रबोधनकार, प्राणायाम प्रशिक्षक आहेत)**

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# वृक्ष आपले मित्र...!



अय्युब पठाण लोहगांवकर
संपर्क क्र. 9764350374

आधुनिक केसरी

**झाडांशी माणसांचे नाते हे फार वेगवेगळ्या प्रकारचे असते.अनेकांनी आपल्या प्रियजनांच्या स्मृतीचा गंध झाडांच्या रूपातून जपताना स्मृतिवने उभी केली आहेत. वृक्षांना आपले मित्र, नातेवाईक मानले आहेत. जर ही झाडे नसती तर माणसाचे जीवन अरूचिपूर्ण झाले असते. झाडे नसती तर हवा कशी हलणार? माणसांना प्राणवायू कसे मिळणार? झाडे नसती तर सावली कोण देणार? पोळणाऱ्या उन्हात क्षणभर जरी झाडाची सावली मिळाली तरी माणसाला हायसे वाटते. पाऊस कोसळू लागला की, माणसे झाडाखाली निवारा घेतात. केवळ माणसांनाच नाही तर पक्षी काही जनावरे यांचा झाडे हाच निवारा असतो. झाडे नष्ट झाली तर ती कोठे मुक्काम करतील? म्हणून निसर्गाचा समतोल राखायचा असेल तर प्रत्येकाने झाड लावलेच पाहिजे व ते वाचवलेच पाहिजे.**

“वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे पक्षीही सुस्वरे आळविती."हे संसारात राहूनही विरक्त जीवन जगणाऱ्या संत तुकाराम महाराजांचे बोल आहेत. प्रत्येक मनुष्याला आपलं जीवन जगण्यासाठी वनस्पतीचीआवश्यकता असते. वनस्पती आपल्याला चवदार फळे, सुवासिक फुले, शीतल छाया आणि औषधी पदार्थ, जाळण्यासाठी लाकडे इत्यादी सारे काही देतात. सुगंधाची खैरात करतात. भारतीय संस्कृतीत वृक्षांना फार महत्त्वाचे स्थान दिले गेले आहे. मानव आणि झाडे हे दोघेही निसर्गाचीच लेकरे आहेत. प्रत्येक मंगल कार्यात मानवाने वृक्षांना महत्त्वाचे स्थान दिले आहे. आम्रवृक्षांची पाने घरात बांधतात तेव्हा मंगल कार्य संपन्न होते. शुभकार्यात आम्रपल्लवांशिवाय कधी चालायचे नाही. आंब्याच्या डहाळ्या नेहमी हव्या असतात. लग्न -मुंज असो आम्रवृक्षाचे हिरवे पल्लव हवेत. सृष्टीचा आशीर्वाद हवा. आम्रवृक्ष म्हणजे प्रेम व पावित्र्य, माधुर्य व मांगल्याचे प्रतीक असते. कारण पर्यावरण हे आरोग्याचे मंदिर आहे व ते सर्वांनी मिळून उभारायचे आहे. भारतीय संस्कृतीमध्ये जे जे उदात्त आणि महान आहे, त्या सर्वांचाच जन्म हा वनांमध्येच झाला. वृक्ष आणि मानवाचे पूर्वीपासून फार जिव्हाळ्याचे नाते आहे. सत्यवचनी ऋषी मुनींना वनांमध्येच शांत आणि सात्त्विक वातावरणात त्यांना ज्ञान प्राप्त झाले व त्यांची तपस्या ही फळास आली. भगवान गौतम बुद्धाला बोधिवृक्षाखालीच ज्ञानाचा चमत्कार घडला म्हणूनच वृक्ष हे आम्हाला देवाप्रमाणे वाटतात.



झाडांशी माणसांचे नाते हे फार वेगवेगळ्या प्रकारचे असते. अनेकांनी आपल्या प्रियजनांच्या स्मृतीचा गंध झाडांच्या रूपातून जपताना स्मृतिवने उभी केली आहेत. वृक्षांना आपले मित्र, नातेवाईक मानले आहेत. जर ही झाडे नसती तर माणसाचे जीवन अरूचिपूर्ण झाले असते. झाडे नसती तर हवा कशी हलणार? माणसांना प्राणवायू कसे मिळणार? झाडे नसती तर सावली कोण देणार? पोळणाऱ्या उन्हात क्षणभर जरी झाडाची सावली मिळाली तरी माणसाला हायसे वाटते. पाऊस कोसळू लागला की, माणसे झाडाखाली निवारा घेतात. केवळ माणसांनाच नाही तर पक्षी काही जनावरे यांचा झाडे हाच निवारा असतो. झाडे नष्ट झाली तर ती कोठे मुक्काम करतील? म्हणून निसर्गाचा समतोल राखायचा असेल तर प्रत्येकाने झाड लावलेच पाहिजे व ते वाचवलेच पाहिजे. कारण फक्त झाडे लावूनच चालणार नाही, तर झाडे वाचल्यानेच देशही वाचू शकेल. त्यासाठी अग्निपुराणात सांगितले आहे की, एक वृक्ष लावणे म्हणजे तीन हजार पितरांचा उद्धार करणे होय. म्हणून वृक्ष हे कल्पवृक्षाचे प्रतीक आहे. झाडांमुळे घरात प्रसन्नता, शीतलता व संपन्नता वाढते. उच्च प्रतीची संस्कृती असलेल्या भारतात वड, पिंपळ उंबर, बेल, आंबा इत्यादी वृक्षांची पूजा केली जाते. आजकाल भौतिक सुधारणांच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात जंगलतोड करायची. मोठमोठे डोंगर, टेकड्या भुईसपाट करून सपाटीकरण करायचे. हे म्हणजे परस्परविरोधी कृती करणे आहे. म्हणजे शेखचिल्लीसारखे ज्या फांदीवर बसायचे तीच फांदी तोडण्यासारखी परिस्थिती आहे.

पर्यावरण प्रदूषण म्हणजे एक भयानक शापच आणि त्यावरचा उतारा हा त्यावरील उःशाप म्हणजे फक्त वृक्षारोपण! वृक्ष संवर्धन आहे. ज्यावेळी चिमण्यांची चिवचिव कोकीळ पक्ष्याचे कुहूकुहू आणि फुलपाखरांचा स्वच्छंदमुक्त विहार बंद होईल. ती वेळ म्हणजे मानवासाठी धोक्याची घंटा असेल. अर्थात परमेश्वराचंच दुसरं नाव म्हणजे निसर्ग.कारण निसर्गाने आपल्याला सृष्टिसौंदर्य दिले आहे. आपण निसर्गाला काय देणार? "करू संवर्धन पर्यावरणाचे, घडवू राष्ट्र समृद्धीचे, सुखाचे."मानवाला आवश्यक असणारा तीन सिलिंडरइतका प्राणवायू आपल्याला ही झाडे विनामोबदला देतात. तरीही आपण झाडांची कत्तल करावी? मानवाने हे अमानुष कृत्य कुठेतरी थांबविले पाहिजे. गणेशोत्सवासारख्या सामाजिक कार्यक्रमांतून वृक्षसंवर्धनाचा प्रचार व प्रसार करावा.शासनकर्ते, राजकारणी, गरीब - श्रीमंत, पुरुष - स्त्रिया या सर्वांनीच वृक्षाला आपल्या मुलाबाळांप्रमाणे जोपासावेत. कारण आंब्याची मधुरता,मिरचीचा तिखटपणा,काऱ्यांची कटुता, आवळ्यांचा तुरटपणा, चिंचेचा आंबटपणा, हे षडरस माणसाला कोठून समजणार? मोगऱ्याचा सुगंध,रातराणीचा मादक निशिगंध, चाफ्यांची तीव्रता तर गुलाबाचा मृदूगंध माणसाला कोठून अनुभवणार.

आपण वटवृक्षाची पिंपळाची मुंज लावतो. त्यांना पार बांधून देतो. आवळी भोजन करावे, वनात जेवावेत, झाडांच्या पानांवर जेवण्याची व्रते आहेत. देवाला तुळस हवी, बेल हवा, दुर्वा हव्यात, शमी हवी, देवाच्या पूजेच्या निमित्ताने रोज सकाळी अगोदर आपली फुलांशी भेट होते. तसेच दुर्वा - तुळस, बेलाशी भेट होते, असे स्नेहसंबंध भारतीय संस्कृतीने निर्माण केले आहेत. वृक्ष हे मुलांच्या नामकरणासाठी लागणाऱ्या पाळण्यापासून ते माणसांच्या अंत्यसंस्कारासाठी लागणाऱ्या सरणापर्यंत सदैव तत्पर असणाऱ्या सर्वात जिवलग मित्राला म्हणजेच वृक्षाला संपविण्याचा आम्ही जणू चंगच बांधला आहे. यासाठी विनोबाजी भावे म्हणतात. "निसर्गात प्रत्येक गोष्ट तिच्या आवश्यकतेच्या समप्रमाणात सुलभतेने उपलब्ध आहे. सर्वात प्राथमिक गरज हवेची असते. म्हणून नाक आहे तिथं हवा आहे. भस्मासुर हा ज्याच्या डोक्यावर हात ठेवील त्याचा भस्म करणारा होता. सुवटी भस्मासुराने स्वतःच्याच डोक्यावर हात ठेवून तो स्वतः भस्म झाला आहे. माणसाचंही शेवटी असचं होणार का?" गवत हा जमिनीच्या संरक्षणाचा निसर्गाचा उपाय आहे. म्हणून सर्वसामान्य जनतेने वृक्ष लागवडीबरोबरच वृक्षसंवर्धन करणे ही काळाची गरज आहे. यासाठी खूप करण्याचे ठरविल्याने ते होणार नाही तर प्रत्यक्ष अंमलबजावणीची गरज आहे.

वक्षलागवडीच्या बाबतीत अहिल्याबाई होळकरांच्या राज्यात प्रत्येक शेतकऱ्याला दरवर्षी पंचवीस झाडे लावावी लागायची. आज शिक्षणसंस्थापासून वृक्षसंवर्धनाचे उपक्रम हाती घेण्यासारखे आहेत. एक मूल एक झाड" ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्याची गरज आहे. प्रदूषणामुळे पाऊस पडत नाही. त्याचबरोबर मानवाला अनेक व्याधी जडल्या आहेत. डोळ्यांच्या, कानांच्या, फुफ्फुसाच्या, हृदयविकाराच्या, श्वसनाच्या व्याधी हे प्रदूषणामुळेच झाले आहे. म्हणून पुष्पवृक्ष, फलवृक्ष,छायावृक्ष या वृक्षांचा उद्देश एकच असतो. तो म्हणजे मानवाच्या जीवनात सुखाची हिरवळ निर्माण करणे. आयुर्वेदात तर वृक्षांना व फळांना अतिशय महत्त्व असून संपूर्ण आयुर्वेदाचा आधारच वृक्षवल्ली वनस्पती आहे. वृक्ष जिवंतपणी तर मानवाच्या उपयोगी पडतोच पण मृत झाल्यावरसुद्धा मानवावर अनंत उपकार करतो.

भारतातील ७१ सस्तन प्राणी ४४ प्रकारचे पक्षी २१ प्रकारचे सरपटणारे प्राणी आणि दोन हजार वनस्पती नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. झाडांचेच अस्तित्व नष्ट झाल्यामुळे मोठ्या प्रमाणात दरडी कोसळणे. भूस्खलन होणे यासारखे प्रकार घडत आहे. उदा. पुणे जिल्ह्यातील माळीण हे गाव भूस्खलनाचे बळी ठरले आहे. वड,पिंपळ कडूनिंब, चिंच, बेल, आंबा, कवठ व अशोक या वृक्षांचे दर्शन घेतल्याने आणि त्यांचे संगोपन केल्याने मनुष्याचा जन्म सार्थ होतो. सन २०३० सालापर्यंत हवेतील कार्बनडाय ऑक्साईड वायूचे प्रमाण वाढण्याची शक्यता आहे. सूर्याच्या अतिनील किरणांपासून मानवाचे संरक्षण करणारा ओझोन वायूचा थरसुद्धा वातावरणात निसटू पाहात आहे.

तसेच निसर्गात वटवाघळं हे वर्षभर झाडे लावण्याचे काम करीत असतात. रात्रभर एका झाडाच्या बिया दुसरीकडे टाकण्याचे काम अतिशय प्रमाणिकपणे वटवाघळं करीत असतात. आपण अनेक परदेशी झाडे लावून अन्नसाखळी नष्ट करण्याचे काम अतिशय वेगाने करीत आहोत. वटवाघळं मात्र स्थानिक देशी आणि बहुउपयोगी झाडे लावून निसर्ग समतोल ठेवण्याचे काम करतात. साधारणपणे ३५०पेक्षा जास्त जातीचे झाडे वटवाघळं निसर्गात रोपण करीत असतात. यात आंबा, जांभूळ, चिकू, बोर, उंबर, वड, पिंपळ, नांदरूक, मोहा, सीताफळ, रामफळ अशी अनेक फळ झाडे असून सर्वात अगोदर फळ पिकते हे वटवाघळाला समजते. यात पाडाला पिकलेला आंबा सुरूवातीला वटवाघळेच खातात. तसेच मुंग्या अनेक कीटक अनेक प्रकारच्या बिया जमिनीखाली घेऊन जात असतात. बहुतेकदा पावसाळ्यात या बिया रुजतात आणि यांचे खूप मोठे वृक्ष तयार होतात. महाराष्ट्रातील मराठवाडा विदर्भ या भागातील शंभर वर्षापूर्वीचे वने नष्ट झाली. डोंगर बोडके झाली. त्यामुळे या भागात पावसाचे प्रमाण फार कमी झाले असून नापिकाला कंटाळून शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहे. तर वाढत्या तापमानामुळे मानवाला उच्च रक्तदाब, हृदयविकार, मूत्रपिंडाचे विकार जडत आहेत. वृक्षांच्या परोपकार या गुणामुळेच ते सर्वत्र पूजले जातात.त्यामुळे वृक्ष हे संतच आहेत. संत हे निःस्वार्थी असतात. आपल्या जवळील सर्व काही देण्यात त्यांना आनंदच होत असतो. परोपकार हे त्यांच्या जीवनाचे ध्येयच बनलेले असते. त्याचप्रमाणे वृक्ष हे आपल्याजवळील फळे, फुले, छाया सर्व काही देण्यात कुचराई करीत नाही. ज्याप्रमाणे संत परोपकारासाठी स्वतःला वाहून घेताना कष्ट सोसतात. तसेच वृक्षही आपल्या अंगाखांद्यावर वेगवेगळ्या पक्ष्यांना खेळवतात. संत हे कुठेही गेले तरी तेथे लोकांची मने निर्मळ करून तेथील वातावरण शुद्ध ठेवत असतात. त्याचप्रमाणे वृक्षदेखील हे आपल्या श्वासोच्छवासाद्वारे प्रदूषण थांबवून वातावरण स्वच्छ करीत असतात. त्यामुळे संतांप्रमाणेच वृक्ष हे एकाच जागी थांबून जमिनीची धूप थांबविण्याचे काम सतत करतात. जोरदार वादळे झाली तरी ते आपली जागा सोडत नाहीत. आपल्या जीवनातला प्रत्येक क्षण ते दुसऱ्यासाठीच घालवतात. म्हणून वृक्ष हे आपले जिवलग मित्र आहेत.

# संवेदनाचे पदर उलगडणारा प्रसन्न कथासंग्रह : रंगप्रभा



दिनकर के. देशपांडे
संपर्क क्र. 9766488892

आधुनिक केसरी

**'रंगप्रभा' या सरोज देशपाडे लिखीत २६ कथांच्या संग्रहात कुटुंबातील नातेसंबध, स्त्रीयांचे प्रश्न, नात्यातील ताण तणाव या विषयांवरील सुंदर कथा आहेत. सासु-सासरे, पती-पत्नी, मुलगा- आई, सुन-मुलगा अशा नात्यांत आलेल्या समस्यांवर सरोजताईने अतिशय खेळकर शैलीत लघुकथा लिहिल्या आहेत. विशेष म्हणजे पानभर स्थलवर्णन किंवा व्यक्ती चित्रण न करता आटोपशीर शब्दांत कथा मांडण्याची त्यांची शैली अनोखी आहे. साधरणपणे मध्यमवर्गिय सून किंवा सासु-सासरे कसे असतात, याचा प्रत्यय कथेतील पात्राच्या संवादातून लगेच होतो. त्यामुळे त्यांचे वेगळे व्यक्ती चित्रण करण्याची गरज सरोजताईना भासत नाही.**

मानवी समाज जीवन हे प्रवाही आहे. यात समाज, कुटुंब, नातेसंबंध सातत्याने बदलत असतात. किंबहुना सामाजिक कौटुंबिक प्रश्नातून ताण तणाव निर्माण होतात. या तणावांचे नेमकं चित्रण करीत वाचकांना त्या समस्यांचा परिचय करुन देणाऱ्या कथा, कथाकार सरोज देशपांडे या लिहितात. अशा संवेदनाचे विविध पदर उलघडणारा त्यांचा नवा कथासंग्रह ‘रंगप्रभा’ रविवार १७ जुलै रोजी परभणीत प्रकाशित होत आहे. हा कथासंग्रह बदलत्या सामाजजीवनातील स्थित्यंतराचा परिचय देत, विविध सामाजिक समस्येचे भान वाचकाला देतो. म्हणूनच तो मनोरंजनाबरोबर वाचकांच्या मनात जीवनमूल्यांची पेरणी करतो, असे वाटते.

'रंगप्रभा' या सरोज देशपाडे लिखीत २६ कथांच्या संग्रहात कुटुंबातील नातेसंबध, स्त्रीयांचे प्रश्न, नात्यातील ताण तणाव या विषयांवरील सुंदर कथा आहेत. सासु-सासरे, पती- पत्नी, मुलगा- आई, सुन-मुलगा अशा नात्यांत आलेल्या समस्यांवर सरोजताईने अतिशय खेळकर शैलीत लघुकथा लिहिल्या आहेत. विशेष म्हणजे पानभर स्थलवर्णन किंवा व्यक्ती चित्रण न करता आटोपशीर शब्दांत कथा मांडण्याची त्यांची शैली अनोखी आहे. साधरणपणे मध्यमवर्गिय सून किंवा सासु-सासरे कसे असतात, याचा प्रत्यय कथेतील पात्राच्या संवादातून लगेच होतो. त्यामुळे त्यांचे वेगळे व्यक्ती चित्रण करण्याची गरज सरोजताईना भासत नाही. संवादातून कथा पुढे जाते, हे एक त्यांच्या कथेचे वैशिष्ट्य मानलं पाहिजे. साधी, सोपी, सरळ मांडणी, समस्येच्या मुळाशी जावून वाचकाला अस्वस्थ करते. शिवाय आटोपशीर लिखान हे सरोज ताईच्या कथांचे बलस्थान आहे.

रंगप्रभा या कथा संग्रहातील पहिलीच कथा 'आठवण ' ही स्त्रियांच्या स्वतःच्या करीयर बद्दलच्या आपेक्षांची, जिद्दीची गोष्ट सांगणारी आहे. मात्र त्याच वेळी मदत करणाऱ्या व्यक्तीविषयीची कृतज्ञता यश मिळल्यावर समोरची व्यक्ती कशी विसरते, याचा प्रत्यय देणारी आहे. मनोज या तरुणाचे निशा या नुकत्याच मॅट्रीक पास झालेल्या तरुणी सोबत लग्न होते. मनोज सरकारी नोकर असतो. पण निशाला खूप शिकून मोठे अधिकारीपद मिळविण्याचे स्वप्न असते. लग्नानंतरही मनोज स्वतः कष्ट घेय तिला शिकवतो. ती एम.पी.एसी ची परीक्षाही पास होते. अधिकारी होते. पण नंतर तिचे विचार मनोजशी पटेनासे होतात. दोघांच्या नात्यात ताणतणाव निर्माण होतो व दोघे वेगवेगळे होतात. पुढे मनोज दुसरे लग्न करतो. निशा एकटीच राहते. वीसेक वर्षाने अचानक भेट होते तेव्हा त्याने तीला प्रत्येकवेळी मदत केल्याची आठवण ती काढेल, असे त्याला वाटते पण ती ते करीत नाही. तेव्हा मनोज दुःखी होतो. अशी ही कथा पती पत्नीच्या नात्यातला दुरावा कसा वाढत जातो या समस्येवर बोट ठेवते.

'अपराधी कोण ? ' या कथेतून एड्स सारख्या भयंकर रोगाने पीडीत झालेल्या नवऱ्याला स्त्री कशी सांभाळते ते दाखवले आहे, तर 'घुसमट ' या कथा स्त्रियांना पुरुषांच्या निर्णयाविरुध्द आजही कसं उभं राहता येत नाही हे ठळकपणे दर्शवते. या कथेतील नायिका वैदेही ही आमदाराची बायको असते. पण तिला सामान्य स्त्रियांसारखं नवऱ्याशी मनमोकळे बोलायला आणि वावरायला मिळत नाही. त्यातच तिच्या धाकट्या बहिणीचे लग्न दीराशी जमवण्यात येते. तेव्हा तिला हे लग्न होवू नये असे वाटत असते. कारण हा श्रीमंतीचा थाट केवळ सोनेरी पिंजरा आहे. आपल्या बहिणीने या सोनेरी पिंजऱ्यात आपल्यासारखीच मैना होवून बसू नये असे तिला वाटत असते. पण ती त्याबाबत ना आईवडीलांना सांगू शकते ना नवऱ्याला. अशी तिची घुसमट लेखिकेने नेमक्या शब्दांत चितारली आहे.


त्याच पध्दतीने वंशाचा दिवा आणि पणती, विश्वास, यक्षप्रश्न, तरंग, भेट या सारख्या विविध स्त्री संवेदना प्रकट करणाऱ्या कथा या कथासंग्रहात आहेत. तसेच विनोदी अंगाने जाणाऱ्या माझी दंतकथा, स्वच्छता अभियान, काळी लक्ष्मी या कथाही मिष्किल भाषेत वाचकांना केवलानंद देतात. डिचार्ज, वै*फियत, अपराधी कोण आदी गंभीर प्रश्नांवरच्या कथाही वाचकांना निश्चितपणे अस्वस्थ करतील. साधी भाषा, प्रसन्न शैली आणि कथेचा आटोपशीरपणा यामुळे हा कथासंग्रह निश्चितच वाचकांच्या पसंतीस उतरेल याची खात्री वाटते.



# “तेरी आँखों के दिये...”

आधुनिक केसरी

**धर्म व त्यातील स्पृश्य-अस्पृश्य संघर्षावर बेतलेला बिमल'दांचा 'सुजाता' तर मी कितीदा पाहिलाय. त्यामध्ये नुतनने साकारलेली सुजाता आणि तिचं ते माणसातल्या माणुसकीला हादरवून सोडणारं सावळं रुप, अजूनही माझ्या रोमरोमांत सरसरतं! त्यातलं अधिरच्या (सुनील दत्त) ओठी तलतच्या मुलायम स्वरातलं, 'जलते है जिसके लिये...' हे गाणंही मी खूपदा ऐकलं बघितलंय. बिमल'दांनी इतक्या तरलतेनं आणि हळुवारपणानं ते टिपलंय की, एक अख्खी कविताच होवून ते काळजावर उतरत राहातं.**




दिलीपकुमार अन वैजयंतीमालाचा 'मधुमती' हा चित्रपट मी; औरंगाबाद कॉलेजला असताना १९७८-७९च्या दरम्यान केव्हातरी माझ्या पाहाण्यात आला होता. तेव्हा तिथल्या चित्रपटगृहांना मॅटिनी-शोला जुने चित्रपट लागायचे. तारुण्यातले कॉलेजचे ते फुलपंखी दिवस आणि इंद्रधनू स्वप्नांच्या रात्री, चित्रपटातील नायक-नायिकांमध्ये स्वतःला शोधण्यात जायच्या. आणि या गोष्टीला मीही अपवाद नव्हतो. 'मधुमती'मधील मधु (वैजयंतीमाला) त्यावेळी मला खूपच भावली होती; पण चित्रपटातील तिची व्यक्तिरेखा मला तितकीशी आकळली नव्हती. तेव्हाच्या त्या वयाची माझी प्रगल्भता त्यासाठी कमी पडली. मात्र, पुढे जेव्हा खोलात जावून विचार करायची सवय जडली आणि मी स्वतः लिहू सुद्धा लागलो त्यावेळी; मला आवडलेले, काळजात घर करुन असलेले जुने अभिजात चित्रपट पहायचा मग मी सपाटाच लावला. त्या सपाट्यात बिमल रॉयचे एकेक मास्टर-पीस 'परिणिता' (१९५४), 'बिराज बहू', 'परख', 'काबुलीवाला', 'सुजाता', 'बंदिनी' असे चाकोरीबाहेरचे चित्रपट माझ्या हाती लागत गेले आणि पडद्यावर सुद्धा कधी न पाहिलेल्या बिमल'दांच्या मी प्रेमातच पडलो. बिमल रॉय... निर्देशक, निर्माते आणि लेखक! अवघी चित्रपटसृष्टी ज्यांना बिमल'दा या नावानेच ओळखते. नेहमीचे राज रस्ते सोडून स्वतःची नवी वाट तयार करणारे हटके चित्रपट त्यांनी निर्मिले. त्यांचे चित्रपट म्हणजे शब्द, कला आणि भाव-भावनांच्या माध्यमातून समाजाच्या दांभिकतेवर ओढलेले चाबकाचे फाटकारेच होते.

१२ जुलै १९०९ला तत्कालीन पूर्व बंगालमधील सुत्रपूर ढाका (ढाका आता बांगला देशाचा भाग आहे.) येथील एका श्रीमंत बंगाली कुटुंबात त्यांचा जन्म झाला होता. त्यांचे वडील खूप मोठ्ठे जमीनदार होते. पण वडिलांच्या मृत्यूनंतर त्यांच्या इस्टेट मॅनेजरने त्यांना फसवून सर्व काही लुटून नेलं. या धक्क्यातून स्वतःला सावरत आपल्या आई आणि धाकट्या भावासह ते कलकत्याला निघून आले. कलकत्याला ते आले तेव्हा धैर्य आणि जागतेपणी पाहिलेली आपली स्वप्नं तेवढी त्यांच्यासोबत होती. हळुहळु परिस्थिती सुधारली तसे ते निर्देशक, अभिनेते आणि पटकथा लेखक प्रोथमेश चंद्र बरूआ यांचे सहाय्यक कॅमेरामन म्हणून कलकत्ता इंडस्ट्रीत काम करु लागले. त्यानंतर पुढे कलकत्त्यातील प्रसिद्ध 'न्यू थियेटर'मध्ये निर्देशक, सिने छायाचित्रकार आणि पटकथा लेखक नितीन बोस यांचे देखील सहाय्यक कॅमेरामन म्हणून त्यांनी काम पाहिलं. पुढे लाइटिंग आणि कॉम्पोझिशनमध्ये कमांड मिळवून सिनेसृष्टीत अल्पावधीतच ते नावारुपास आले.

एकदा असंच, के. एल. सैगलचा 'देवदास' (१९३६) बनविण्यात प्रोथमेश बरूआ मग्न असताना, बिमल'दांना 'देवदास'चं कथानक इतकं काही आवडलं की, मनात त्यांनी ठरवूनच टाकलं - पुढे, आपणही कधी असे मोठे निर्देशक बनू तेव्हा 'देवदास' पुन्हा आपल्या पद्धतीने बनवू! आणि खरंच, काही वर्षातच आपली जिद्द, मेहनत व कर्तबगारीने ते लवकरच एक निर्देशक म्हणून काम करु लागले. मात्र सुरवातीची काही वर्ष त्यांनी बंगाली चित्रपटांवर लक्ष केंद्रित केलं. 'उदयर पाथेय' (१९४४) हा वर्णभेदाविरोधात निर्मिलेला त्यांचा पहिला बंगाली चित्रपट! या चित्रपटाने सिनेसृष्टीतील बिमल'दांचं स्थान मजबूत केलं. दुसरे महायुद्ध आणि फाळणी यामुळे बंगाली सिनेमांचा खूप मोठा ऱ्हास झाला होता.

लवकरच बिमल'दांच्या लक्षात आलं की, कलकत्त्यातील चित्रपटसृष्टी ढासळत आलीये. तिथले निर्देशक, निर्माते, अभिनेते सगळेच मुंबईला स्थलांतरित होतायेत. मग काय, 'न्यू थिएटर्स'चा शेवटचा चित्रपट 'अंजनगढ' करुन बिमल'दा सुद्धा आपल्या टीमसह मुंबईला निघून आले. त्यांच्या या टीममध्ये संपादक ऋषीकेश मुखर्जीसह पटकथा लेखक नबेंदू घोष, सहाय्यक दिग्दर्शक असितसेन, चित्रपट लेखक कमल बोस आणि गीतकार, संगीतकार कवी सलील चौधरी या दिग्गजांचा समावेश होता.

मुंबईत आल्यानंतरचा 'बॉम्बे टॉकीज'साठी निर्मिलेला त्यांचा पहिला चित्रपट होता 'माँ'. त्यानंतरचा चित्रपट होता 'बाप बेटी'! १९५३ला मात्र, त्यांनी स्वतःची प्रोडक्शन संस्था 'बिमल रॉय प्रोडक्शन' ही स्थापन केली. आणि त्या प्रोडक्शनचा पहिला चित्रपट होता १९५३चा 'दो बिघा जमीन'. ज्या मध्ये सावकाराच्या कर्जाच्या जोखडात मान अडकलेल्या एका शेतकऱ्याची, शंभूची भूमिका बलराज सहानी सारख्या कसलेल्या अभिनेत्याने अभिनीत केली होती. बिमल'दाने या चित्रपटाला इतक्या अप्रतिम रितीने सादर केलं की, 'दो बिघा जमीन'ने इतिहास रचला. सर्वोत्कृष्ट चित्रपटाच्या दोन फिल्मफेअर पुरस्कारासह राष्ट्रीय पुरस्कारावर आणि आंतरराष्ट्रीय कान्स पुरस्कारावरही या चित्रपटाने आपली मोहोर उमटवली. हा पहिला भारतीय चित्रपट होता ज्याने यूके, चीन, कार्लोवी व्हेरी, कान्स, यूएसएसआर, व्हेनिस आणि मेलबर्नमध्ये प्रशंसाच नाही तर पुरस्कारही मिळवले. आता पर्यंतच्या सर्वोत्कृष्ट दहा चित्रपटांपैकी 'दो बिघा जमीन' हा एक मानला जातो.

पुढे, १९५५ला आपल्या मनातला 'देवदास' साकारण्याची इच्छा बिमल'दा यांना पूर्ण करता आली. दिलीप कुमार, सुचित्रा सेन आणि वैजयंतीमाला या त्रयींचा 'देवदास' (१९५५) आजही पारो आणि चंद्रमुखीच्या अभिनयासाठी याद केला जातो. 'देवदास'च्या पारोची भुमिका मीना कुमारीने करावी अशी बिमल'दांची इच्छा होती, पण काही कारणांमुळे ती भुमिका पुढे सुचित्रा सेनने साकारली होती. कवी आणि गीतकार गुलज़ार सुद्धा बिमल'दांचे चहेते शिष्य होते. त्यांनाही बिमल'दांसारखं चित्रपट निर्देशक व्हायचं होतं. पण ते कवी, लेखक आणि गीतकार झाले. भारतीयच नाही तर जागतिक चित्रपटांवरही बिमल'दांचा प्रभाव होता. फार कमी लोकांना माहितीये की ब्रिटिश सरकारसाठी त्यांनी दोन डॉक्युमेंट्रीज बनविल्या होत्या. १९५६ला गौतम बुद्ध यांच्यावर माहितीपट बनविला होता. 'कान्स' चित्रपट महोत्सवात या माहितीपटाचं खूप कौतुकही झालं होतं. पुनर्जन्माच्या कथानकावर बेतलेला त्यांचा 'मधुमती' हा एक माईलस्टोन चित्रपट! त्या चित्रपटाची प्रेरणा घेवून नंतरही काही चित्रपट आले 'द रेइनकारनेशन ऑफ पीटर प्राऊड' (१९७५), 'कर्ज' (१९८०), कन्नड चित्रपट 'युगपुरुष' (१९८९), तामिळ चित्रपट 'एनाकन येरुवन' (१९८४), आणि २००८ साली आलेला 'ओम शांती ओम'. रोमँटिक-रिअलिस्ट मेलोड्रामासाठी बिमल'दा प्रसिद्ध होते. मनोरंजनासोबत प्रबोधनाकडेही त्यांनी लक्ष दिलं. १९५९मध्ये पहिल्या मॉस्को आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात जुरीच्या सदस्यांमध्ये त्यांचाही सहभाग होता.

बिमल'दांच्या चित्रपटांबद्दल बोलायचं म्हटलं तर कोणत्या चित्रपटाबद्दल बोलावं असा प्रश्न पडतो. सगळेच तर लाजवाब, तेवढेच मनन, चिंतन करायला लावणारे होते! धर्म व त्यातील स्पृश्य-अस्पृश्य संघर्षावर बेतलेला त्यांचा 'सुजाता' तर मी कितीदा पाहिलाय. त्यामध्ये नुतनने साकारलेली सुजाता आणि तिचं ते माणसातल्या माणुसकीला हादरवून सोडणारं सावळं रुप, अजूनही माझ्या रोमरोमांत सरसरतं! त्यातलं अधिरच्या (सुनील दत्त) ओठी तलतच्या मुलायम स्वरातलं, 'जलते है जिसके लिये...' हे गाणंही मी खूपदा ऐकलं बघितलंय. बिमल'दांनी इतक्या तरलतेनं आणि हळुवारपणानं ते टिपलंय की, एक अख्खी कविताच होवून ते काळजावर उतरत राहातं! सुजाताच्या डोळ्यातले भावच नाही तर तिच्या हनुवटीवरचा तीळही मग, तिच्या हृदयीच्या उत्कट तरंगांबद्दल बोलू पाहतो. आसवांच्या लड्यांमध्ये दबलेले तिचे ते अबोल हुंकार, मनातलं रुदन अधिरला ऐकायला जावू नये म्हणून, ते; साडीचा पदर तोंडात दाबून धरणं... हे फक्त फक्त बिमल'दांमधला संवेदनशील फनकारच टिपू शकतो.

'जब तलक ना ये तेरे रस के भरे होठों से मिले
यूँ ही आवारा फिरेगा ये तेरी जुल्फों के तले...'

काय ते मजरूहचे आशय संपन्न शब्द... बस्स, गाणं ऐकत राहावं आणि बघत राहावं वाटतं!

'बंदिनी' मधल्या 'ओ रे माझी...' या गाण्याच्या वेळीची कल्याणीची (नुतन) द्विधा मनःस्थिती असेल वा, 'परख'मधलं 'ओ सजना...' बिमल'दांची एकेक फ्रेम म्हणजे खजिना आहे सृजनाच्या अविष्काराचा ! शैलेन्द्रने सुद्धा 'ओ सजना...' या गाण्यात,

'तुमको पुकारे मेरे मन का पपिहरा
मीठी मीठी अगनी में जले मोरा जियरा...' सारखी सुंदर शब्दरचना प्रसवलीये. त्यामुळेच की काय; रस की फुहार झाल्यासारखाच लताजींचा आवाज लागलाय. कृष्ण-धवल छायाचित्रण कसं असावं याचा जणू मापदंडच आहे हे गाणं! सजनाच्या आठवणींनी दाराच्या उंबऱ्यात उभी ती सीमा (साधना)... अगदी साधी-सोज्वळ आणि तेवढीच मनमोहक! पावसाच्या फुआरीतून ओठांवर आलेले लताजींचे ते स्वर, ती राजस झोपडी, झोपडीच्या पत्र्यावरुन टपटपणाऱ्या त्या पागोळ्या, पानांवरचे लकाकणारे दव, आणि धरित्रीला चुंबिणारे ताटीच्या झरोख्यातून टिपलेले ते पावसाचे चांदण थेंब... व्वा, कल्पकतेची भरारी म्हणतात ती ही!

त्या काळातील सर्वाधिक मानधन घेणारी अभिनेत्री मधुबाला ही, 'बिराज बहू' या चित्रपटातील मुख्य नायिकेची भूमिका साकारण्यासाठी उत्सुक होती. यासाठी तिने अनेकवेळा बिमल रॉय यांच्या कार्यालयाला भेटही दिली मात्र, तिचं मानधन आपल्याला परवडणार नाही या विचारांनी बिमलदा यांनी तिच्याऐवजी कामिनी कौशलला कास्ट केले. आपल्या महागड्या फीमुळे आपण भूमिका गमावली हे समजल्यावर मधुबाला म्हणालेली - 'बिराज बहू'च्या भुमिकेसाठी मला एक रुपया मानधन मिळालं असतं तरी चाललं असतं. कित्ती, काय अन कशा कशाबद्दल बोलू? बिमल'दा म्हणजे सृजनांचा अथाह आविष्कार आहे असं मी म्हटलं ते यासाठीच! मग, अनुपम अशा त्या चित्रपटांचं विस्मरण तरी कसं शक्य आहे?

'दो बिघा जमीन' (१९५४), 'बिराज बहू' (१९५५), आणि 'देवदास' (१९५६) या चित्रपटांसाठी सलग तीन वर्षे राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार जिंकणाऱ्या, आणि नवीन पिढीसाठी प्रेरणास्त्रोत बनून गेलेल्या बिमल'दांच्या पत्नीचं नाव मनोबिना रॉय होतं. बनारसमध्ये लग्न झालेल्या या दाम्पत्याला चार मुलं होती. निर्देशक म्हणून बावीस, आणि निर्माते म्हणून तेवीस चित्रपटांवर त्यांनी आपल्या 'बिमल रॉय प्रॉडक्शन'ची मोहोर सोडली.

आपल्या संपूर्ण कारकिर्दीमध्ये अकरा फिल्मफेअर, दोन राष्ट्रीय, आणि कान्स फेस्टिवलचं आंतरराष्ट्रीय पारितोषिक, हे मानाचे पुरस्कार त्यांना मिळाले होते. मात्र, एवढं असूनही या फनकाराचे काही चित्रपट व्यवसायिक दृष्ट्या पूर्णतः यशस्वी झाले नाही हे एक कटू वास्तव आहे. वयाच्या सत्तावन्नाव्या वर्षी ०८ जानेवारी १९६६ला फुफ्फुसाच्या कर्करोगाने निधन झालेल्या या महान व्यक्तिमत्वाची ओळख, खरं तर माझ्या शब्दांपलीकडली आहे. 'परिणीता' (१९५३), 'बेनाजिर', 'यहुदी', 'प्रेमपत्र', उसने कहाँ था' हे त्यांचे रसिक चाहत्यांना भावलेले आणखी काही चित्रपट!

बिमल'दा म्हटलं की आता डोळ्यांसमोर येत राहातील त्यांच्या चित्रपटातल्या सशक्त स्त्री व्यक्तिरेखा, आणि कानात नित्य वाजत राहातील मजरूहच्या लेखणीतून उतरलेली 'सुजाता'साठीची ती तरल स्पंदनं, जी आजही कितीतरी काळजात या गाण्याच्या रुपात चिरंजीव झालेली आहे -

'जलते है जिसके लिये, तेरी आँखों के दिये
ढूँढ लाया हूँ वोही, गीत मैं तेरे लिये...'


**(संदर्भः विकिपीडिया, यु-ट्युब, बिमल रॉय मेमोरियल आणि तबस्सुम टॉकीज.)**

## मला भावलेली सिनेरत्न



मनोहर मंडवाले, संपर्क क्र. 8879123236

# शिवसेनेची वाताहत टाळता आली असती



प्रकाश महागावकर
संपर्क क्र. 9422007361

आधुनिक केसरी

**शिवसेना पक्ष प्रमुख माननीय उध्दव बाळासाहेब ठाकरे यांना शिवसेनेतील पडझड थांबवता आली असती. आणि आपली झालेली फजिती टाळता आली असती. गेली अडीच वर्षे सत्तेचा माज आणि मुळातील हेकट स्वभाव, कुपमंडूक वृत्ती, वाकडं वाकडं बोलणं, शिवसैनिकांचे कांहीच न ऐकणे, कस्पटासमान वागणूक देऊन सतत उपमर्द करणे, दुर्लक्षित करणे, पक्ष म्हणून संघटन मजबूत करताना शाखाप्रमुख, उपप्रमुख, जिल्हा प्रमुख, नेते, उपनेते यांचेशी नियमीत संवाद साधने हे सगळे बंद पडले होते.**

शिवसेनेचा प्राण असणारे हिंदूत्व बासनात बांधून ठेवणे, शरद पवार साहेब यांच्या नको तितके आहारी जाऊन, तब्येतीचे आणि कोरोनाचे निमित्त पुढे करून मातोश्री वरूनच कारभार पाहणे. म्हणजे तसे भासवणे. अजितदादांचे हाती सरकार सोपवून आपण निश्चिंत राहणे. आपल्या आमदारांचे सोडा, मंत्र्यांचेही न ऐकणे. हिंदू हिताला तिलांजली देऊन नवाब मलिक यांची तसेच इतर मुस्लिम नेत्यांची झोळी बिनदिक्कत भरणे. आधी शहरातील सोयी सुविधा, रस्ते वगैरे सुधारणा करून मग औरंगाबादचे नामांतर करून संभाजीनगर करणे, उस्मानाबादचे धाराशिव करणे या मागणीला बगल देत साहेबांना खुष करणे या व अशा अनेक चूका उध्दव बाळासाहेब ठाकरे यांनी या अडीच वर्षात सातत्याने केल्या. मग कट्टर हिंदूत्ववादी शिवसैनिक, उपरे आधिकारपदाचे लालचीने आलेले बाहेरचे नेते यांना वाटाण्याच्या अक्षता दाखविणे हे प्रकार असंतोष पसरवत होते. हळू हळू हा असंतोष सर्व आमदार खासदारांमध्ये पसरत गेला. आणि मग देवेंद्र फडणवीस यांनी अचूक वेध घेत एकनाथ शिंदे यांना बळ दिले.
यूतीमुळे शिवसेनेचे 56 आमदार आणि 18 खासदार निवडून आले होते.  आज काय परिस्थिती झाली आहे. पन्नास आमदार (शिवसेनेचे 40 + 10 ईतर, म्हणजे अपक्ष आणि बच्चु कडूचे दोन) शिवसेना आमचीच खरी म्हणत उठाव करून बाहेर पडले. जवळपास 15 खासदार कोणत्याही क्षणी बाहेर पडण्याच्या म्हणजे शिंदे गटात सामील होण्याच्या तयारीत आहेत. त्यांनी तुर्तास उध्दव ठाकरेंना राष्ट्रपती पदाचे निवडणुकीत भाजपच्या म्हणजेच एनडीएच्या उमेदवार आदरणीय द्रौपदी मूर्मू यांना पाठिंबा देण्यासाठी मजबूर केले आहे. अनिच्छेने उध्दव ठाकरे यांनी आदिवासी महिला उमेदवार म्हणून द्रौपदी मूर्मू यांना मतदान करणार असे जाहीर केले आहे.  गिरे तो भी टांग उपर" याप्रमाणे संजय राऊत बडबडलेच की द्रौपदी मूर्मू यांना पाठिंबा म्हणजे भाजपला पाठिंबा नाही. काय वाटेल ते झाले तरी उध्दव ठाकरेंना भाजप जवळ जाऊच द्यायचे नाही असा चंग बांधलाय साहेबांनी आणि संजय राऊत यांनी.
त्याक्षणी विधानपरिषदेचे निवडणूकीनंतर शिंदेंसोबत 37/38 आमदार नॉटरिचेबल झाले आणि सुरतला गेल्याचे कळले तेंव्हाच स्वतः उध्दव ठाकरे यांनी तिथे जाऊन समेट करण्याचे उद्देशाने चर्चा करायला हवी होती. ईगो आणि साहेबांची, संजय राऊत यांची चिथावणी नजरेआड करून उध्दव ठाकरे यांनी पक्ष वाचवायला हवा होता. पण साहेबांचे आहारी म्हणजेच पर्यायाने पून्हा एकदा बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांविरोधात जाऊन संधी दवडली.
उठाव केलेल्या सर्व आमदारांचे फक्त एवढेच म्हणने होते की आयुष्यभर ज्या कॉंग्रेस पक्षाच्या विरोधात लढलोत, ज्यांचा हिंदूत्वाला विरोध आहे, त्या पक्षांबरोबर राहणे थांबवा आणि नैसर्गिक मीत्र, समविचारी पक्ष भाजपा सोबतच युतीत राहा.
हवे तर आम्ही भाजप श्रेष्ठींना तुम्हीच मुख्यमंत्रीपदी राहाल यासाठी तयार करतोत. फक्त अजितदादांचे ऐवजी देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री होऊन सरकार चालवतील तुम्ही मातोश्री वर आराम करा. पण उध्दवजींचा स्वभाव, बायकोच्या सल्ल्याने वागणे, प्रकृतीचा अनावश्यक बाऊ करणे यामुळे त्यांनी भेटायचे टाळले.
स्वतः पेक्षाही बाळासाहेब ठाकरे यांच्यावरील शिवसैनिकांचे प्रेमावर विश्वास असणारे उध्दव ठाकरे, समेट घडवण्यात कमी पडले.
युती म्हणून लढून देवेंद्र फडणवीस सरकारच्या उत्तम कारभाराचे जोरावर आणि नरेंद्र मोदी यांच्या लोकप्रियतेचा फायदा घेऊन आपले 56 आमदार आणि 18 खासदार निवडून आले तरी, आणि युतीला निर्विवाद बहूमत मतदारांनी दिलेले असतानाही जनमताला डावलून बंडखोरी केली, तिथेच पहीले पाऊल चूकले. मग साहेबांचे तालावर नाचत शिवसैनिकाला मुख्यमंत्री पद देण्याऐवजी साहेबांचे आग्रहाखातर स्वतःच मुख्यमंत्री व्हायचे ठरवले हे दूसरे चुकलेले पाऊल होते. मंत्रीमंडळात कमी महत्वाचे खाते किंवा बिन महत्वाचे खाते स्वीकारून राष्ट्रवादीचे वर्चस्व मान्य केले.
मग आपल्याच पक्षाच्या मंत्र्यांचे ऐकुण न घेणे, त्यांच्या अडचणी आणि तक्रारींची दखल न घेणे, साहेबांचे आणि नवाब मलिक, हसन मुश्रीफ व इतर मुस्लिम मंत्र्यांचे निर्णयांना विरोध न करता मुग गिळून बसणे. जमेल तितका वेळ मातोश्री वरच राहून, कधीतरी ऑनलाइन बैठकीत भाग घेत. अजीतदादांना राण मोकळे देताना स्व पक्षाकडे आणि मंत्र्यांचे म्हणण्याकडेही दुर्लक्ष केले.
मातोश्री मुस्लिमांसाठी सदैव खुली असते. पण स्वपक्षातील नेत्यांना कार्यकर्त्यांना बंधने आहेत. एक कार्यकर्ता मातोश्री बाहेर मृत पावला परंतू त्याच्या कुटूंबियांना मदत वगैरे केलेले ऐकीवात नाही.
बाळासाहेब ठाकरे यांच्या नावावर आणि पुण्याई वर प्रचंड विश्वास असणारे उध्दव ठाकरे यांना आपल्या मुलाचे भवितव्याची जास्त काळजी आहे. बाळासाहेब ठाकरे यांनी जाहीरपणे सांगितले होते की माझ्या मुलाला उध्दवला  सांभाळून घ्या. तसेच आता उध्दव ठाकरे म्हणत आहेत, माझ्या मुलाच्या भविष्याची



मी काळजी करू नको काय? आदित्य ठाकरे ला सांभाळून घ्या.
'विहीरीतच नसेल तर पोहऱ्यात कुठून येणार' या नुसार आदित्य ठाकरे याचे आहे. लहान वयातच वारसाहक्काने सत्तेत वाटा मिळाला तर त्याला आपण सर्वज्ञानी असल्यासारखे वाटायला लागले. आणि मग जेष्ठता, अनुभव, वकुब हे सगळे फाट्यावर मारून तो सर्वांना आदेश द्यायला लागला. उध्दटपणे बोलायला लागला, पाणउतारा करणे, अपमान करणे असले उद्योग चालू झाले. संजय राऊत यांना सर्वज्ञानी आणि आपले हितचिंतक समजून त्यांच्या बडबडीची  रि ओढणे सुरू झाले. एकंदर काय तर संजय राऊत आणि आदित्य ठाकरे यांनीच समेट होऊ दिला नाही. जेष्ठ आणि जुने नेते अश्या पद्धतीने पक्षाबाहेर गेले तर नवीन शिवसैनिक आपले कह्यात राहतील असे नाबालिक आदित्य ठाकरे याला वाटत आहे. म्हणून तर एकनाथ शिंदे म्हणाले आदित्य ठाकरेचे जेवढे वय आहे तेवढे आमचे राजकीय जीवन आहे.
राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत खासदारांचे दबावामुळे द्रौपदी मूर्मू यांना पाठिंबा जाहीर करूनही त्या मुंबईत येऊनही उध्दव ठाकरेंना भेटल्या नाहीत यातच संजय राऊत यांच्या अनावश्यक टिप्पणीचा परिणाम दिसत आहे. प्रतिभा पाटील, आणि प्रणब मुखर्जी जातीने मातोश्रीवर येऊन बाळासाहेब ठाकरे यांना भेटून विनंती करून, अभिनंदन करून गेले होते. पण द्रौपदी मूर्मू यांनी ते टाळले. का? याचा विचार उध्दव ठाकरेंना करावाच लागेल. पण तसे होणार नाही. अडकित्यात  अडकलेल्या सुपारीसारखी त्यांची अवस्था झाली आहे.
नाराजी व्यक्त करावी तर त्या न भेटताच गेल्या हे सत्य बदलणारच नाही आणि हा अपमान समजून पाठिंबाही काढून घेता येत नाही, कारण दिल्लीत शिवसेना खासदारांना त्या भेटलेल्या आहेत. आणि विरोध केला तर खासदार गठ्ठ्याने पक्ष त्याग करतील अशी अवस्था झाली आहे उध्दव ठाकरेंची. विरोधी पक्षाचे उमेदवार यशवंत सिन्हा हे विरोधकांचे एकमुखी उमेदवार आहेत असेही म्हणण्याची सोय नाही. झारखंड मुक्ती मोर्चा, बिजू जनता दल, वाय एस आर कॉंग्रेस, अन्नाद्रमुक, संयुक्त जनता दल, या सर्वच पक्षांनी द्रौपदी मूर्मू यांना पाठिंबा जाहीर केला आहे. शिवाय ज्या ममता दीदींनी हिरीरीने विरोधकांना एकत्र करण्याचा आटापिटा केला होता त्यांनी यात काय साधले असेल तर उपद्रवी, बिनकामी, तिरसट, दुरागृही यशवंत सिन्हा यांना तृणमुल कॉंग्रेसच्या उपाध्यक्ष पदाचा राजीनामा द्यायला लाऊन एक पिडा बाहेर काढली. त्यांच्याही पक्षाच्या बहुसंख्य आमदार खासदारांनी आदिवासी मतदार दुखवायचे नाहीत आणि पहीली महीला आदिवासी राष्ट्रपती होत असल्याने आम्ही त्यांनाच मतदान करणार असे सांगितले आहे. म्हणून तर ममता दीदी म्हणाल्या नरेंद्र मोदी यांनी आधीच विश्वासात घेऊन द्रौपदी मूर्मू यांना उमेदवारी देण्याचे सांगितले असते तर निवडणूकच बिनविरोध केली असती. विरोधकांनी उमेदवारच दिला नसता.
यशवंत सिन्हा यांची आज अशी अवस्था आहे की स्वतःचा पोटचा मुलगा आणि भाजपचे खासदार जयंत सिन्हा ही त्यांना मत देणार नाहीत.
एकंदर 65% मतदार द्रौपदी मूर्मू यांचे पाठिशी आहेत. एकतर्फी निवडणूक होणार आहे.
याच प्रमाणे वेळीच संकट ओळखुन उध्दव ठाकरेंनी समेट करून बंडखोरांनी जुळवून घेऊन भाजपा सोबत युतीत राहण्याचे ठरवले असते आणि उध्दव ठाकरेच  मुख्यमंत्री राहतील आणि भाजप सोबत मंत्रीमंडळात राहायचे ठरवले असते तर वाताहत टळली असती. परंतू आता उशिर झाला आहे. संजय राऊत आणि आदित्य ठाकरे यांच्या अनावश्यक टीकाटिप्पणी मुळे शिंदे गट खुपच दुखावला आहे. आता आमचीच शिवसेना खरी यावर ते ठाम आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापिठ स्थापन करून मग महाराष्ट्रातील राजकारणात निर्माण झालेला पेच घटनापीठ सोडवील,  असा निर्णय दिल्यामुळे शिंदे गटाला मोकळे रान आणि वेळ मिळाला आहे.
गावोगावची शिवसेना संघटना आपले बाजूला वळवून आपला शिवसेनेवरिल हक्क ते मजबूत करू शकतील. आपल्या हाताने आणि राजकीय डालपेचाचे अज्ञानातून उध्दव ठाकरे यांनी आपलाच वारसा हक्काने मिळवलेला पक्ष मोडीत काढायला सुरूवात केली आहे.
आजही हे बंडखोर आमदार आम्ही शिवसैनिकच असून बाळासाहेब ठाकरे यांचे पाईक आहोत असे सतत म्हणत आहेत. या चाळीस बंडखोर आमदारांची एकवाक्यता फारच प्रभावी ठरत आहे. संजय राऊत प्रमाणे वारेमाप बोलणे कांही दिवस सोमय्या यांनीही टाळले पाहिजे. उध्दव ठाकरेंचे भ्रष्टाचाराचे  प्रकरणी थोडे सबुरीने  बोलावे. आता ताणून धरले तर कदाचित निवडणूक आयोग, पक्ष, चिन्ह दोनीही  गोठवतील.
मग उध्दव ठाकरे "शिवसेना उध्दव ठाकरे" आणि शिंदे गट शिवसेना धर्मवीर बाळासाहेब" हे नाव घेतील. आणि नवीन चिन्हे दोघांनाही मिळतील. तात्पर्य काय तर उध्दव ठाकरे उघडे पडले आहेत. त्यांचे राजकीय अज्ञान उघड झाले आहे. बंद सव्वा लाखाची मुठ उघडी झाली आहे. राजकीय डावपेच, धुर्तपणा , मुत्सदेगीरी यापासून उध्दव ठाकरे कोसो दूर आहेत हे स्पष्ट झाले आहे. भविष्यात मनसे अजून भाजप जवळ येईल. आणि शिंदे सेना उर्वरित अडीच वर्षे शांतपणे देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली कारभार करेल. 2024 मध्ये निवडणूकी नंतर काय होईल ते पुढे पाहू.

# नकाराचा सूर नको



प्रा.भावना गांधिले
संपर्क क्र. ८२०८१७६०१४

आधुनिक केसरी

**आजच्या काळात एकूणच समाजात वावरत असताना सर्वत्र आपल्याला नकाराचा सूर अधिक प्रमाणात दिसतो. याला सामाजिक, आर्थिक, राजकीय घडामोडी कारणीभूत असलीतही; परंतु सतत नकारात्मक विचार केल्याचा परिणाम आपल्या कार्यशैलीवर होत असतो. याउलट घरातील महिलाची जर सकारात्मक विचारसरणी असेल तर ते घर आनंदानं भरलेलं दिसून येतं. त्याचबरोबर मुलांमध्येही सकारात्मकता वाढते.**

मात्र अनेक गृहिणींना न चा पाढा लावण्याची सवय असते. "आजचा दिवसच खराब आहे, नेहमी माझ्या सोबतच असे का होते?" अशा प्रकारचे विचार करण्याची अथवा बोलण्याची सवय अनेक जणींना असते. मात्र ही सवय चांगली नाही अशी सवय असल्यास ती ताबडतोब बदलण्याची गरज आहे. कारण दीर्घकाळ अशाच नकारात्मक पद्धतीने बोलत राहिल्यास आपल्यामध्ये देखील नकारात्मकता घर करून बसते. आणि त्याची आपल्याला माहिती नसते. म्हणून असे बोलण्यापूर्वी अथवा करण्यापूर्वी सावध व्हावे. आपल्या आजूबाजूची वयोवृद्ध माणसे नेहमी "शुभ बोल नाऱ्या" असे म्हणत असतात. यामागे आपण फक्त चांगले बोलावे असे नसून ऐकणाऱ्यालाही चांगले वाटावे आणि त्यामुळे घरातील  वातावरणही आनंदी रहावे हा उद्देश असतो.
नेहमी नकारात्मक विचार आणि तक्रार करणाऱ्या व्यक्तींपासून त्यांचे परिचित, मित्र आणि नातेवाईकदेखील अंतरावर राहू लागतात. याचा अनुभव अनेकांनी घेतलाही असेल. कारण रोजच्या कंटाळवाण्या आणि त्याच गोष्टीमुळे वातावरण सुस्त आणि तणावग्रस्त बनू लागते. अनेकजणींना मैत्रिणींसमोर नेहमीच छोट्या मोठ्या तक्रारी करत राहण्याची सवय असते. "या कामवाल्या बायांनी तर कंटाळवले आहे. जेव्हा पहावं तेव्हा न सांगता सुट्टी घेतात, महागाई किती आहे, किती घाण वातावरण आहे अशा प्रकारची वाक्य सतत ऐकणे आणि त्या गोष्टींबद्दल सतत तक्रार करत राहणे हे ऐकणाऱ्याला सुद्धा खरोखर कंटाळवाणे वाटते. अशा तक्रारी नेहमीच कुणी ऐकून घेत नाही. अशा वेळी आपण काय कराचे? काही महिलांचा मूड छोट्या-छोट्या गोष्टीमुळे चटकन बिघडतो. रस्त्यात ट्रेफिक जाम झाले, किंवा घरी मोबाईल विसरला, कामावर जाण्यासाठी उशीर झाला या गोष्टी देखील त्यासाठी पुरेशा ठरतात. तज्ज्ञांच्या मते अव्यवस्थित राहण्याची सवयदेखील मूड खराब करण्याला कारणीभूत ठरते. रहदारीसाठी उपाय घरातून थोड लवकर बाहेर पडावे. आपल्या सर्व वस्तू नेहमी योग्य जागी ठेवाव्या. घरातील कामे लवकर आटपून घ्यावी. उठण्याची वेळ निश्चित झाली तर इतर सर्व कामे अगदी वेळेवर पार पडतात. आणि अशा छोट्या त्रासाला आपण बऱ्याच प्रमाणात लांब ठेवू शकतो.
दुसऱ्या व्यक्तीमुळे मूड खराब होत असेल तर एक गोष्ट कायम लक्षात ठेवावी. आपल्या प्रमाणे जग चालत नसते तर आपल्याला स्वतःला परिस्थितीनुसार बदल करावे लागतात. सुरुवातीपासूनच मनाची तयारी करावी की मूड खराब करणाऱ्या व्यक्ती आपल्याला पालोपावली भेटेल. अशा व्यक्तींपासून त्रास न करून घेण्याचा सोपा उपाय म्हणजे त्यांच्या गोष्टी मनावर घेऊच नये. सकाळी उठल्यानंतर स्वतःलाच म्हणावे, की आजचा दिवस खूप चांगला जाणार आहे. हे छोटे छोटे नियम पाळले तर आपण नक्कीच खूप चांगला अनुभव घेऊ शकतो.
सतत तक्रारीच्या सुरातल्या गोष्टी ऐकल्यामुळे आपल्या विचार करण्याची प्रक्रिया हळूहळू नकारात्मकतेकडे वळू लागते. म्हणूनच शक्य तेवढ्या या गोष्टींपासून दूर राहण्याचा प्रयत्न करावा.



# आधुनिकतेच्या नावाखाली धर्म-संस्कार पायदळी तुडवणे योग्य नाही



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**कुठल्याही नाते संबंधाला नैतिकतेचा आधार आणि धर्म संस्काराचा पाया असला पाहिजे. तेंव्हा ते नाते संबंध टिकतील किंवा वृध्दींगत होतील. अन्यथा जेवढ्या लवकर नातेसंबंध निर्माण झाले तेवढ्याच लवकर ते संपुष्टात देखिल येतिल. म्हणुन आधुनिकतेच्या नावाखाली धर्म-संस्काराला पायदळी तुडवून पुढे जाता कामा नये. धर्म, कुल, मर्यादा पालन करण्याची मानसिकता निर्माण झाली पाहिजे. आणि कुठल्याही मुल्यावर अमिषाला बळी न पडता भौतिक संसाधनांच्या आहारी न जाता आपले धर्म-संस्कार उल्लंघन होणार नाही याची दक्षता सध्याच्या तरूण पिढी सोबत समाजातील प्रत्येक घटकाने घेणे आवश्यक आहे.**

आधुनिकतेच्या नावाखाली सध्याची तरूण पिढी खुप झपाट्याने बदलत आहे. हे सत्य नाकारता येणार नाही. याला सोशल नेटवर्क बऱ्यापैकी जबाबदार आहे. आणि याचा पहिला आघात हा समाजव्यवस्थेचा पाया आधारस्तंभ असणाऱ्या धर्म-संस्कारावर होत आहे. आणि या सगळ्या घडामोडीमध्ये फलनिष्पत्ती काय तर सरते शेवटी येणारे परिणाम हे संबंधीतांना व शेवटी समाजाला आत्मचिंतन करायला लावणारे आहेत. आधुनिकता नक्कीच स्वीकारा यामध्ये काळानुरूप काही वावगं नाही. परंतु कुठपर्यंत स्वीकारावी याला एक मर्यादा आहे आणि ती मर्यादा म्हणजे जिथं पर्यंत धर्म संस्काराचे उल्लंघन होणार नाही, पायमल्ली होणार नाही किंवा धर्म-संस्कार पायदळी तुडवले जाणार नाहीत. तिथपर्यंत आधुनिकतेच्या दिशेने पुढे जाण्यासाठी कुटुंब किंवा समाज यापैकी कोणालाही अडचण नाही. परंतु सध्याच्या परिस्थितीत अनेक आधुनिकतेच्या नावाखाली धर्म संस्कार पायदळी तुडवून उल्लंघन करून झालेले प्रकार आपण सामाजिक वातावरणात पाहतोय. आणि त्याची फलनिष्पत्ती पण आपण उघड्या डोळ्यांनी पाहतोय. हे पाहिल्यावर मग मात्र प्रश्न पडतो की, आपण कुठे चाललो आहेत. यावर मंथन-चिंतन करण्याची वेळ ही नक्कीच आली आहे.

आपल्या आजूबाजूला अनेक अप्रिय घटना घडामोडी घडत आहेत. ह्या घटना घडामोडी सर्वसाधारण नाहीत. ज्या घटना मधुन व्यक्तिगत नुकसान तर होतंच पण कुटुबांच आणि समाजाचे खुप मोठे नुकसान होते.या घटनांना आपण सध्या जरी अपवाद असलो तरी भविष्यात याचे लोन आपल्या दारापर्यंत येणार नाही याची शाश्वती कोणीही अधिकृतपणे देऊ शकत नाही. कारण आज जो सुपात आहे तो उद्या जात्यात असतो. म्हणून इतरांकडे पाहताना आपल्या वर अशी परिस्थिती ओढावु शकते. म्हणून प्रत्येकाने सजग आणि सावध होण्याची आवश्यकता आहे. आपण नेमकं कुठं कमी पडलो आहोत की आजकाल आधुनिकतेच्या गोंडस नावाखाली मुलं-मुली रातोरात नवीन विश्व निर्माण करत आहेत. आणि निर्माण झालेलं हे विश्व अल्पावधीतच नाहिस पण होत आहे. आणि मग उरतो तो पश्चात्ताप पण या सगळ्यामध्ये महत्वाची बाब ही आहे की, धर्म-संस्कार आणि जीवनमूल्ये यांची जपणूक एवढी पोकळ झाली आहे का की, त्याच एवढ्या सहज उल्लंघन व्हावं..?



आपल्या आजुबाजूला किंवा आपल्या ओळखीच्या कोणी चुकीचे आचरण केले तर आपण पुर्वलक्षी प्रभावाने त्याच अनुकरण करतो. संस्कारहीन कार्याचे जणुकाही आपल्याला वंशपरंपरागत अधिकार प्राप्त आहेत. असंच काहीसं आपल्याला वाटत असतं आणि त्याने केले मी पण केले पाहिजे. हा न्युनगंड तिथपर्यंत कधी आपल्याला घेऊन जातो हे कळत पण नाही. मग मी कुठे कमी आहे या पोकळ भावनेतून आपण सुद्धा तसंच कार्य करतो.

परंतु जेव्हा विषय संस्कारक्षम आचरणाचा असतो. तेंव्हा मात्र आपण दुरवरूनच फाटा मारतो. म्हणजे चांगली गोष्ट चांगली सवय सहजासहजी आपण स्वीकारत नाही.आणि वाईट किती लवकर झटपट स्वीकारतो. एकंदरीत काय तर कुठल्याही नाते संबंधाला नैतिकतेचा आधार आणि धर्म संस्काराचा पाया असला पाहिजे. तेंव्हा ते नाते संबंध टिकतील किंवा वृध्दींगत होतील. अन्यथा जेवढ्या लवकर नातेसंबंध निर्माण झाले तेवढ्याच लवकर ते संपुष्टात देखिल येतिल. म्हणुन आधुनिकतेच्या नावाखाली धर्म-संस्काराला पायदळी तुडवून पुढे जाता कामा नये. धर्म, कुल, मर्यादा पालन करण्याची मानसिकता निर्माण झाली पाहिजे. आणि कुठल्याही मुल्यावर अमिषाला बळी न पडता भौतिक संसाधनांच्या आहारी न जाता आपले धर्म-संस्कार उल्लंघन होणार नाही याची दक्षता सध्याच्या तरूण पिढी सोबत समाजातील प्रत्येक घटकाने घेणे आवश्यक आहे.
तसेच या बाबींकडे गांभीर्याने लक्ष देऊन धर्म-संस्काराचे महत्व तरूण पिढीला समजावलं पाहिजे. जेणेकरून भविष्यात असे अनर्थ होणार नाहीत.आणि यासाठी प्रत्येकाने योगदान देण्याची आवश्यकता आहे......!!

# म्युझिक टीचर (Netflix)



आधुनिक केसरी

तो सिमल्याच्या निसर्गरम्य वातावरणात राहत असलेला संगीतशिक्षक असतो. त्याचे वडील शास्त्रीय संगीतातले नामवंत व्यक्तिमत्त्व व गुरू होते. त्याच्या आयुष्यात निरनिराळ्या नात्यांनी पाच स्त्रिया येतात.
त्याची आई त्याला समजून घेणारी. त्याने सुखी, आनंदी असावे यासाठी आशेने डोळे लावून बसलेली. धाकटी बहीण मायाळू, साधी, मोजक्याच अपेक्षा/आकांक्षा असलेली.
दोघींच्या सहवासात शांतपणे जीवन जगणारा तो पोटापुरते इच्छिणारा, महत्त्वाकांक्षी नसणारा.
एके दिवशी त्याला मोठ्या घरचे बोलावणे येते. त्यांच्या तरुण मुलीला गाणे शिकवायचे असते. तरुण मुलीची आईच चौकशी करत असते, कमी पगारात ती गाण्याची शिकवणी ठरवून टाकते. शिकवणी सुरू होते, तरुण मुलगी आनंदाने शिकत असते.
गाणे शिकणारी आणि ते शिकवणारा - दोघे गाण्याची उत्फुल्ल मौज अनुभवतात .
निसर्गाच्या सान्निध्यात प्रफुल्लित मनांच्या सहवासाने आयुष्याला रंगत येत जाते.
एका संगीतस्पर्धेत तरुण मुलीला भाग घेण्यास शिक्षक प्रवृत्त करतो. तरुण मुलीचे ते स्वप्न नसते. तिला त्याच्याशी लग्न करून संसार थाटायचा असतो, त्याच्या प्रेमात न्हाऊन निघायचे असते.
त्याचे मत - तिने चांगली गायिका व्हावे , तिची प्रतिभा फुलवावी ... लग्न व संसार होईलच नंतर.
नियती वेगळेच घडवते . तरुण मुलगी गायनस्पर्धा जिंकते .
कालांतराने ती प्रसिद्ध गायिका होते . मुंबईला उच्च वर्तुळात वावरायला लागते .
तो पुलावर तिची वाट पाहत असतो . त्यांची भेट होत नाही . तिची आई त्यांना भेटू देत नाही.
दरम्यान तो रियाज करत रात्रीच्या नीरव एकांतात निसर्गाच्या जवळिकीत समाधान शोधत असतो . त्याचा रियाज त्याच्या नकळत आसुसून ऐकत राहणारी एक समवयस्क परित्यक्ता त्याला नकळत अचानक त्याला सामोरी येते. त्याचे कौतुक करते. ती दोघांचे प्रेम जाणून असते. त्याच्या मनात उचंबळून आलेली प्रीती तिच्यातल्या अभिसारिकेला भिडते. दोघे एकमेकांचे दुःख वाटून घेताना जवळचे सुख देऊ करतात. परंतु हा क्षणिक आनंद टिकणारा नाही, आपण हतबल आहोत हे त्यांना कळून चुकते.
आठेक वर्षांनी बहिणीचे लग्न ठरवायचे असते. त्याच सुमारास तिचा कार्यक्रम गावात ठरवला जातो. मित्रांकडून कार्यक्रमाची तपशीलवार माहिती मिळते. तिच्या भेटीची आशा त्याच्या मनातून मावळत जाते. जाणूनबुजून कार्यक्रमाचीच तारीख तो बहिणीच्या लग्नासाठी ठरवून टाकतो. लग्नविधी पार पडतात. त्याच मध्यरात्री तो



चित्रपट परीक्षण



नंदिनी देशमुख, संपर्क क्र. 9850018610

निकराच्या आवेगाने तिला भेटायला कार्यक्रमस्थळी जाऊन पोचतो. ती गाणे संपता संपता त्याला पाहते. दोघे एका ठरावीक अंतरावरूनच भेटतात. अश्रुभरल्या डोळ्यांनी एकमेकांना पाहत राहतात. पण घट्ट मिठीत जवळ घेऊ शकत नाहीत. तो अपराधी मनाने बोलत असतो. ती फक्त ऐकत राहते. आता वेळ गेली, एकत्र येऊ शकत नाही, एवढेच ती म्हणते.
तो घरी परततो. आई ओळखून घेते. बहिणीची पाठवणी होते. तो आतल्या आत उन्मळून पडलेला असतो ! परंतु भवतालची हिरवाई , डोंगरदऱ्या, उतरणीवरची कौलारू घरे, दाट वनराजी, त्यातून झिरपणारा सूर्यप्रकाश, पाऊस, गाणे आणि तिच्या आठवणी यांचे त्याच्या आयुष्याशी असलेले अतूट नाते मात्र कधीही संपणार नसते !! ती कितीही दूर गेली तरीही!

# उद्बोधक, मनोरंजनक : 'हास्यविवेक'




अस्मिता प्रदीप येंडे
संपर्क क्र. 9619035195

आधुनिक केसरी

**या पुस्तकातील व्यंगचित्रातून मेहेत्रे यांनी मनोरंजनाच्या माध्यमातून अनेक राजकीय, सामाजिक विषयांना हात घातला आहे. अनेक समस्यांना वाचा फोड़ली आहे. समाजातल्या विसंगतीवर नेमकपणाने भाष्य केले आहे. पती-पत्नीमधील प्रसंग विनोदाने फुलवले आहेत.एकंदरीत सामान्यांच्या मनातील भावना , संवेदना टिपून ही व्यंगचित्रे त्यांनी चितारली आहेत. ही व्यंगचित्रे आपल्याला हसवतात आणि विचारप्रवृत्तही करतात.**

गतकालीन/ समकालीन व्यक्ती-घटना-प्रसंगात दडलेल्या विसंगत स्वरूपाच्या अर्थाचा म्हणजे सूचितार्थाचा हास्यजनक मार्मिक आविष्कार करणारे चित्र म्हणजे व्यंगचित्र.
व्यंग्यचित्र सभोवतालच्या जीवनातील घडामोडींतील विसंगती नेमकी टिपून त्यावर भाष्य करते. समाजातील रूढ अपप्रवृत्ती, नेत्यांच्या बोलण्यातील आणि वागण्यातील विसंगती, अनेक प्रकारचे भ्रष्टाचार, परिस्थितीमुळे सामान्य माणसाची होणारी कोंडी यांचे मार्मिक दर्शन व्यंग्यचित्र घडवते आणि कधी थट्टामस्करी, तर कधी उपरोध-उपहास यांचा यथोचित उपयोग करून चित्ररसिकाचे प्रबोधन करते. योग्य काय, अयोग्य काय याचे त्याला भान आणून देते. त्याची खिलाडू वृत्ती आणि संवेदनक्षमता वाढवते. काही व्यंग्यचित्रे निखळ, निर्मळ हास्य निर्माण करतात; तर काही हसवताहसवता अंतर्मुख बनवतात. काही उघड संदेश देणारी असतात. व्यंग्यचित्र हे चित्र व शब्द यांचे संयुक्त माध्यम आहे.
मराठीमधील व्यंग्यचित्रकारांची नावे या संदर्भात घ्यायची झाल्यास श्रीकांत ठाकरे, राज ठाकरे, मंगेश तेंडुलकर, मनोहर सप्रे, ज्ञानेश सोनार, विजय पराडकर, यशवंत सरदेसाई, प्रभाकर वाईरकर, विवेक म्हेत्रे, अभिमन्यू कुलकर्णी, रंगा, प्रभाकर झळके, प्रशांत कुलकर्णी आदींचा उल्लेख करावा लागेल. प्रारंभी दै. सकाळमधून व नंतर दै. लोकसत्तामधून' प्रसिद्ध होणारी 'चिंटू' (चारुहास पंडित/प्रभाकर वाडेकर) ही चित्रपट्टी आणि राम वाईरकर, प्रताप मुळीक यांच्या ऐतिहासिक-पौराणिक कथांवरील व्यंग्यपुस्तिका लक्षणीय आहेत.
आर. के. लक्ष्मण यांची मूळ इंग्रजीतून काढलेली व महाराष्ट्र टाइम्समध्ये प्रसिद्ध होणारी व्यंग्यचित्रे दर्जेदार व लोकप्रिय ठरली आहेत.
लेखक , प्रकाशक, संपादक ,हास्य, व्यंग्यचित्रकार , उत्तम वक्ते, मोटिवेशनल कोच विवेक मेहेत्रे यांनी विविध क्षेत्रे पादाक्रांत केलेली आहेत. विविध क्षेत्रात त्यांनी आपला ठसा उमटवला आहे. गेली ३९ वर्षे ते व्यंगचित्र रेखाटत आहेत आणि त्यांचं हे सातत्य कमालीचे आहे. आतापर्यंत आपण व्यंगचित्र हे वर्तमानपत्राच्या पुरवणीमधून पाहत आलोय. या व्यंगचित्रांचा संग्रह वाचायला मिळाला तर ? हो मंडळी , विवेक मेहेत्रे यांचा 'हास्यविवेक' हा व्यंगचित्रसंग्रह म्हणजे एक वेगळेच आकर्षण आहे. चित्र आणि शब्द यांच्या योग्य संयोजनातून त्यांनी व्यंगचित्राद्वारे सर्वसामान्यांच्या भावभावनांना व्यक्त केले आहे.
व्यंगचित्रातील रेखाटलेली पात्ररचना, पात्रांच्या चेहऱ्यावरील हावभाव आणि चित्राला समर्पक अशी वाक्यरचना त्यामुळे त्या एका वाक्यातून त्या विषयाची व्यापकता लक्षात येते.
मेहेत्रे यांची कल्पनाशक्ती, आजुबाजुला घडणाऱ्या घटनांकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन, चौफेर वाचन, विनोदबुद्धी आणि सामाजिक भान, हजरजबाबीपणा या गुणवैशिष्टयांमुळे या पुस्तकातील व्यंगचित्रे अधिक प्रभावी ठरली आहेत.
या पुस्तकातील व्यंगचित्रातून मेहेत्रे यांनी मनोरंजनाच्या माध्यमातून अनेक राजकीय, सामाजिक विषयांना हात घातला आहे. अनेक समस्यांना वाचा फोड़ली आहे. समाजातल्या विसंगतीवर नेमकपणाने भाष्य केले आहे. पती- पत्नीमधील प्रसंग विनोदाने फुलवले आहेत.एकंदरीत सामान्यांच्या मनातील भावना , संवेदना टिपून ही व्यंगचित्रे त्यांनी चितारली आहेत. ही व्यंगचित्रे आपल्याला हसवतात आणि विचारप्रवृत्तही करतात. नेमक्या शब्दांतून अचूक अर्थबोध करुन देण्याचं मेहेत्रे यांचे कसब वाखाणण्याजोगे आहे.२०१८ साली त्यांनी अखिल भारतीय मराठी हास्य - व्यंगचित्र संमेलनाचे अध्यक्षपदही भूषवलेले आहे.असे हे बहुआयामी व्यक्तिमत्त्व आपल्या कुंचल्याच्या माध्यमातून रसिकांना खळखळून हसवत राहतील , हे नक्की !
कविता , कथा ,कादंबरी या प्रकाराव्यतिरिक्त हा व्यंगचित्रांचा संग्रह नक्की वाचा म्हणजेच अनुभवा. आजुबाजुला दिसणाऱ्या छोट्या - छोट्या




गोष्टींकडे पाहण्याची एक वेगळी दृष्टी या संग्रहातून मिळते.पुस्तकाचं शीर्षकही यथोचित आहे. या पुस्तकाला लेखक प्रा. भा. ल. महाबळ यांनी मार्मिक प्रस्तावना लिहिली आहे. खुशखुशीत शब्दरचना , विनोदी शैली आणि हास्यचित्रे यांचं सुरेख संगम म्हणजे 'हास्यविवेक' व्यंगचित्रसंग्रह होय.

## पारिजात

धुंवाधार पाऊस,
आठवणींचा चकवा..
होरपळे पारिजात
मनी वैशाख वणवा..

बहर वेचताना,
पारिजात होई हळवा..
सल काळजातली
सख्याला कळवा..

विरहाच्या काहिलीत,
स्पर्श झाला कोरडा..
क्षण जुने मंतरलेले
पुन्हा अमृतात घोळवा..

तू एककल्ली,
छळे ना तुज पारवा..
गूज उकलाया
पावसाला बोलवा..

धुंवाधार पाऊस,
आठवणींचा चकवा..
होरपळे पारिजात
मनी वैशाख वणवा..

© कस्तुरी देवरुखकर.



## गुरु

गुरु, गुरु, गुरु
जीवनाचा कल्पतरु
जणू शिक्षणाचं महाद्वार
अन ज्ञानीयांचा आधारू ।।धृ।।
धरी शिक्षणाची कास
दावी संस्कारांची वाट
लावी ज्ञानाची वेल
अन देई अमृताचा माठ
गुरु निरंकार
गुरु हीं निर्गुण
करी पेरणी सगुणांची
अनं काढी अज्ञानाच तण
गुरु, गुरु लावी
आपल्या शब्दांना धार
ज्ञानाच्या तेजानं पाजे
जणू शिक्षणाची तलवार
गुरु शिष्य नातं
तैसे सगुणी -निर्गुणी
जैसे तुकाराम शिवराय
अनं कृष्णा -सांदीपाणी
सांगे मनिषची लेखणी
गुरु, गुरुहीं पर्वनी
गुरु ऊन सावली
अनं हवा आणि पाणी
गुरुवीण नाही हे
जग सारे पुरे
येई गुरुमुळेच आपुल्या
जीवना अर्थ रें
वसती ठायी ज्यांच्या
ब्रम्हा, विष्णू आणि शंकर
कोट्यांकोटी वंदन तुजला
हे गुरु गुरवेश्वर

कवि : मनिष आहिरे

## नदीकाठचा आनंद

झुळझुळ वारा नदीकिनारा
ओढ्यांची ती वाट
कोकीळा राणी कुहू कुहू गाई
चिमण्यांचा चिवचिवाट


गवतावर चे दवबिंदू ते
दिसती किती हो छान
खळखळणाऱ्या नदीकिनारी
आंब्याचे ते पान

आंब्याच्या त्या पानाला
जणू होडीचे की रूप
त्या वरती हो बसूनी जावे
मजा करावी खूप

नागमोडी ही वाट नदीची
पाण्याचा खळखळाट
कोंबड्या ने ही बांग दिली
हो झाली उठा पहाट

सूर्याचा तो प्रकाश मिळता
हाडे बळकट होती
मावळताना सूर्य दिसतो
सोन्यासारखे मोती

@सौ.भाग्यश्री दायमा



## दान दे...!

हिरवी-हिरवी पालवी
वृक्षावरती बहरू दे!
माती हिरवी करण्यास
बेभान पाऊस पडू दे!

पानाफुलांचा शाप नको
पाकळ्यांना वरदान दे !
मिटलेल्या कळ्याफुलांना
उमलण्यास तू भान दे !


वादळवारा झेलणाऱ्या
वृक्षांना मधूर तान दे!
भुईला तृप्त करण्यास
वर्षाऋतुचे तू वान दे!

नित्यनेमाने मिळो चारा
पशु- पक्ष्यांना तू मान दे!
कोसळून पाऊसधारा
काळ्या भुईला सन्मान दे!

नांदत्या हिरव्या रानात
पिकांना तू जीवदान दे!
माणिकमोती पिकण्यास
हे ! नभा, भुईला दान दे...!

- अय्युब पठाण लोहगांवकर,
ता. पैठण, मो. ९७६४३५०३७४.

## “पावसाचा खेळ सारा”



टप-टप गारा येती
नभ झाकळून गेले
चिंब चिंब धरित्रीचे
अंग अंग ओलावले ॥

टिम टिमणारा थेंब
माझ्या अंगणी खेळतो
तुळशीला वृंदावनी
लाही लाही भिजवीतो ॥

नाचे मनमोर बनी
करी हृदय घायाळ
फुलवूनी पिसाऱ्याला
गाली हसतो मधाळ ॥

दव प्यायले तृणांनी
दरवळे मधुभास
गर्द हिरव्या रानात
ओल्या सरींचा पाऊस ॥

मनी लागली चाहूल
होई आनंदी आनंद
झेलू धारांचा पाऊस
रानी पसरे सुगंध ॥

झाली भिजण्या आतुर
गावातली पोरं टोरं
पुन्हा एकदा भरुन
नभ आले काळेभोर ॥

पावसाचा खेळ सारा
मातीलाही गंध आला
माळ वनातला वारा
धुंद होऊन नाचला ॥

...© प्रदीप बडदे,नवी मुंबई
मो.९५९४०२७९९५

## सर्व OK मध्ये आहे...

काय ढग
काय पाऊस
काय तो गारठा
सर्व OK मध्ये आहे

काय खड्डे
काय पाणी
काय ते ऑरेंज अलर्ट
सर्व OK मध्ये आहे

काय छत्री
काय रेनकोट
काय ती कांदा भजी
सर्व OK मध्ये आहे

काय धरण
काय शेती
काय ती जमिन
सर्व OK मध्ये आहे.

काय विजा
काय आवाज
काय ती रेंज
सर्व OK मध्ये आहे

काय रिक्षा
काय मर्सिडीज
काय ते गतिरोधक
सर्व OK मध्ये आहे.

काय अत्याचार
काय सत्कार
काय तो वाढदिवस
सर्व OK मध्ये आहे.

काय ऑनलाईन
काय ऑफलाईन
काय ते रिझल्ट
सर्व OK मध्ये आहे.

काय शिक्षण
काय नोकरी
काय ती भाववाढ
सर्व OK मध्ये आहे.


काय बातमी
काय मिडिया
काय तो करोना
सर्व OK मध्ये आहे.

काय धबधबा
काय सेल्फी
काय ती मस्ती
सर्व OK मध्ये आहे.

काय राजकारण
काय समाजकारण
काय ते कार्यकर्ते
सर्व OK मध्ये आहे.

रचनाः विलास देवळेकर
संपादनः देवेंद्र भुजबळ
9869484800

## कॅरी बॅगचा भस्मासुर....



संपेल जीवन तेव्हां तुला का कळणार आहे
कॅरी बॅग चा भस्मासुर तुला जाळणार आहे

सगळे जीव धोक्यात आपली मात्र सोय झाली
वाढलेले प्रदूषण अखेर सर्वांना छळणार आहे

कापडी पिशवी घेऊन बाहेर निघायचे आजोबा
पण तुझीच फॅशन तुला अखेर सळणार आहे

सगळी कडे प्लास्टिक खाऊ लागले जमीन
अखेर तुला ही ते एक दिवस गिळणार आहे

टाकु नका रे प्लॅस्टिक मध्ये ते उरलेले अन्न
तुझ्या नावाने प्राणी सुध्दा विव्हळणार आहे

हळू हळू जखडणार प्रदूषणाचा विळखा
जमीन सोडून कुणीकडे तू पळणार आहे

नाल्या नाल्यातून प्रवास नदीत प्लॅस्टिक चा
घागरीतून तेच तुला परत मिळणार आहे

© बलराज संघई
9420015108

## सुंदर सकाळी

सुंदर सकाळी
नभी बगळ्यांच्या ओळी
दुरुन दिसती
जनू फुलांच्या माळी

सुंदर सकाळी
रवी दिसे लाल
धरतीवर पांघरतो
सोनेरी किरणांची शाल

सुंदर सकाळी
आल्हाददायी गारवा
दाणे टिपण्यासाठी
घूटमळतो पारवा

सुंदर सकाळी
पक्ष्यांचा किलबिलाट
शेतकऱ्यांची गुरं
तुडविती रानवाट

सुंदर सकाळी
सृष्टी बहरते छान
मनाचे पाखरू
गाते गोड गाण

- रवींद्र व्ही. चालीकवार
मु.पो. ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.9011559106

## धावा

पावलो पावली
तुझी आस आहे
उलट्या पावली संसाराची

छळतात सारे रक्त -
संबंधांचे
तुझ्यात रक्ताचा
ना लवंलेश

येवढ्या गर्दित
मी एकटा पांडूरंगा
तू हि एकटा राउळात

सावली ही माझी
दिसेनाशी झाली
ति ही मज गेली सोडून
आता

यातनाचा डोह उसळला
झाली दुःखाची रे दाटी
हेची आहे का मरन ?
असे मेलो कितीदा तरी

ताठले हे शरीर आता
प्राण आले कंठावरी
झडूदे मिळूदे गा
टाळ मृदंगाच्या चालिवरी...

संतोष जोशी
9623240512

## श्रावण मास

श्रावण मास
हिरवाईने नटे
पारणे फिटे...

उन पाऊस
सुरु असतोखेळ
सणांचा मेळ...


चिंब भिजते
लाज लाजुनी जाते
फुलुनी येते....

सुगंध सारा
आसमंती भरतो
धुंद वाटतो..

फुलपाखरू
रंगीबेरंगी असे
भोवती दिसे..

निसर्ग सारा
नजरेत भरतो
छान दिसतो...

सीमा मंगरूळे तवटे
वडूज सातारा




आधुनिक केसरी

## चतु:सुत्रीतून गणिताचा पाया मजबूत

**प्रिय,**

शालेय विद्यार्थी, शालेय शिष्यवृत्ती परिक्षार्थी, शिक्षक, पालक, सर्व स्पर्धा परिक्षार्थी आणि ज्यांना गणित विषय आवडतो अशा सर्व वाचकांसाठी.



श्रीमती छाया खेडकर
संपर्क क्र. 8888780568

आजपासून आपण गणिताच्या मुलभूत संकल्पना समजून घेणे, त्या विसरु नयेत म्हणून सराव करण्यासाठी मुलभूत संकल्पनेवर प्रश्नसंच आणि मनोरंजनातून गणित म्हणजेच उखाणे व इतर विषयांचे जनरल नॉलेज व कवितेच्या माध्यमातून अशा या चतु:सुत्रीतून गणिताचा पाया मजबूत करुन जीवणाच्या वाटचालीची सुरुवात करु.


**अ) गणिताची मुलभूत संकल्पना : संख्याचिन्हे**

संख्याचिन्हाचे दोन प्रकार आहेत.

१) देवनागरी लिपीतील संख्याचिन्हे : ०,१,२,३,४,५,६,७,८,९ इत्यादी. स्वत:च्या देशात वापर केला जातो.

२) आंतरराष्ट्रीय संख्याचिन्हे : 0,1,2,3,4,5,6,7,8,9 इत्यादी. संपूर्ण जगात व्यवहार करणे सोपे जावे म्हणून वापरतात. या संख्याचिन्हापासून अंकगणिताची सुरुवात होते.

**ब) मुलभूत संकल्पना प्रश्नसंच.**




प्र.१ मुलभूत संकल्पनेचे नाव सांगा?

प्र.२ मुलभूत संकल्पनेत किती संख्याचिन्हे आहेत.

प्र.३ पहिले संख्याचिन्ह कोणते?

प्र.४ शेवटचे संख्याचिन्ह कोणते?

प्र.५ पाचव्या क्रमांकाचे संख्याचिन्ह कोणते?

**क) (गणिताची मुलभूत संकल्पना व मराठी) उखाणा.**

१) प्रसिद्ध शब्दाचा समानार्थी शब्द आहे नामांकित, संख्याचिन्हावर प्राथमिक क्रिया करण्याचा अभ्यास ज्यामध्ये करतात त्याचे नाव आहे अंकगणित. (प्राथमिक क्रिया : बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार)

२) कमळ शब्दाचा समानार्थी शब्द आहे पदम्, ०,१,२,३,४,५,६,७,८,९ आहेत. देवनागरी लिपीतील संख्याचिन्ह.

**ड) कविता : छापलेले पान व आकृती टाकली आहे.**

(क्रमशः)

# पंतप्रधानांचा विरोधकांना दणका

आधुनिक केसरी

**ओरिसाच्या नागरिक, स्व कष्टातून घडवलेले आयुष्य, लागोपाठ घडलेल्या कौटुंबिक दुर्घटना, दु:ख सहन करत, नोकरी, आमदारकी, राज्यपाल पद भुषवत, समाजसेवा अखंड चालू ठेवत जनते समोर एक आदर्श उभा करणाऱ्या द्रौपदी मूर्मू या आदिवासी महिलेने स्वदाहरणाने जीवन आदर्श निर्माण केलेत. नरेंद्र मोदी यांची घारी सारखी नजर अचूक गुणवत्ता हेरत असते. सर्व पद्मभूषण, पद्मश्री, पद्मविभूषण, भारतरत्न या पुरस्कारांचे गेल्या आठ वर्षातील लाभार्थी पाहीले तर अचूक निवड लक्षात येईल. तसेच नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रपतीपदासाठी द्रौपदी मूर्मू यांना उमेदवारी देऊन एक अत्यंत लायक महिलेला सर्वोच्च पदावर विराजमान करण्याचे पाऊल उचलून सर्वांनाच धक्का दिला. अंतर्मुख केले. आज भारतीय राजकीय पक्षांपूढे असा पेच निर्माण झाला आहे की या आदर्श जीवन जगलेल्या संयमी, सहनशील, अभ्यासू, सज्जन, निष्कलंक महिलेला विरोध तरी कोणत्या मुद्यावर करावा.**

मी वारंवार सांगत आले आहे की नरेंद्र दामोदरदास मोदी, गृह आणि सहकार मंत्री, जवळजवळ उपपंतप्रधान पद भुषवत असलेले अमित भाई शाह, सर्वात कार्यक्षम, नवनवीन कल्पना प्रत्यक्षात उतरवण्यासाठी सतत धडपडत असलेले, अत्यंत यशस्वी मंत्री नितीन गडकरी आणि गुजराथ मधून राष्ट्रीय पातळीवर नरेंद्र मोदींना वाव देणारे राजनाथसिंह या सर्वांचा कार्यपध्दतीचा, वैचारीक पातळीचा, निकोप आणि निर्मळ विचारसरणीचा अभ्यास विरोधकांनी करायलाच हवा. त्याशिवाय विरोधी पक्षांना भाजप विरोधात कोणतेही यश मिळणार नाही. राजकारण एक लूट क्षेत्र समजत राजकारणात आलेल्या आणि मदरशात शिकवतात त्याप्रमाणे कट्टरतावाद, आणि देशद्रोह या अवगुणांप्रमाणे राजकारण फक्त भ्रष्टाचाराचे कुरण असल्याचे बाळकडू मिळालेल्या राजकारण्यांचे आणि कॉंग्रेस ने भिनवलेल्या संस्कारांचे हे परिणाम आहेत.

नरेंद्र मोदी आणि उपरोल्लेखित भाजप नेते पदोपदी, हर क्षणी फक्त देशाचा विचार करतात. सर्वात आधी देशसुरक्षा, विकास, प्रगती, शांतता, आणि समन्वय नंतर पक्ष आणि शेवटी स्वतः ही विचारधारा रूजवलेले नेते, संघ स्वयंसेवक, यांची तुलना करणे अवघड आहे. विरोधी पक्ष नेत्यांना फार घाईने निर्णय घ्यायची सवय आहे. आणि मग भाजपच्या निर्णयानंतर तोंडघशी पडण्याची वेळ आली की मग आम्हाला कल्पना दिली नाही, विश्वासात घेतले नाही म्हणून बोंबलत बसायचे. आता राष्ट्रपती पदाच्या बाबतीत ही असेच झाले आहे. मोदींना धडा शिकवायचा, तगडा उमेदवार द्यायचा अशा गर्जना करत, ममता बॅनर्जी, के सी आर, शरदराव पवार साहेब, सोनिया गांधी वेगवेगळे प्रयत्न करायला लागले. अरविंद केजरीवाल अज्ञातवासात गेल्या सारखे अलिप्त आहेत. ते राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीबाबत अनभिज्ञ असल्यासारखेच वागत आहेत. न विरोधकांसोबत आहेत नाही भाजप सोबत. ते शांतच आहेत. कदाचित सौदेबाजीची वाट पाहात असतील किंवा आपले कडील मतांची किंमत काही मिळेल काय याची वाट बघत असतील.



पण परिस्थिती आज अशी आहे की 65 % मतदार द्रौपदी मूर्मू यांचे मागे आहेत. त्यामुळे त्यांना विजयाची खात्री आहे. आणि यशवंत सिन्हा यांना अरविंद केजरीवाल यांनी मते देऊ केली तरी त्यामुळे फार काही फरक पडत नाही यशापयशावर त्यामुळे यशवंत सिन्हा भाव देत नाही आहेत. अशा परिस्थितीत केजरीवाल यांनी मतदानात भाग घेतला काय किंवा नाही घेतला काय, निर्णयावर परिमाण होणारच नाही आहे. द्रौपदी मूर्मू या निष्कलंक महिलेला उमेदवार करून नरेंद्र मोदी यांनी आधीच बाजी मारलेली आहे. हेच विरोधकांना मोदीकडून शिकले पाहिजे.

त्यातच नेमके विरोधक कमी पडत असतात नेहमीच. थोडा धीर धरून भाजप उमेदवार जाहीर होई पर्यंत शांत बसले असते आणि नंतर सर्व विरोध बाजूला ठेवून अत्यंत योग्य उमेदवार द्रौपदी मूर्मू आहेत म्हणून आम्ही त्यांना एकमुखी पाठिंबा देत आहोत असे जाहीर करता आले असते आणि सर्व विरोधकांची मान ताठ झाली असती. पण अंध विरोध आणि नरेंद्र मोदी यांना सतत पाण्यात पाहण्याच्या प्रवृत्ती मुळे सतत विरोधक तोंडघशी पडत असतात. शिक्षण, समाजिक समज, कार्य, सहनशीलता, लायकी, या सर्वच बाजूंनी द्रौपदी मूर्मू उच्च असल्याने ही निवडणूक फक्त एक सोपस्कार राहीला आहे.

18 तारखेला मतदान प्रत्यक्षात होई पर्यंत कदाचित 75-80 टक्के मतदार द्रौपदी मूर्मू यांचे मागे ठामपणे उभे राहतील अशी परिस्थिती आहे. रत्नपारखी नरेंद्र मोदी यांनी आपली पारखी नजर दाखवून अतिशय योग्य उमेदवार दिला आहे. मग यशवंत सिन्हा यांना द्रौपदी मूर्मू विरोधात प्रचार करायला मुद्दाच सापडत नाहीये. हतबल यशवंत सिन्हा आता म्हणत आहेत की रबरस्टॅम्प राष्ट्रपती असू नये. ही टीकाही नैराश्यातून करीत आहेत. कारण द्रौपदी मूर्मू सज्ञान, सुशिक्षित, देशभक्त, कार्यक्षम आणि अनुभवी व्यक्ती आहेत. त्यांनी अनेक घाव सहन केलेले असले मुळे आपली सदसद्विवेकबुद्धी जागृत असल्याचे आणि सहनशीलतेचे अनन्यसाधारण महत्व अधोरेखित केलेले आहे. प्रचाराचे निमित्ताने त्या भारतभर फिरत असताना आपली भारदस्त आणि छाप पाडणारी वृत्ती ठळक दिसु देत आहेत. सारांश हाच की सर्वच बाबतीत यशवंत सिन्हा पेक्षा द्रौपदी वरचढ आहेत. जे यशवंत सिन्हा 2002 मध्ये गुजरातचे मुख्यमंत्री म्हणूनही नरेंद्र मोदींना विरोध करत होते तेच यशवंत सिन्हा 2013 मध्ये नरेंद्र मोदी यांचे समर्थक झाले. मोदींना पंतप्रधान पदाचे उमेदवार जाहीर करावे या अग्रही मागणी वर ठाम होते. 2014 मध्ये बहुमताने भाजप सत्तेत आल्यानंतर, नरेंद्र मोदी पंतप्रधान पदावर विराजमान झाल्यानंतर यशवंत सिन्हा यांना मंत्रीपद मिळाले नाही त्याबरोबर ते नरेंद्र मोदी यांचे कट्टर विरोधक झाले.

मग भाजपचा त्याग केला. नंतर कालांतराने तृणमुल कॉंग्रेस चे उपाध्यक्ष झाले. सत्ता पद न मिळाल्यामुळे ते नाराज झाले आणि भाजपचे अंध विरोधक झाले. असे हे मतलबी यशवंत सिन्हा पराभूत होणार ही काळ्या दगडावरची रेष आहे. जर चुकुन नरेंद्र मोदी यांनी कमकुवत उमेदवार दिला असता आणि भारताच्या दुर्दैवाने यशवंत सिन्हा राष्ट्रपती झाले असते तर पदोपदी सरकारची अडवणूक करून संघर्ष निर्माण केला असता. कायम पेच उत्पन्न झाले असते.

**पीपीएम, पुणे**

# वादळं येऊन सुद्धा आपली शांतता भंग होऊ देत नाही तो समुद्र



रामभाऊ आवारे
संपर्क क्र. ८७८८५०४५१२

आधुनिक केसरी

**समुद्रात अनेक प्रकारची वेगवेगळी वादळे निर्माण होतात. कधी नियोजित वादळं येतात तर कधी कधी अचानक नैसर्गिक बदलानुसार वादळं येतात. त्यातील काही वादळ लहान असतात आणि काही वादळ मध्यम तर कही वादळ हि भव्य आणि विराट स्वरूपाची असतात. परंतु या सगळ्या वादळाला समुद्र पुरुन उरतो. मात्र समुद्र कधीच आपली शांतता सोडत नाही किंवा आपल्या शांततेवर परिणाम होऊ देत नाही.**

प्रत्येक व्यक्तीला आपल्या जीवनात सुख-दुःख व चढ-उतारांचा सामना करावा लागतो. जीवनाच्या या संघर्षाच्या वाटेत अनेक लोक भेटतात. परंतु यातील काही व्यक्ती आपला स्वार्थ साधण्यासाठी जवळीकता साधण्याचा प्रयत्न करीत असतात शेवटी आपला स्वार्थ साधला की त्या व्यक्तीला अर्ध्यावर सोडून देतात. सोडुन जाण्यासाठी अश्या लबाड, स्वार्थी लोकांना काहीतरी निमित्त हवं असतं. समाजातील बहुतांश व्यक्तीच्या बाबत या घटना सातत्याने घडतच असतात. परंतु जिद्द, संयम व सहनशीलता या त्रिसूत्रीचा अवलंब करून अनेकांनी आलेल्या संकटाचा समर्थपणे सामना केलेला आहे. प्रेमासाठी वाटेल ते यासाठी अनेकांनी संयम सहनशीलता व जिद्द या बाबी सोडून मैदानातून पळ काढल्याची अनेक उदाहरणे आहेत. परंतु साथ देणारा आपलं मनोबल खचुन न देता धैर्याने सामोरे जात असतो.

मानवी जीवन आणि समुद्र जवळपास सारखेच आहेत जसं समुद्र अनेक वादळं येऊन सुद्धा आपली शांतता भंग होऊ देत नाही. तसंच मानवी जीवन आणि संकटं, वादळ यांची मालिका हि सुरूच असती. वेगवेगळी संकट जेव्हा जीवनात आगमन करतात तेव्हा सगळ्यात प्रथम आपण आपली शांतता भंग करतो आणि शांतता भंग झाली की, मग मात्र वादळाने जेवढं नुकसान होणार नाही त्यापेक्षा जास्त आपलं नुकसान आपण आपली शांतता भंग झाल्याने करून घेतो. मुळात जीवन आणि समुद्र यांच्यामध्ये साम्य हेच आहे की, वादळ समुद्रात पण येतात आणि जीवनात पण येतात आणि समुद्र वादळांना पेलवुन नेताना आपली शांतता यत्किंचितही डळमळीत होऊ देत नाही. आणि म्हणूनच वादळ समुद्राच काहीच बिघडवू शकत नाहीत. तसंच आपण आपल्या जीवनात संकट, वादळ आल्यानंतर आपली शांतता भंग होऊ दिली नाही. तर किती ही मोठं संकट, वादळ हे आपलं काहीच नुकसान करु शकत नाही. म्हणून सगळ्यात महत्त्वाची आहे ती शांतता.

शांतता हा गुण समुद्राकडुन आपल्याला शिकता आला पाहिजे. आणि हा गुण आपण शिकलो तर आपलं जीवन सुद्धा नक्कीच समुद्रा सारखं स्थिर शांत होईल या मध्ये यत्किंचितही शंका नाही. आणि यासाठी महत्वाची बाब आहे ती म्हणजे अध्यात्मिक ज्ञान होय. अध्यात्मिक ज्ञान कितीही मोठ्या वादळानंतर आणि संकटानंतर जीवनातील शांतता भंग न होऊ देता कायम ठेवु शकत. म्हणून वादळाने ज्याची शांतता भंग होत नाही तो कोणीही असला तरी तो म्हणजे समुद्रच.

**(लेखक राष्ट्रीय युवा शक्ती नाशिक (वनसगाव) चे जिल्हा उपाध्यक्ष आहेत.)**

## बाप

नेहमीच पुरुन शिल्लक राहणारी,
आधाराची माया असते ।
प्रत्येक घरात बाप नावाची,
एक मजबूत छाया असते ।।

संकटाच्या सागरात जशी,
नौका असते आई ।
बाप मात्र तिला वल्हवित,
किना-या पर्यंत नेई.. ।।
कळस चमकता ठेवण्यासाठी,
इमारतीचा पाया असते ।।
प्रत्येक घरात बाप नावाची,
एक मजबुत छाया असते..।। 1 ।।

आई घालते जेवायला,
बाप शिदोरी ठेवुन जातो... ।
कधीकाळी कामी येणारं,
किडुक-मिडुक देवुन जातो... ।।
रात्रंदिवस लेकरासाठी,
झीजणारी काया असते...।।
प्रत्तेक घरात बाप नावाची,
एक मजबुत छाया असते..।। 2 ।।

मोबाईलची रेंज आई,
बाप त्यातलं बॅलंस असतो... ।
उधारीवर टॉकटाईम घेण्याचा,
त्याच्याकडे चान्स असतो... ।।
आयुष्याच्या हॅंडसेट मधली ही,
डबल सीमची किमया असते... ।।
प्रत्येक घरात बाप नावाची,
एक मजबूत छाया असते. ।। 3 ।।

गजबजलेलं गाव आई,
बाप गावची वेस असतो... ।
गरम गरम घास आई,
बाप शहरातली मेस असतो.. ।।
आई धरणीची उदारता,
बाप आभाळमाया असते..।।
प्रत्तेक घरात बाप नावाची,
एक मजबूत छाया असते..।। 4 ।।

बाप म्हणजे चैतन्याचं,
रूप असतं रोज नवं... ।
आई बरोबर बापाचंही,
कौतुक थोडं व्हायला हवं.. ।।
आई अत्तराची कुपी,
बाप तिचा फाया असते..।।
प्रत्तेक घरात बाप नावाची,
एक मजबुत छाया असते..।। 5 ।।

कितीही उपमा कमीच आहेत,
बाप म्हणजे बाप असतो... ।
चढ उताराच्या वाटेवरची,
कौतुकाची थाप असतो...।।
खरच सांगतो बापावाचुन,
आवघे जीवन वाया असते... ।।
प्रत्तेक घरात बाप नावाची,
एक मजबूत छाया असते..।। 6 ।।

कवी : अशोक मिरगे,
(निवृत्त ना.तहसीलदार),
मो. 9421278312.



# गोंडवाना विद्यापीठात 'नो व्हेईकल डे'

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** गोंडवाना विद्यापीठाने ग्रीन-कॅम्पस चळवळीचा एक भाग म्हणून महिन्याचा पहिला शनिवार, तिसरा शनिवार आणि पाचव्या शनिवारी विद्यापीठ परिसरात वाहनविरहित दिवस असेल असे गोंडवाना विद्यापीठाने ठरविले आहे. शनिवारी महाविद्यालयात जाण्यासाठी सर्व कर्मचाऱ्यांनी सार्वजनिक वाहतूक आणि सायकलींचा वापर केला. "पर्यावरणाचे संतुलन राखण्यास पूरक भाग म्हणून हवा प्रदूषण कमी होण्यास हातभार लावण्याच्या दृष्टीने तसेच आरोग्याच्या दृष्टीने, नो व्हेईकल डे असावा हा यामागचा उद्देश आहे, असे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांनी सांगितले. प्रत्येक महिन्याचा पहिला शनिवार, तिसरा शनिवार व पाचवा शनिवार 'नो व्हेकल डे' पाळण्याचा निर्णय घेतला आहे.

झाडे लावा झाडे जगवा हे वाक्य आपण नेहमी ऐकतो. पण वातावरणातील वायू प्रदूषणावर काही प्रमाणात का होईना मात करता यावी म्हणून 'नो व्हेईकल डे' पाळायला आजपासून सुरुवात झाली आहे. त्यानुषंगाने विद्यापीठातील सर्व अधिकारी कर्मचारी यांनी आपल्या निवासस्थानापासून सायकलवर तर काहीनी पायी येत 'नो व्हेईकल डे' चा विद्यापीठात सुरू केलेला उपक्रम चांगला असल्याचे मत व्यक्त केले.

'नो व्हेईकल डे'च्या दिवशी आपले काम करण्याचे ठिकाण लांब असेल, तर पेट्रोलचा खर्च ऑटोरिक्षावर केला तर त्यांनाही सहज रोजगार प्राप्त होऊ शकतो. यामध्यमातून शहरातील रस्ते मोकळा श्वास घेऊ शकतील. मनुष्यालाही मोकळा श्वास घेता येईल. वायू प्रदूषणामुळे होणारे आजार टाळता येईल. अनेकांना धुळीची 'ॲलर्जी' असते. दमाचा त्रास असतो. श्वसनाचे आजार असतात. त्यांना यातून एका दिवसासाठी का होईना, हायसे वाटेल. इंधनाची बचत व शहर निरोगी होईल महत्त्वाचे म्हणजे, इंधनाची बचत होईल. सायकल वा पायी प्रवास केल्यास शरीराचा व्यायाम होईल आणि आरोग्य सुदृढ होण्यास मदत होईल. सर्वांगाने विचार केल्यास 'नो व्हेईकल डे' केवळ वायू प्रदूषणच टाळण्यासाठी नसेल, तर आपले आणि समाजाचे सोबतच शहराचे आरोग्य निरोगी राखण्यास मदत होईल. संघटना आणि संस्थाच्या माध्यमातून चार भिंतीच्या खोलीत विविध विषयावर प्रबोधन करण्यात येते. या प्रबोधनाची गरज असली तरी ते कृतीतून केल्यास त्याचा प्रचार आणि प्रसारही झपाट्याने होतो. भविष्यातील धोका टाळण्यासाठी आताच पुढाकार हवा त्यामुळेच वायू प्रदूषणावर मात करण्यासाठी हा महत्त्वाचा निर्णय विद्यापीठाने घेतला आहे.

# समाजकल्याण विभागाच्या 75 शाळा 'हायटेक' होणार : आयुक्त नारनवरे

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त राज्यात समाजकल्याण विभागाच्या 75 शाळा 'हायटेक' करण्यात येणार असल्याचे समाजकल्याण आयुक्त डॉ. प्रशांत नारनवरे यांनी येथे सांगितले. विभागातर्फे श्री शिवाजी महाविद्यालयात नुकत्याच झालेल्या विभागीय शिक्षण परिषदेत ते बोलत होते. प्रादेशिक उपायुक्त सुनील वारे, प्राचार्य रामेश्वर भिसे यांच्यासह विभागातील पाचही जिल्ह्यांतील अधिकारी, गृहप्रमुख, गृहपाल, मुख्याध्यापक, शिक्षक उपस्थित होते.

डॉ. नारनवरे म्हणाले की, विद्यार्थ्यांची जडणघडण करण्यात शाळांइतकेच महत्व वसतिगृहांचेदेखील आहे. त्यामुळे शाळा आणि वसतिगृहांत संस्कारक्षम वातावरण निर्माण करणे, नवनवे उपक्रम राबवणे आवश्यक आहे. शाळांनी शिक्षणाबरोबरच क्रीडा, संगीत, कला अशा विविध क्षेत्रांचे ज्ञान विद्यार्थ्यांना देऊन त्यांच्या सर्वांगीण विकासाचा प्रयत्न करावा. स्पर्धा परीक्षांची माहिती, तज्ज्ञांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना मिळवून द्यावे. राज्यात ७५ शाळा अद्ययावत तंत्रज्ञान व सुविधांद्वारे हायटेक करण्याचे नियोजन असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. आयुक्त डॉ. नारनवरे यांच्या लोकाभिमुख व उत्कृष्ट प्रशासकीय कामकाजाबाबत पीपल्स एज्युकेशन सोसायटीचा पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा सत्कार विभागातर्फे वारे यांच्या हस्ते, तर महाविद्यालयातर्फे श्री. मिरगे यांच्या हस्ते करण्यात आला.



लय भारी

## सुगरण

सौ. आरती राजाराम परिचारक, पंढरपूर,
संपर्क क्र. 9404974345

# दाल पकवान

आधुनिक केसरी

"दाल पकवान" करण्याचे बरेच दिवस मनात होतेच, त्यात फेसबुकवरच्या फुडग्रुपवर कुणीतरी हि रेसिपी टाकलीच होती. मग युनळीवर बरेच सर्च केलं. बऱ्याच रेसिपी बघितल्या मग थोडं आपलं डोकं चालवलं दालपकवान ही रेसिपी बनवली. दाल पकवान ही एक नाश्त्याला बनवण्याची डिश आहे. दाल पकवान ही डिश सिंध ह्या प्रांतातील लोकप्रिय डिश आहे. म्हणजेच सिंधी लोकांचा अगदी आवडतीचा पदार्थ आहे. हरभरा डाळ वापरून दाल बनवली आहे व पकवान म्हणजे पुऱ्या पण ही पुरी छान कुरकुरीत असते त्यामुळे चविष्ट लागते. सिंधीलोक दाल पकवान ही डिश नाश्त्याला जरी बनवत असली तरी आपण इतर वेळी सुद्धा बनवू शकतो. पण सुटीच्या दिवशी हा पदार्थ बनवायला छान आहे. त्यासाठी घ्या साहित्य आणि कृती...

**दाल बनवण्यासाठी :-**

१ वाटी हरभराडाळ, अर्धा चमचा धणेपूड, पाव चमचा जिरेपूड, हळद, एक चमचा लाल तिखट, अर्धा चमचा आमचूर पावडर (मी चाट मसाला घातला.) मीठ चवीनुसार. पाव वाटी धुवून बारीक चिरलेली कोथिंबीर, १ मध्यम आकाराचा कांदा बारीक चिरलेला, एक चमचा तेल, अर्धा चमचा, ८-१० कडीपत्ता पाने, चिंचेची चटणी (पित्ताचा त्रास होऊ नये म्हणून कोकम सरबत वापरते नेहमीच) इत्यादी...

**पकवान बनवण्याकरीता :-** दिड वाटी मैदा, एक चमचा ओवा, मीठ चवीनुसार, तेल पुऱ्या तळण्यासाठी.

**कृती :-**

प्रथम हरभराडाळ कुकरमध्ये चार शिट्ट्या करून शिजवून घ्या. पण खूप शिजता कामा नये थोडी बोट चेपी शिजली पाहिजे. एका बाऊल मध्ये मैदा, ओवा, मीठ मिक्स करून त्यामध्ये थोडे पाणी घालून चांगले घट्ट पीठ मळून १५ मिनिट बाजूला झाकून ठेवा. कांदा, कोथंबीर धुवून चिरून घ्या.

**दाल करण्यासाठी :-**



एका कढईमध्ये शिजलेली हरभरा डाळ जराशीच हटून घ्यावी, त्यात लाल तिखट, हळद, धणे, जिरे पावडर, चाट मसाला, मीठ व पाणी घालून ५ मिनिट मंद विस्तवावर शिजवून घ्या. दुसऱ्या एका कढईमधे तेल गरम करून जिरे, कडीपत्ता घालून फोडणी करावी. मग शिजवलेल्या डाळीवर घालून मिक्स करून चांगली दणदणीत वाफ येवू द्या.

**पकवान करण्यासाठी :-**

कढईमधे तेल गरम करायला ठेवा. बनवलेल्या पीठाचे छोटे-छोटे गोळे बनवून घ्या. एक गोळा घेवून छोटी पातळ पुरी लाटून घेवून तिला काटे चमच्यानी टोचे मारून पुरी बाजूला ठेवा. अश्या प्रकारे सर्व पुऱ्या लाटून घ्या. तेल चांगले गरम झाले की मंद आचेवर पुऱ्या छान ब्राऊन रंगावर तळून घ्या. (पुऱ्या आदले दिवशी करून ठेवल्या तरी चालतील.)

गरम गरम दाल पकवान सर्व्ह करा. दाल पकवान सर्व्ह करताना पुरी वरती दाल पसरवून चिरलेली कोथंबीर व कांदा, चिंचेची चटणी, घालून सजवा. करून खावून बघाच खुप आवडेल.

# चौथी आशियाई व पहिल्या जागतिक खो खो स्पर्धेसाठी निवड समिती जाहीर

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** भारतीय खो-खो महासंघाने आशियायी व जागतिक खो-खो स्पर्धेसाठी कंबर कसली आहे. ४थ्या आशियायी खो-खो स्पर्धेला १२ ऑक्टोबर २०२२ पासून तर पहिल्या जागतिक खो-खो स्पर्धेला १६ ऑक्टोबर २०२२ पासून दिल्ली येथे सुरुवात होण्याचा अंदाज खो-खो महासंघाकडून व्यक्त केला जात आहे. या स्पर्धेसाठी जो भारतीय संघ निवडला जाणार आहे त्यासाठी निवडसमितीची घोषणा करण्यात आली असून भारतीय खो-खो महासंघाचे सहसचिव डॉ. चंद्रजीत जाधव यांची निवड समितीच्या चेअरमन पदि नियुक्ती झाली आहे.

**निवड समितीवर डॉ. चंद्रजीत जाधव, गोविंद शर्मा, सचिन गोडबोले, उपकार सिंग, एस. एस. मालिक, डॉ. मुन्नी जून, सुषमा सरोलकर यांची वर्णी**

या आशियायी व जागतिक खो-खो स्पर्धेसाच्या निवड समितीवर महाराष्ट्रातून चेअरमनपदि डॉ. चंद्रजीत जाधव यांच्यासह महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे सचिव ॲड. गोविंद शर्मा व कार्याध्यक्ष सचिन गोडबोले यांची सदस्य म्हणून वर्णी लागली आहे. या तिघांसह उपकार सिंग (पंजाब), एस. एस. मालिक (दिल्ली), डॉ. मुन्नी जून (दिल्ली), व सुषमा सारोलकर (मध्य भारत) यांचीसुध्दा सदस्य म्हणून निवड झाली आहे. पुणे येथील श्री छत्रपती शिवाजी क्रीडा संकुल बालेवाडी येथे ६ ते १९ जुलै या कलावधीत प्रक्षिक्षण प्रक्षिण शिबीर आयोजित केले आहे. त्यात सपूर्ण देशातून १२० मुले या प्रक्षिण शिबिरासाठी निवडण्यात आली असून त्यांना प्रक्षिक्षण देण्यासाठी देशभरातून १२ प्रशिक्षकांची निवड करण्यात आली आहे. याच १२० खेळाडूंमधून आशियायी व जागतिक खो-खो स्पर्धेसाठीचा भारतीय संघ टप्याटप्याने निवडला जाणार असल्याचे भारतीय खो-खो महासंघाचे सचिव महेंद्रसिंग त्यागी यांनी स्पष्ट केले. महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष मा. संजीवराजे नाईक–निंबाळकर, खजिनदार ॲड. अरुण देशमुख, याचबरोबर खो-खो तील तमाम कार्यकर्त्यांते यांनी निवड समिती वर शुभेच्छांचा वर्षाव करत आहेत.

शासन मान्यता प्राप्त लिलाव भिशी U65929MH2017PTC296394

DC

दिंडोरी चिट फंड प्रा.लि.

आपले जीवन आनंदमय जगा....

तुमच्या बचतीवर योग्य गुंतवणूक हप्त्याने भरा आणि एक रक्कम पैसे मिळवा.

कमीत कमी व्याज दर योग्य मोबदला एक रक्कमी पैसे मिळवा आणि हप्त्याने परतफेड करा.

- सेंट्रल ॲक्ट १९८२ नुसार मान्यता प्राप्त
- पासबुक व पावतीची सोय
- लिलाव भिशी बोलीची मर्यादा ५% ते ४०% पर्यंत
- सर्व व्यवहार धनादेशाद्वारे

संपर्क: श्री.सतीष देशपांडे मो. 9730527669, 9623556611, 0240-2481122

# जागतिक इमोजी दिवस....!!!



रुपाली वागरे/वैद्य
संपर्क क्र.: ९८६०२७६२४१

आधुनिक केसरी

**जागतिक इमोजी दिवस दरवर्षी १७ जुलै रोजी साजरा केला जातो आणि त्याची सुरुवात २०१४ मध्ये झाली. कमी शब्दात आपल्या भावना इतरांपर्यंत पोहचविण्याचा साधा सोपा मार्ग म्हणजे इमोजी. इमोजीच्या शोधामुळे लांबलचक मजकूर लिहिण्याची गरज आता राहिलेली नाही, तुम्ही तुमच्या भावना इमोजीद्वारे स्पष्ट करू शकता. सध्या इमोजी आपल्या डिजिटल संस्कृतीचा एक अविभाज्य भाग झाले आहेत. तसेच हळूहळू ते संवाद साधण्याचे नवीन माध्यम म्हणून रुढ होत आहे.**

मनुष्य हा भावनाप्रधान प्राणी आहे. सुख, दुःख किंवा अगदी राग सुद्धा व्यक्त केल्याशिवाय तो राहु शकत नाही. मग कोणी भावना व्यक्त करायला शब्दांचा आधार घेतो तर कोणी केवळ डोळ्यांमधून भावना व्यक्त करतो. हे झाल समोरासमोरच पण मोबाईलवर चॅटींग करतांना इमोजीच्या माध्यमातून हे सार व्यक्त होत आहे. प्रथम इमोजी १९९९ मध्ये शिगताका कुरिता यांनी जपानमधील मोबाईल इंटरनेट प्लॅटफॉर्मवर कार्य करणाऱ्या टीमचा एक भाग म्हणून तयार केली होती. जेथे त्याने प्रथम१७५ पिक्सेल इमोजी वितरित केली.

जगभरात पहिली इमोजी 'स्माईली' आहे. हसण्याने सुरुवात झालेल्या या इमोजींची क्रेझ प्रचंड वाढली आहे. त्यामुळेच आता केवळ स्माईलीपुरतीच इमोजी मर्यादीत राहिली नसून अनेक वेगवेगळ्या भावनांच्या इमोजी तयार झाल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे स्माइलिंग फेस विथ हार्ट आइज, किस मार्क, ओके हँड, लाउडली क्राईंग फेस, बिमिंग फेस विथ स्माईलिंग आइज, थम्स अप, फोल्डेड हँड्स आणि स्माईलिंग विथ सनग्लासेस या इमोजीचा वापर सध्या अगदि सहजपणे केला जात आहे. जागतिक इमोजी डे च्या निमित्त जाणून घेऊया या सात गोंधळात टाकणाऱ्या इमोजीबद्दल... (दात दाखवून हसणारा इमोजी)- हा इमोजी आपण अनेकदा मनसोक्त हास्य दाखवण्यासाठी वापरतो. पण हा इमोजी उदास चेहरा दर्शवतो, (PRAYER EMOJI) हात जोडलेली इमोजी प्रार्थना किंवा रामराम, नमस्कार करण्यासाठी केला जातो. पण, इमोजीपीडीया नुसार, ते आभार मानण्यासाठी हे हात जोडलेले आहेत. (CALL ME)- यो साठी तरुणाई हा इमोजी वापरते. पण खरंतर कॉल मी हे दर्शवण्यासाठी हा इमोजी तयार करण्यात आला आहे. (WAVING HAND)- हा इमोजी हाय/गुडबाय करण्यासाठी वापरला जातो. मारण्यासाठी नाही, (PERSON TIPPING HAND) हे इमोजी अनेकदा ॲटीट्युड दाखवण्यासाठी वापरण्यात येते. पण रिसेप्शन डेस्क वरील व्यक्ती दाखवण्यासाठी हे इमोजी तयार करण्यात आले आहे. (PINCHING HAND)- हा



इमोजी SMALL PENIS दाखवण्यासाठी नेटकऱ्यांनी याचा वापर केला. हा इमोजी चिमटा काढण्यासाठी आहे. फेसबूक किंवा व्हॉट्सअप इमोजी वापरणारी पहिली सोशल साईट नाही. तर इमोजी वापरणारी पहिली सोशल साइट व्टीटर आहे. "इमोजी" हे नाव जपानी भाषेतून आले आहे. "E"=PICTURE आणि "MOJI"=CHARACTER म्हणून EMOJI चा शाब्दिक अर्थ PICTOGRAM असा आहे. आपल्या भारतात सर्वाधिक ब्लोइंग किस आणि आनंदाचे अश्रू येणारे हे दोन इमोजी सर्रासपणे वापरले जातात. युनिकोड संघटने'चे सदस्य दरवर्षी इमोजींसाठी मतदान करतात. या सदस्यांमध्ये नेटफ्लिक्स, ॲपल, फेसबुक, गुगल, टिंडर, ट्विटर यांचा समावेश आहे. मतदानानंतर इमोजींची अधिकृत यादी जाहीर होते.

अँड्रॉईड, आयओएस सारख्या मोबाईल ऑपरेटिंग सिस्टम्स आपल्या प्लॅटफॉर्मवर त्या प्रसिद्ध करतात.

व्हॉट्सॲप, मेसेंजर यांच्यामुळे इमोजी आताच्या काळात संदेश पाठवतांनाचा अविभाज्य भाग बनल्या आहेत इतक्या की चक्क त्यांच्या साठी स्वतंत्र डे सुद्धा साजरा केला जातोय! त्यांच्या महत्त्वाबद्दल जागरूक लोक, हा दिवस साजरा करतात. असो... जागतिक इमोजी डे च्या हार्दिक शुभेच्छा....!!!

# ऐतिहासिक वास्तू, किल्ल्यांच्या स्वच्छता मोहिमेत सहभागी व्हा : जिल्हाधिकारी

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** जिल्ह्यातील ऐतिहासिक वारशांचे संवर्धन व्हावे, या उद्देशाने या ऐतिहासिक वास्तू, किल्ल्यांमध्ये स्वच्छता मोहीम जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत जिल्ह्यातील तरुणींच्या साहाय्याने राबविण्यात येते आहे. हा उपक्रम अत्यंत स्तुत्य असून यात तरुणींनी उत्स्फूर्त सहभागी होण्याचे आवाहन जिल्हाधिकारी सुनील चव्हाण केले. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव कार्यक्रम अंतर्गत दौलताबाद येथील दौलताबाद किल्ला व परिसरात तरुणींनी स्वच्छता मोहीम आज राबविण्यात आली. या मोहिमेचे कौतुक करत जिल्हाधिकारी यांनी आजपासून गड किल्ल्यांचे संवर्धन आणि स्वच्छता मोहीम राबविण्यात येत आहे, असेही सांगितले.

दौलताबाद किल्ला परिसरात राबविण्यात आलेल्या मोहिमेत उपविभागीय अधिकारी रामेश्वर रोडगे, तहसीलदार विजय चव्हाण, पोलीस निरीक्षक शिवाजी तावरे, पोलीस उपनिरीक्षक गोवर्धन चव्हाण, मंडळ अधिकारी बी.आर. गुसिंगे, तलाठी एस.एम.मुळे, प्रियंका जगताप, मिलिंद साठे, पुरातत्त्व विभागाचे संरक्षण सहायक संजय रोहनकर, एस.एस. नीळ, मोहमद एजाज, आर.डी. घाटे, सीताराम धनायत, आसाराम काळे, फकिरचंद गायकवाड, बाबासाहेब आढाव, गिर्यारोहक योगेश्वरी बोहरे आदींसह तरुणींची बहुसंख्येने उपस्थिती होती.

**देवगिरी दौलताबाद किल्ला व परिसरात तरुणींची स्वच्छता मोहीम**





### अंतूर किल्ल्याची उद्या स्वच्छता

कन्नड तालुक्यातील अंतूर किल्ल्याच्या स्वच्छता मोहिमेत सहभागी होण्यासाठी उद्या (ता.17) रोजी सकाळी 8 वाजता तरुणींसाठी जिल्हाधिकारी कार्यालयातून बसची व्यवस्था करण्यात आली आहे. या मोहिमेत बहुसंख्येने सहभागी होण्याचे आवाहन जिल्हाधिकारी चव्हाण यांनी केले आहे.



# राजा माने यांना "सुधारककार" आगरकर राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान

आधुनिक केसरी न्यूज

**कराड :** "सुधारककार" गोपाळ गणेश आगरकर यांच्या १६६ व्या जयंतीनिमित्त येथील इंद्रधनु विचारमंच फाउंडेशनच्यावतीने या वर्षीचा राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार ज्येष्ठ संपादक राजा माने यांना ख्यातनाम वक्ते व विचारवंत प्राचार्य डॉ.यशवंत पाटणे यांच्या हस्ते आगरकरांच्या टेंभू या जन्मगावी प्रदान करण्यात आला.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून सातारा जिल्हा पोलीस प्रमुख अजयकुमार बंन्सल, सातारा जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष हरिष पाटणे उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान टेंभू गावचे लोकनियुक्त सरपंच युवराज भोईटे भूषविले. यावेळी तहसिलदार विजय पवार, उद्योजक रामकृष्ण वेताळ आदी मान्यवर उपस्थित होते.

सन २०२२ चा गोपाळ गणेश आगरकर सुधारक राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार ज्येष्ठ संपादक राजा माने यांच्या बरोबर सातारा येथील दैनिक ग्रामोध्दारचे संपादक बापूसाहेब जाधव, दैनिक सकाळ पुणे उपसंपादक आशिष तागडे, सिंधुदुर्ग लाईव्हचे कार्यकारी संपादक अर्जुन धस्के, झी २४ तास चॅनलचे सातारा जिल्हा प्रतिनिधी तुषार तपासे, दैनिक पुढारी कोल्हापूरच्या स्नेहा मांगुरकर यांनाही पुरस्कार प्रदान करण्यात आला. इंद्रधनु विचारमंच फाउंडेशनचे विश्वस्त विकास भोसले, नितीन ढापरे, संदीप चेणगे, प्रमोद तोडकर, अशोक मोहने, माणिक डोंगरे यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले.

# स्पुक्टो स्थानिक शाखेकडून उच्च शिक्षण सचिव, उच्च शिक्षण संचालक यांचा काळी फीत लावून निषेध

आधुनिक केसरी न्यूज

**शेवगाव :** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या 8 मे 2022 ठरावानुसार आबासाहेब काकडे कला महाविद्यालय, बोधेगाव, ता.शेवगाव या महाविद्यालयातील पुणे विद्यापीठीय व महाविद्यालयीन अध्यापक संघटना (स्पुक्टो) या स्थानिक शाखेकडून उच्च शिक्षण सचिव, मुंबई आणि उच्च शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा काळी फीत लावून निषेध करण्यात आला. या दोन अधिकाऱ्यांनी उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयाच्या योग्य निर्णयाचा वेळोवेळी अवमान केलेला आहे, न्यायालयीन निर्णयाप्रती अशोभनीय वर्तन करून पी.एचडी., एम.फिल. धारक प्राध्यापकांना प्रोत्साहनपर वेतन वाढीपासून वंचित ठेवले आहे. 71 दिवसाच्या बेकायदेशीर वेतन कपातीचा अर्धवट परतावा आणि यूजीसी रेगुलेशनची अर्धवट अंमलबजावणी केलेली आहे.

7 वा वेतन आयोगाचा फरक 2019 मध्ये केंद्र सरकारकडून मिळूनही ती प्राध्यापकांना रोखीने न देणे व देण्यास टाळाटाळ करणे अशा अनेक ब्रिटिशकालीन सनदी अधिकाऱ्यांच्या क्रूरपणाचे कृत्य वरील दोन अधिकाऱ्यांनी केलेले आहे. या अधिकाऱ्यांच्या धोरणाचा निषेध म्हणून पुणे विद्यापीठीय व महाविद्यालयीन अध्यापक संघटनेने विविध मार्गाने आंदोलन सुरू ठेवलेले आहे. या आंदोलनाचा भाग म्हणून पुणे विद्यापीठ अंतर्गत सर्व महाविद्यालयातील स्पुक्टो स्थानिक शाखेकडून वरील दोन अधिकाऱ्यांचा, त्यांच्या धोरणाचा काळी फित लावून निषेध करण्यात आला हा आंदोलनाचा सहावा टप्पा होता.

या दोन अधिकाऱ्यांच्या अन्यायकारक धोरणाविरुद्ध संघटनेने यापुढेही महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे अध्यक्ष डॉ. एस.पी. लवांडे यांनी आंदोलन करण्याचा निर्धार चालू ठेवलेला असून दि.18 जुलै 2022 रोजी दुपारी 12 वाजता राज्यातील सर्व प्राध्यापक संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांच्या कार्यालयावर राज्यस्तरीय धरणे/मोर्चा यामध्ये सहभागी होणार आहेत.

संघटनेचे पदाधिकारी शिष्टमंडळासह संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांना आंदोलनाविषयी निवेदन सादर करणार आहेत.

तसेच दि.1 ऑगस्ट 2022 रोजी दुपारी 4 वाजता आपापल्या विभागातील सर्व प्राध्यापक सहसंचालक, उच्च शिक्षण, यांच्या कार्यालयावर धरणे / मोर्चा यामध्ये सहभागी होणार आहेत.

दि.17 ऑगस्ट 2022 रोजी दुपारी 4 वाजता आपापल्या विभागातील सर्व प्राध्यापक कुलगुरू यांच्या कार्यालयावर विद्यापीठ स्तरीय धरणे/ मोर्चा यामध्ये सहभागी होणार असून संघटनेचे पदाधिकारी शिष्टमंडळासह कुलगुरू यांना आंदोलनाविषयीची कागदपत्रे सादर करणार आहेत व आंदोलनामधील प्रश्नांबाबत त्यांची भूमिका मांडणारी निवेदने राज्य शासनाला पाठवावीत अशी विनंती करणार आहेत.

यानंतरही वरील दोन अधिकाऱ्यांच्या अशोभनीय वर्तनात सुधारणा न झाल्यास राज्याच्या मुख्यमंत्र्यांना व उपमुख्यमंत्र्यांना गुरुवार दि.25 ऑगस्ट 2022 रोजी निवेदनाद्वारे ही सर्व कागदपत्रे सादर करून या अधिकाऱ्यांच्या मनमानी वर्तनाला पायबंद घालण्यासाठी यथोचित आदेश पारित करण्याविषयी आंदोलनाद्वारे विनंती करण्यात येईल. या आंदोलनात महाविद्यालयात प्रा.डॉ. गजानन लोंढे, डॉ. सलमनाली मिर्झा, प्रा. संदीप पालवे, प्रा. दिलीप ठोंबे, प्रा. भारत चव्हाण सहभागी झाले होते.





# वृक्षलागवडीच्या चळवळीत जनतेने मोठ्या संख्येने सहभागी व्हावे : तहसीलदार गायकवाड

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** वृक्ष लागवड म्हणजे प्रदूषणमुक्त समाजरचनेची चळवळ. जनतेने मोठ्या संख्येने वृक्षलागवडीच्या चळवळीत सहभागी व्हावे असे आवाहन तहसीलदार राहुल गायकवाड यांनी केले. वृक्ष लागवडीसोबतच त्याच्या संगोपनावरही भर दिल्या जावा, असेही ते म्हणाले. वैजापुर तालुक्यातील तलवाडा येथे वृक्षलागवडीच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

विभागीय आयुक्त सुनील केंद्रेकर यांच्या संकल्पनेतून तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद औरंगाबाद निलेश गटने यांच्या आदेशावरुन उप मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुनिल भोकरे व गटविकास अधिकारी कैलास जाधव यांच्या मार्गदर्शनातून तलवाडा ग्रामपंचायतीच्या वतीने तहसीलदार राहुल गायकवाड व गटविकास अधिकारी कैलास जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये तलवाडा येथील नागवाडी परिसरातवृक्ष लागवड कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बाजार समिती सभापती भागिनाथ मगर, पं.स. माजी उपसभापती राजेंद्र मगर, रईस शेख, सरपंच पुनम मगर, ग्रा.पं. सदस्य सुवर्णा मगर, रंजना मगर, सुनिता मगर, सिमा पवार, जापान सोनवणे, शांताराम मगर, आसिप शेख, ग्रामसेवक आर.आर. पवार, तलाठी आर.के. गायकवाड, मंडळ आधिकारी जयसिंगपुरे मॅडम, जालीदर वाघ, मेजर पढाण, दादाभाऊ मगर, ज्ञानेश्वर मगर, वसंत मगर, चेअरमन राजेंद्र मगर, दत्तु मगर, काकासाहेब पवार, राजेद्र गवांदे, नारायण तुपे, रामदास मगर, शिवाजी किटे, काकासाहेब मगर, राजेद्र मगर, प्रकाश सोनवणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना तहसीलदार राहुल गायकवाड म्हणाले, तलवाडा येथील युवकांनी वाढदिवसानिमित्त बॅनर, पोस्टर लावण्याच्या परंपरेला फाटा देत पर्यावरणाचे संवर्धन ववृक्ष संगोपणाच्या चळवळीचे देखिल कौतुक केले. व तलवाडा येथील घनदाट वुक्ष लागलड हे इतरांसाठी मॉडेल झाले पाहिजेत.अशी अपेक्षा व्यक्त केली. तापमान वाढ, पाणीटंचाई, अशा संकटांवर मात करण्यासाठी वृक्षलागवड वृक्ष लागवडीचा उपक्रम शासकीय न रहाता जनतेचा झाला पाहिजे, असे सांगुन गायकवाड म्हणाले की, पर्यावरण रक्षणासाठी वन संवर्धन गरजेचे असून त्यासाठी वृक्ष लागवड कार्यक्रमाला वनआंदोलनाचे स्वरुप लोकसहभागातून येणे आवश्यक आहे. दिर्घायुष्याकरीता नैसर्गिक आरोग्यवर्धक गुणधर्म अंतर्भुत असलेले वृक्ष मानवाला प्राणवायु, फळं, फुलं, सावलीच देत नाहीत तर अंतिम क्षणातही त्याला साथ देतात. वृक्ष लागवड करण्याकरीता सर्वांनी सर्वतोपरी प्रयत्न केले पाहिजे. या वृक्षलावगडीच्या मोहिमेत सर्वांनी हिरीरीने सहभागी व्हावे असे आवाहन तहसीलदार राहुल गायकवाड यांनी केले. यावेळी गावातील शेतकरी वुक्ष प्रेमी नागरिक मोठ्या प्रमाणात हजर होते.



# डॉ. दीक्षित यांना आयआयबीईतर्फे लाइफ टाईम अचीव्हमेंट पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** इंडियन इन्स्टिट्यूशन ऑफ ब्रीज इंजिनीअर्सच्या (आयआयबीई- IIBE) वतीने राष्ट्राच्या पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात निःस्वार्थ सेवा केल्या बद्दल महा मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. ब्रिजेश दीक्षित यांना प्रतिष्ठित "विशेष लाइफ टाईम अचिव्हमेंट पुरस्कार" प्रदान करण्यात आला.

यावेळी बोलताना डॉ. दीक्षित यांनी पुरस्काराबद्दल आयआयबीईचे आभार मानले. हा सन्मान आणि पुरस्कार माझ्या टीमला जातो ज्यांनी प्रकल्पाच्या प्रगतीसाठी वेळोवेळी माझ्या पाठीशी उभे राहून मेहनत घेतली. पराभूत संघात कोणीही विजेता नसतो आणि विजयी संघात कोणीही पराभूत नसतो, असे त्यांनी यावेळी प्रतिपादन केले आणि महा मेट्रो टीममध्ये सांघिक कार्याचे महत्त्व पुन्हा विशद केले. पुढे बोलताना ते म्हणाले, गेल्या शतकात तंत्रज्ञान खूप बदलले आहे. तंत्रज्ञानातील बदल आणि नवीन तंत्रे येत असताना, आपण आपल्या पुढच्या पिढीला प्रशिक्षण देणे आणि मार्गदर्शन करणे आणि या बदलांसाठी तयार करणे अत्यावश्यक आहे, कारण गुणवत्ता सर्व स्तरांवर राखली गेली पाहिजे, असे ते म्हणाले. भारतीय रेल्वेसोबतच्या त्यांच्या कार्यकाळाबद्दल बोलताना त्यांनी व्हिक्टोरियन टर्मिनस (VT) या भव्य इमारतीबद्दल सांगितले. तंत्रज्ञान आणि यंत्रसामग्री नसतानाही 1888 मध्ये तत्कालीन ब्रिटीश शासकांनी ही इमारत बांधली होती, जी आज आपल्याला सामान्यपणे पाहायला मिळते. अशी पूर्णत्वाची पातळी गाठली पाहिजे, असे ते म्हणाले. डॉ. दीक्षित यांनी दिवंगत डॉ. एम.सी. भिडे यांना श्रद्धांजली वाहिली, ज्यांनी 1889 मध्ये देशात ब्रिज इंजिनीअरिंगला चालना देण्याच्या उद्देशाने IIBE ची स्थापना केली होती. 'मी त्यांच्यासोबत भारतीय रेल्वेमध्ये काम केले आहे आणि त्यांना एक उल्लेखनीय व्यक्ती म्हणून स्मरणात ठेवतो,' ते म्हणाले. त्यांनी आय.आय.बी.ई.चे कौतुक करून संस्था चांगले काम करत असल्याचे सांगितले.

पुरस्कार वितरण समारंभाच्या आधी एक तांत्रिक सत्र झाले. स्वप्नील जोशी, संस्थापक आणि प्रिन्सिपल कन्सल्टंट, इंटेटो असोसिएट्स यांनी 'पायाभूत सुविधा प्रकल्पांमध्ये डिजिटलायझेशनची भूमिका' या



विषयावर भाषण केले. डॉ. दीक्षित यांना कन्सुमाचे एमडी हर्षवर्धन सुब्बा राव यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला, तर आयआयबीईचे अध्यक्ष विनय गुप्ता यांनी प्रशस्तिपत्रकाचे वाचन केले. महा मेट्रोचे संचालक (प्रकल्प) महेश कुमार यांनी नागपूर मेट्रो प्रकल्पाबाबत सादरीकरण केले. महाराष्ट्र शासनाचे माजी सचिव एस.आर. तांबे यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.

पुरस्कार वितरण समारंभाच्या आधी एक तांत्रिक सत्र झाले. स्वप्नील जोशी यांनी 'पायाभूत सुविधा प्रकल्पांमध्ये डिजिटलायझेशनची भूमिका' या विषयावर तर मोहन जटकर, सल्लागार, गॅमन इंजिनिअर्स अँड कॉन्ट्रॅक्टर्स प्रायव्हेट लिमिटेड यांनी 'पुल बांधकामासाठी तात्पुरती संरचना - काही गंभीर समस्या' या विषयावर भाषण केले.

तत्पूर्वी, सादरीकरण समारंभाच्या अगोदर विनय गुप्ता, अध्यक्ष, IIBE यांनी प्रशस्तिपत्र वाचून दाखवले. डॉ. दीक्षित यांच्या नेतृत्वाखालील महामेट्रोच्या यशाबद्दल त्यांनी सांगितले. त्यांनी महा मेट्रो नागपूरला श्रेय दिलेले एशियन बुक ऑफ रेकॉर्ड्स आणि इंडियन बुक ऑफ रेकॉर्ड्सचा संदर्भ दिला, ज्यासाठी डॉ. दीक्षित आणि महा मेट्रोचा केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते नुकताच गौरव करण्यात आला. डॉ. दीक्षित यांना श्रेय दिलेले पुरस्कार आणि यशांची लांबलचक यादीही त्यांनी बोलून दाखवली.

नागपूर आणि पुणे मेट्रो प्रकल्प राबविताना कामाचा दर्जा आणि गती पाहून डॉ. दीक्षित यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. डॉ. दीक्षित यांना गेल्या महिन्यात कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्सतर्फे 'भामाशाह पुरस्कार' प्रदान करण्यात आला होता. महा मेट्रोने ज्या पद्धतीने प्रकल्प राबविले आहेत त्यामुळे अनेक गौरव प्राप्त झाले आहेत आणि डॉ. दीक्षित आणि महा मेट्रो टीमने घेतलेल्या परिश्रमांची ही ओळख आहे. डॉ. दीक्षित यांना देण्यात येणारा विशेष जीवनगौरव पुरस्कार हा या कामगिरीची पुन्हा एक ओळख आहे.

स्वागतपर भाषण श्रीमती रुही अग्रवाल, समन्वयक, IIBE यांनी केले, तर मानद सचिव डॉ. गोपाल राय यांनी आभार मानले.

महाराष्ट्रातील विकासभारणीच्या कार्यात महत्वाकांक्षी अश्या नागपूर मेट्रो आणि पुणे मेट्रोसारख्या प्रकल्पांची यशस्वीपणे निर्मिती करून, महाराष्ट्राच्या सार्वजनिक वाहतूक प्रणालीत तसेच विकासात्मक कार्यात ऐतिहासिक सकारात्मक बदल घडवून आणले आणि भारतासह आशिया खंडात नावाजले जातील असे मानांक कायम केले. डॉ. दीक्षित यांना हा पुरस्कार उल्लेखनीय आहे कि, महा मेट्रोला नुकतेच आशिया खंडातील सर्वात लांब पुलाचे बांधकाम केल्याबद्दल प्रतिष्ठित आशिया आणि इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स तर्फे प्रमाणपत्र केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले होते आणि या करता गडकरी यांनी महा मेट्रोच्या कार्याचे विशेष कौतुक केले. या व्यतिरिक्त मागील महिन्यात कॉन्फडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स च्या (केट) वतीने डॉ. ब्रिजेश दीक्षित यांना "भामाशाह" पुरस्कार देऊन त्यांचा नागरी सत्कार देखील करण्यात आला होता.

महा मेट्रोच्या वतीने नागपूर आणि पुणे शहरांमध्ये मेट्रो रेल प्रकल्प राबविण्यात येत असून या ठिकाणी महा मेट्रोने मेट्रोचे संचालन देखील सुरु केले आहे. नागपुरात मेट्रो प्रकल्पासह सेंट्रल रॉड फंड अंतर्गत विविध विकास कामे महा मेट्रो राबवत आहे. नागपूर आणि पुणे शिवाय, नाशिक शहराकरिता मेट्रो नियो प्रकल्पाचे नियोजन केले आहे. तसेच ठाणे शहराकरिता मेट्रो रेल प्रकल्पाचा विस्तृत आराखडा तयार केला आहे.

महाराष्ट्र राज्याशिवाय तेलंगणा राज्यातील वारंगल शहराकरिता देखील महा मेट्रोने प्रकल्पाचा विस्तृत आराखडा तयार केला आहे. तसेच नवी मुंबई येथे सिडको राबवत असलेल्या मेट्रो रेल प्रकल्पाचे संचालन करण्याकरिता १० वर्षाच्या कालावधीकरिता महा मेट्रोची नियुक्ती करण्यात आली असून त्या ठिकाणी देखील गतीने कार्य महा मेट्रोच्या वतीने पूर्ण करण्यात येत आहे. महा मेट्रोच्या कार्याची नोंद देशातील अनेक संघटनानी घेतली असून डॉ. दीक्षित यांना विशेष लाइफ टाईम अचिव्हमेंट पुरस्कार महा मेट्रोच्या कार्याची पावती आहे.



# मराठी माणसाने आत्मविश्वास बाळगावा : देवेंद्र भुजबळ

आधुनिक केसरी न्यूज

**ठाणे :** मराठी कर्तुत्ववान व्यक्ती देशातच नव्हे तर परदेशात जाऊन आपल्या कार्याने आज यशस्वी झाल्या आहेत. त्यामुळे मराठी माणूस मागे नाही तर, आळशी मराठी माणूस मागे असून धाडशी मराठी माणूस जगाच्या विविध भागात जाऊन आपले कर्तृत्व सिद्ध करीत आहे आणि त्याचबरोबर मराठी भाषेच्या संवर्धनाचेही काम तो करत आहे. अशा व्यक्तींच्या ओळखींतूनच आपल्यात आत्मविश्वास निर्माण होईल असा विश्वास न्यूज स्टोरी टुडे पोर्टलचे संपादक देवेंद्र भुजबळ यांनी ठाणे येथे बोलताना व्यक्त केला. ते मेघना साने लिखित 'मराठी सातासमुद्रापार' या पुस्तकाच्या प्रकाशन कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्ष पदी ज्येष्ठ संपादक, अर्थतज्ज्ञ डॉ उदय निरगुडकर हे होते.

भुजबळ पुढे म्हणाले की, "मराठी सातासमुद्रापार" या प्रेरणादायी पुस्तकातील यशकथा केवळ पुस्तकापूर्त्याच बंदिस्त न राहता, त्या शॉर्टफिल्म्स च्या माध्यमातून प्रसारित होणे गरजेचे असून त्या दृष्टीने प्रयत्न करणे आवश्यक आहे.

दुसऱ्या प्रमुख पाहुण्या कवयित्री प्रा. प्रतिभा सराफ यांनी पुस्तकावर अभ्यासपूर्ण विवेचन केले. 'मराठी सातासमुद्रापार' या पुस्तकाने कर्तुत्ववान मराठी व्यक्ती आपल्यापर्यंत पोहोचवल्या आहेत. त्यांच्या मराठी भाषा, गीत, संगीत, कला आणि कार्य तसेच वृत्तीतील बारकावे यात टिपले आहेत. या सकारात्मक लेखांतून मेघना साने यांची परदेशातील मराठी व्यक्ती यांच्याबद्धलची जाण, चौफेर ज्ञान यांची जाणिव होत असल्याचे त्यांनी सांगितले.

अध्यक्षपदावरून बोलताना ज्येष्ठ संपादक डॉ. उदय निरगुडकर म्हणाले की, परदेशात मराठी माणूस भेटल्यावर मराठीत बोलतो हाच खरा आनंद. मातृभाषा आपुलकी जपते. आपल्या भाषेत बोलणे ही सांस्कृतिक ओळख होय. नवनिर्मितीची प्रेरणा मातृभाषेतूनच मिळते म्हणून मराठी भाषा टिकली पाहिजे.

लेखिका मेघना साने, आपल्या मनोगतात म्हणाल्या की, परदेशात "गप्पागोष्टी", "कोवळी उन्हे" हे आपले कार्यक्रम सादर करताना, तेथील व्यक्ती आणि संस्थांच्या कार्याने प्रभावित झाल्याने हे पुस्तक लिहिण्याची प्रेरणा मिळाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना 'ग्रंथाली'चे विश्वस्त सुदेश हिंगलासपुरकर म्हणाले की, माणसात वावरत असतानाही लेखकाच्या अंतर्मनात लेखन चालू असते. यातूनच मराठी भाषा आणि संस्कृतीचे इतर देशात जतन कसे केले जाते याची ओळख 'मराठी सतासमुद्रापार' या पुस्तकाने करून दिली आहे.

यावेळी ज्येष्ठ अभिनेते जयंत सावरकर, लेखिका मोनिका ठक्कर, व्यंगचित्रकार विवेक मेहेत्रे, चित्रकार सतीश भावसार, लेखिका अनुराधा नेरूरकर आदी मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. पुस्तकातील काही लेख न्यूज स्टोरी टुडे पोर्टलवर यापूर्वी प्रसिध्द झाले असल्याने पोर्टलच्या सह संपादक अलका भुजबळ यांनी न्यूज स्टोरी टुडे चा आकर्षक "मग" देऊन लेखिका मेघना साने यांचा सत्कार केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वृत्तनिवेदिका स्नेहा आघारकर यांनी छान केले. या शानदार कार्यक्रमास आकाशवाणीचे निवृत्त सहायक संचालक भूपेंद्र मिस्त्री, कोमसाप मुंबई उपनगरचे माजी अध्यक्ष शिवाजी गावडे, कवी कमलाकर राऊत, चित्रकार रामदास खरे, कवी विकास भावे यांच्यासह अनेक मान्यवर, साहित्य रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



संभाजीनगर नामांतर स्थगित करणाऱ्या शिंदे-फडणवीस सरकार विरोधात टीव्ही सेंटर चौक येथे शिवसेना नेते तथा मा.खासदार चंद्रकांत खैरे व जिल्हाप्रमुख तथा आ. अंबादास दानवे यांच्या मार्गदर्शनाखाली निदर्शने करण्यात आली. यावेळी मा.महापौर नंदकुमार घोडेले, उपजिल्हाप्रमुख संतोष जेजुरकर, उपजिल्हाप्रमुख बंडु ओक, पूर्व विधानसभा संघटक तथा मा.स्थायी समिती सभापती राजु वैद्य, पूर्व चे शहरप्रमुख विश्वनाथ स्वामी, मध्य चे शहरप्रमुख बाळासाहेब थोरात, मा.नगरसेवक मकरंद कुलकर्णी, अनिल जैस्वाल, गोपाळ कुलकर्णी तसेच शिवसेनेचे सर्व पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आता तुझा काटा काढतो म्हणत तरुणावर दोन गोळ्या झाडल्या

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** जिल्ह्यातील नेवासा शहरात एका तरुणावर ओळखीतीलच काही इसमांनी गावठी कट्ट्यातून दोन गोळ्या झाडल्याची घटना घडली आहे. संबंधित तरुणाने घटना स्थळावरून पळ काढला. त्यामुळे आरोपीचा निशाणा चुकल्याने या तरुणाचा जीव थोडक्यात वाचला आहे. नेवासा शहरातील तहसीलदार निवासाजवळ शुक्रवारी रात्री ही गोळीबाराची घटना घडली आहे.

नेवासा फाटा येथील २० वर्षीय आकाश कुसळकर यांचे नेवासा शहरातील एका शाळेजवळ टायर वर्क्सचे दुकान आहे. शुक्रवारी रात्री साडेसात वाजेच्या दरम्यान कुसळकर यांचा मित्र अमोल शेलार हा त्यांच्या दुकानावर स्कुटी धुण्यासाठी आला होता. दोघे एकमेकांशी गप्पा मारत असतानाच नेवासा फाट्याकडून दोन दुचाकीवर चव्हाण, वाघ, दहातोंडे आणि आणखी एकजण असे चार इसम त्याठिकाणी आले. आलेल्या चौघांपैकी चव्हाण नामक व्यक्ती दुचाकीहून खाली उतरला त्यावेळी त्याच्या हातामध्ये बियरची बॉटल होती. तो अमोल शेलार याच्याकडे बघून त्याला म्हणायला लागला की, "तू लय माजला आहेस, तुझा आज काटाच काढतो". तो अमोल याला शिवीगाळ करून दमदाटी करू लागला. त्यावेळी दुकान मालक आकाश कुसळकर याने संबंधितांना, शिवीगाळ तसेच काही वाद करू नका, असे सांगितले.

पुस्तके खरेदीची सुवर्णसंधी
आपल्या पुस्तकाच्या संग्रहात अमुल्य भर घाला

३ पुस्तकांचा संच मिळवा १०००/- रुपयांत
पुस्तकांवर 20% सूट

गणिताच्या मूलभूत संकल्पना
(१ली ते १०वी व सर्व परीक्षांसाठी उपयुक्त)
~~MRP ₹ 430/-~~ Offer Price ₹ 345/-
पाने ५३४
गणिताच्या मूलभूत संकल्पना प्रश्नसंच
सर्व शालेय विद्यार्थी, शिष्यवृत्ती परिक्षार्थी व सर्व स्पर्धा परीक्षांना उपयुक्त
~~MRP ₹ 470/-~~ Offer Price ₹ 375/-
पाने ५३४
उखाण्यातून गणित
मुलभूत संकल्पना व जनरल नॉलेज
~~MRP ₹ 360/-~~ Offer Price ₹ 280/-
पाने ३६४
श्रीमती छायाताई खेडकर
8888780568
श्री. हरिभाऊ गिते सर
9422742712
गणेश बुक स्टॉल,
भगवानबाबा चौक, पाण्याच्या टाकीजवळ, बीड
मो. 8149196415
दत्तराज पार्क,
बायपासरोड, सावतानगर, गेवराई
मो. 8888780568/9422742712
माऊली अपार्टमेंट,
मंगलमुर्ती कॉलनी, रेणू हॉस्पिटल जवळ,
धाडेनगर, बार्शी रोड, बीड मो. 8793150910

# सोयगाव तालुक्यातील देव्हारी ते पिंपळवाडी रस्त्याची अत्यंत दुरवस्था

आधुनिक केसरी न्यूज

**बहादुर चव्हाण**

**देव्हारी :** सोयगाव तालुक्यातील देव्हारी ते पिंपळवाडी हा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाचा असून अनेक वर्षांपासून दुर्लक्षित असल्याने त्याची दुरवस्था झाली आहे. वाहनचालकांना या रस्त्यावरून प्रवास करणे जिकिरीचे झाल्याने संबंधित विभागाने व जबाबदार लोकप्रतिनिधींने तातडीने लक्ष देऊन रस्ता प्रवासायोग्य करावा, अशी मागणी ग्रामस्थ करीत आहेत.

देव्हारी-पिंपळवाडी मार्गे सावळदबारा या गावांना जोडणाऱ्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या 5 किलोमीटर अंतराच्या या रस्त्याकडे प्रशासन तसेच लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष झाल्याने अनेक वर्षांपासून या रस्त्याचे काम झाले नाही. खेदाची बाब म्हणजे देव्हारी ते पिंपळवाडी दरम्यानचा रस्ता खराब झाल्याने, नागरिकांना वर्षानुवर्षे या खड्डेमय रस्त्यातून प्रवास करावा लागत आहे. तसेच देव्हारी -पिंपळवाडी या परिसरातील आदिवासी वाड्या-वस्त्यांना नेरळशी जोडणारा रस्ता झाला. मात्र देखभालीअभावी या रस्त्याची दुरावस्था झाली आहे. या परिसरातील बहुसंख्य आदिवासी बांधव उदरनिर्वाहासाठी भाजीपाला लागवड करतात. याच मार्गाने



त्यांना भाजीपाला विकण्यासाठी बाजारात जावे लागते. कामगार वर्गाला याच रस्त्याने प्रवास करावा लागतो. मात्र खराब रस्त्यामुळे रिक्षाचालक या गावांना यायला कचरतात. दुचाकी चालकांना खड्डे चुकवत प्रवास करावा लागतो.

बऱ्याचदा अपघातही घडतात. गेल्या अनेक वर्षांपासून येथील ग्रामस्थ रस्ता दुरुस्तीची मागणी करीत आहेत. मात्र संबंधित विभागाच्या दुर्लक्षामुळे अद्यापही येथील नागरिक रस्ता दुरुस्तीच्या प्रतीक्षेत आहेत.



# 75 प्रकारांच्या तांदूळापासून 75 भाताचे प्रकार करण्याचा विष्णू मनोहर यांचा संकल्प

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** आतापर्यंत जवळपास 11 विश्व विक्रम केले आणि यावर्षी भारताच्या स्वातंत्र्याला 75 वर्ष पूर्ण होत आहे. त्यानिमित्ताने 75 प्रकारांच्या तांदूळापासून 75 भाताचे प्रकार करण्याचा संकल्प विष्णू मनोहर यांनी केलेला आहे. हा संकल्प पूर्ण करण्यात त्यांना ५ तास लागेल. हा कार्यक्रम दि.17 जुलै 2022 रोजी विष्णूजी की रसोई सेंट्रल बाजार रोड बजाज नगर चौक, नागपूर येथे होणार आहे.

प्रत्येक भात जवळपास 5 किलो तयार केला जाणार आहे, म्हणजेच एकूण 375 किलो भात यावेळात तयार होईल. हा तयार झालेला भात सर्व खनस्यांसाठी मोफत वितरीत केला जाणार आहे. यातील काही भाग हा विशिष्ट मुलांच्या शाळा, अनाथ आश्रम, वृद्धाश्रम, अंधविद्यालय इत्यादी ठिकाणी वितरीत केला जाणार आहे. प्रकारच्या तांदूळाचे वाण गोळा करणे हे काही सोपे काम नाही त्याकरीता लातूरचे आमचे मित्र दिनेश मित्तल (मित्तल राईस बड) यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे, असे 75 प्रकारचे तांदूळ लोकांना बचायला सुद्धा मिळणार आहेत. तांदूळाचे नाव, जात, प्रदेश आणि व्यापासून कुठला पदार्थ तयार होत आहे, यांची विस्तृत माहिती लोकांना पुरविण्यात येईल. त्याचवेळी विष्णुजी याच तांदूळापासून भाताचे प्रकार तयार करत असतील. या कार्यक्रमाचा लाभ घेण्यासाठी लोकांनी आपले घरचे डबे सोबत आणावे.

# लासलगावला स्वातंत्र्याचा अमृतोत्सव बुलेट रॅलीद्वारे संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळून 75 वर्षे पूर्ण होत आहेत.

यंदाचे वर्ष आता आजादी का अमृत महोत्सव म्हणून ओळखले जात आहे. प्रत्येक क्षेत्रातील कामगिरी सर्वांना समजावी यासाठी प्रत्येक क्षेत्रातर्फे विशेष कार्यक्रमांचे आयोजनही होत आहे. आजादी का अमृत महोत्सवाच्या निमित्याने भारतीय रेल च्या माध्यमातून बुलेट रॅली चे आयोजन केले गेले आहे. भुसावळ मंडल आरपीएफ द्वारा आयोजित या बुलेट रॅलीचे निरीक्षक बैनी प्रसाद मीना हे करत आहेत. आज लासलगाव रेल्वे स्थानकात आरपीएफ प्रशांत गवई यांच्या मार्गदर्शनाने या रॅलीचे स्वागत करण्यात आले.



कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी लासलगाव बाजार समितीच्या सभापती तथा भाजप नाशिक जिल्हा अध्यक्ष सुवर्णा जगताप होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून लासलगाव पोलीस स्टेशनचे एपीआय राहुल वाघ, रॅली निरीक्षक बैनी प्रसाद मीना, उपनिरीक्षक गणेश कुमरावत, प्रकाश थोरात, आर.पी.एफ. प्रशांत गवई, सुभाष बोराडे उपस्थित होते. यावेळी रेल्वे प्रशासन व सुवर्णा जगताप यांच्यातर्फे रॅली बांधवांचा सत्कार व सन्मान करण्यात आला. यावेळी मनोगत व्यक्त करताना ब्राह्मण महासंघ कार्याध्यक्ष तथा लासलगाव भाजपा मंडल अध्यक्ष स्मिता कुलकर्णी यांनी रेल्वे सुविधा, सुरक्षितता, ऑनलाईन बुकिंग यावर भाष्य केले. भाजपा लासलगाव युवा अध्यक्ष निलेश जगताप यांनी यु टी एस ॲप तसेच रेल्वे प्रवास सुविधा व धोके यावर मनोगत व्यक्त केले. एपीआय राहुल वाघ यांनी रेल्वे गेट बंद असताना चुकीच्या पद्धतीने प्रवास, अती घाई प्रवासादरम्यान घेण्याची काळजी यावर मनोगत व्यक्त केले.

बैनी प्रसाद मीना यांनी ७५ वर्षातील रेल्वेच्या सुविधा सुरक्षितता रॅलीचे नियोजन सांगितले. सदरील रॅली ही भुसावळ मंडलातून निघाली असून मुंबई सीएसटी येथून स्टॅच्यू ऑफ युनिटी या ठिकाणी याची सांगता होईल. तसेच संपूर्ण प्रवास बुलेटवर असून या माध्यमातून रेल्वेबद्दल जनजागृती मोहीम असल्याचे सांगितले तर लासलगाव आरपीएफ प्रशांत गवई यांनी प्रवासादरम्यान हुल्लडपणा करू नये व तो केल्यास जीवावर बेतू शकते.

आपण सुरक्षित तर कुटुंब सुरक्षित, कायद्याचे पालन करून प्रवास करत जा रेल्वे प्रशासन नेहमी आपल्या सेवेत तत्पर आहे असे सांगितले. अध्यक्षा सुवर्णा जगताप यांनी किसान रेल आणि प्रवाशांचे कर्तव्य, सुरक्षितता यावर भाष्य केले. कोरोना काळात बंद झालेल्या रेल्वे गाड्या सुरू करण्यासाठी प्रयत्न केले. किसान रेल्वेचा शेतकऱ्यांना, व्यापारी वर्गाला चांगला फायदा होत असून शेतकऱ्यांचे उत्पादन बाहेर पोहोचवण्यास मोठे सहकार्य होत आहे. ऑनलाईन बुकिंग, पार्सल सुविधा अशा अनेक अत्याधुनिक सुविधा रेल्वे बाबतीत होत आहे आणि त्याद्वारे मोठा रिव्हन्यू रेल्वेला मिळत आहे असे सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्मिता कुलकर्णी यांनी केले. प्रशांत गवई, नितीन शर्मा यांच्या विषयी सहकार्याने कार्यक्रम यशस्वी करण्यात आला. यावेळी सुवर्णा जगताप, राहुल वाघ, बैनी प्रसाद मीना, प्रशांत गवई, नितीन शर्मा, निलेश लचके, स्मिता कुलकर्णी, ज्योती शिंदे, ठोंबरे, जोशी, पियुष बंब, निलेश जगताप, आनंद जैन, माळी काका, गिरी मिल्ला, राजू पवार, वसीम शेख, नागेश धनवटे, धीरज कुमार, देवेंद्र कुमार, नवनीत कुमार, जोहरी फोगाट, दीपक शिरसाठ, तन्मय जगताप, आसिफ पठाण व इतर नागरिक उपस्थित होते.

# सुखी जीवनाचा मंत्र





डॉ. विजय दहिफळे

## मुलांमध्ये होणारे बदल

आधुनिक केसरी

चेहऱ्यावर लव येणे, दाढी-मिशा येणे, जांघेत व छातीवर केस येणे, चेहऱ्यावर मुरुम (पिंपल्स) येणे. काखेत घाम येणे. हे सगळे नैसर्गिक बदल होत असतात. पण अनेकदा या बदलांनी पहिल्यांदा मुलं घाबरुन जातात आणि काही वेळा पालकही घाबरतात. याच काळात मुलांना स्वप्नदोष सुद्धा व्हायला लागतो. पहाटेच्या वेळी वेगवेगळी स्वप्ने पडून हा स्वप्नदोष होतो. पण मुलांनो घाबरू नका. हे वाढत्या वयाचे लक्षण आहे. याच काळात लिंगाचा आकार वाढणे, शुक्राणू तयार होणे आणि त्या शुक्राणूंचे पालनपोषण करण्यासाठी सिमेन अर्थात वीर्य तयार होणे. अंडाशयाचा आकार वाढणे या क्रिया होत असतात आणि हे सर्व टेस्टोस्टेरॉन नावाच्या हार्मोनची क्रिया आहे. याच काळात मुलाचा आवाजही घोगरा होत असतो.

मुलामध्ये होणाऱ्या या शारीरिक बदलांप्रमाणे त्याच्यात मानसिक बदलही घडत असतात. तो जास्त वेळ एकटा राहण्याचा प्रयत्न करतो. सर्वांशी बोलत नाही, मिळून मिसळून राहणे कमी होते. बऱ्याच वेळा तो लॅपटॉप, कॉम्प्युटर किंवा व्हॉट्स अप व चॅटिंग करत राहतो. या काळात कसोटी असते ती पालकांची, त्यांनी या काळात हे बदल पाहात असताना त्यावर राग किंवा मुलाचा द्वेष न करता जे बदल होत आहेत त्याबद्दल मुलांना माहिती करून देणे आवश्यक आहे. त्यासाठी स्वतःचे अनुभव मुलांना सांगणे व त्यांची काळजी घेणे आवश्यक आहे. जे बदल मुलाच्या शरीरात झालेले आहेत त्याचा अर्थ हा खूप सकारात्मक पद्धतीने घेणे आवश्यक आहे. हे बदल त्याच्या शरीरात झाले याचा अर्थ असा आहे की जगाच्या दृष्टीने तो समंजस झाला. जगाबद्दलची उत्सुकता, कल्पकता तसेच विचार करण्याची व ते विचार मांडण्याची क्षमता त्याच्यामध्ये निर्माण झाली. अशा काळात मुलांसोबत मित्र बनून त्याच्याबराबर उघडपणे बोलण्याची आवश्यकता असते. सेक्स या विषयाबद्दल या काळात मुलांमध्ये कमालीची उत्सुकता आणि कतुहल निर्माण झालेलं असतं. त्यामुळे याच काळात त्यांनी काय करावं आणि काय करू नये याबद्दलची माहिती देणे आवश्यक असतं. सध्याचा काळ हा तंत्रज्ञानाचा काळ आहे. सोशल नेटवर्किंगचा काळ आहे. सेक्स या विषयावर चांगली आणि उपयुक्त माहिती देण्याऐवजी सेक्स विभत्सीकरण करणाऱ्या अनेक सोशल साईट्स उपलब्ध आहेत आणि नेमक्या याच साईट्स मुलांकडून पाहिल्या

संपर्क : डॉ. दहिफळे युरॉलॉजी ॲण्ड प्लास्टीक सर्जरी हॉस्पीटल, जिल्हा न्यायालयासमोर, अदालत रोड, बाबा पेट्रोल पंपाजवळ, औरंगाबाद, मोबा. : 9822326248, फोन 0240-2364858
Email : drvijaydahiphale@gmail.com,
Website : www.dahiphalecosmeticurology.com

# बदलापुरात शिवसेना भुईसपाट

आधुनिक केसरी न्यूज

**ठाणे :** बदलापुरातील २५ नगरसेवकांनी शिंदे गटाला समर्थन दिले आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत त्यांनी शिंदे गटात जाहीर प्रवेश केला. आमदारांच्या बंडानंतर शिवसेनेचे पदाधिकारीही शिंदे गटात सामील होताहेत. बदलापुरातील नगरसेवकांच्या पाठिंब्याने ठाण्यापाठोपाठ मुंबईतील उपनगरांत देखील एकनाथ शिंदे यांची ताकद वाढताना पाहायला मिळती. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ठाण्यातील 'नंदनवन' या निवासस्थानी नगरसेवकांच्या प्रवेशाचा कार्यक्रम पार पडला. यावेळी बदलापुरातील शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी नगरसेवकांच्या वतीने एकनाथ शिंदे यांचा भव्य सत्कार करण्यात आला. एकनाथ शिंदे यांनीही सर्व नगरसेवकांचे शिंदे गटात स्वागत केले. आपल्या समर्थनाबद्दल आभारी आहे, महाराष्ट्राच्या प्रगतीचं काम आपल्या हातून घडेल, अशी ग्वाही त्यांनी शिवसैनिकांना दिली.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत

(रविवारी मोफत तपासणी)

नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!

(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in